मासिक वार्तापत्र • अंक 20 • जून 2021 • सहयोग मूल्य - रु. 5 • 16 पाने

# कामगार बिगुल

नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक



सरकारी योजनांच्या निव्वळ पोकळ घोषणा! टाळेबंदीमध्ये कामगार उपाशीच! 3

पुण्यात पिरंगुट येथे नफ्याच्या आगीत होरपळून 17 कामगारांचा मृत्यू 7

मानखुर्द–गोवंडीत औषधांची वाढती नशाखोरी! 15

## करोना काळात गरीब-श्रीमंत असमानतेमध्ये प्रचंड वाढ!

## बेरोजगारी, महागाईचा कहर!

## भांडवलशाहीची कमाल: कामगार भुकेकंगाल, उद्योगपती मालामाल!

संपादक मंडळ

दुसऱ्या लॉकडाऊनदरम्यान देशातील कोट्यवधी लोक दोन वेळचे खाणे, घरभाडे, वीजबील, मुलांच्या शाळांच्या फी अशा समस्यांच्या ओझ्याखाली दडपले जात असताना देशातील आणि जगातील करोडपती-अब्जोपतींच्या संपत्तीमध्ये अभूतपूर्व वाढ झाली आहे. येणारा दिवस कसा सरणार या चिंतेमध्ये कोट्यवधी कामगार-कष्टकरी दिवस काढत असताना, देशातील 24 टक्के लोक महिन्याला 3,000 रुपयांपेक्षा कमी कमावत असताना, मोदीच्या लाडक्या अडानी या उद्योगपतीच्या संपत्तीत तासाला 75 कोटी रुपये एवढी वाढ होत होती, तर मुकेश अंबानींच्या संपत्तीत दर तासाला 90 कोटी रुपये वाढत होते!

ही स्थिती काही फक्त दुसऱ्या लॉकडाऊनमध्येच दिसून आली आहे असे नाही. पहिल्या लॉकडाऊनमध्ये सुद्धा हेच चित्र होते. खरेतर कमी किंवा जास्त तीव्रतेने अशाप्रकारे विषमता वाढतच राहते. या वाढत्या विषमतेचे कारण आहे बाजाराची, नफ्याकरिता चालणारी भांडवली अर्थव्यवस्था, जी करोनासारख्या साथींमध्ये तर विषमता तीव्रतेने वाढवते.

### करोनाकाळात श्रीमंतांच्या संपत्तीत वाढ

पहिल्या लॉकडाऊन दरम्यान, एप्रिल ते जून 2020 मध्येच, जगातील सर्वाधिक श्रीमंत अशा अब्जाधीशांच्या संपत्तीमध्ये 27टक्क्यांपेक्षा जास्त, आणि 2020 सालात निम्म्यापेक्षा जास्त वाढ झाली. त्यांची एकूण संपत्ती 12,390 अब्ज डॉलर्स, म्हणजे जवळपास 863लाख कोटी रुपयांवर जाऊन पोहोचली. याच काळात भारतात दर आठवड्याला एक नवीन अब्जाधीश निर्माण होत होता, आणि जगातील सर्वाधिक गरिब लोकांचा देश असलेला भारत याच काळात सर्वाधिक श्रीमंत लोकांच्या यादीतही जगात तिसऱ्या क्रमांकावर होता! 2020 सालामध्ये भारतातील अब्जाधीशांच्या संपत्तीत 35 टक्के म्हणजे जवळपास 12 लाख कोटी रुपयांची वाढ झाली. यापैकी फक्त सर्वात श्रीमंत लोकांच्या संपत्तीत झालेली वाढ जरी मोजली तरी भारतातील प्रत्येक गरीब व्यक्तीला जवळपास 1 लाख रुपये प्रतिव्यक्ती मिळतील!

### ढासळती अर्थव्यवस्था, चढता शेअर बाजार!

अगोदरच घसरत असलेल्या अर्थव्यवस्थेला लॉकडाऊनमुळे तडाखाच बसला आणि गेल्या वर्षी 23 टक्के इतकी मोठी घट जी.डी.पी. मध्ये नोंदवली गेली. अंबानी, अडानी, माल्या, चोक्सी सारख्या मोठमोठ्या उद्योगपतींनी बुडवलेल्या कर्जांमुळे बँका गेल्या काही वर्षांपासून मोठ्या संकटात आहेत. अनेक बँका दिवाळखोर झाल्या आहेत. मोदी सत्तेवर आल्यापासून 6.6 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची कर्जे बुडवली गेली आहेत. रिझर्व बँकेकडे असलेल्या राखीव निधीतून खर्च चालवण्याची स्थिती सरकारवर ओढवली आहे. तिसरीकडे गृहनिर्माण उद्योगातली मंदी चालूच आहे आणि आता तर व्याजाचे दर 14 वर्षांतील निच्चांकी इतके कमी होऊनही गृहकर्ज घेण्याचे प्रमाण वाढत नाहीये. घरे विकली जात नाहीयेत आणि एकंदरीत अर्थव्यवस्थेमध्ये नफ्याचे

पान 4 वर

## सामान्य जनतेच्या प्रेतांवर आणि सगळे लोकशाही नियम-कायदे तोडून उभा केला जात आहे 'सेंट्रल विस्टा'!

अविनाश

वाराणसी, दिल्ली, बंगळूर आणि देशाच्या इतर जागी स्मशानांमध्ये मृतदेहांच्या रांगा लागलेल्या आहेत. स्मशानांमध्ये 24 तास चिता जळत आहेत. चहूबाजूला अंधार आणि धूर भरलाय. शवगृहांबाहेर मृतदेहांच्या रांगा आहेत आणि आप्तेष्ठ तिष्ठत उभे आहेत. दिल्लीमध्ये तर कृत्यांच्या स्मशानभूमींना माणसांच्या स्मशानभुमींमध्ये बदलवले जात आहे. यमुना आणि गंगेमध्ये मृतदेह तरंगत आहेत. हॉस्पिटलांच्या बाहेर रुग्णांची रांगा लागल्या आहेत. इथे एक मुलगी आपल्या बापाला हॉस्पिटलमध्ये भरती करवायला वाट पहात आहे. तशीच जशी झारखंड मध्ये एक मुलगी उभी होती, आपल्या बापाला हॉस्पिटलमध्ये भरती करायला आणि जिने 3 तास वाट पाहिल्यानंतर लाईन मध्येच आपल्या बापाचा जीव जाताना पाहिले. दिल्लीमध्ये अशाच पद्धतीने हॉस्पिटलला जाताना एका व्यक्तीचा ऑक्सिजनच्या कमतरतेने रिक्षा मध्येच जीव गेला, पण तरीही त्याची बायको आपल्या छातीत हवा भरून त्याच्या निर्जीव शरीरात प्राण फुंकण्याचा प्रयत्न करत राहिली. संपूर्ण देश अशाप्रकारच्या भयावह संकटातून जात असताना हुकूमशहा व्यस्त होता आपल्या राजमहालाच्या निर्माणामध्ये कारण ते पण तेवढेच महत्त्वाचे आहे जेवढे महत्त्वाचे आहेत लोकांचे जीव, ऑक्सिजन, व्हेंटीलेटर्स, आणि औषधे!

हुकूमशहाच्या या महालाच्या प्रकल्पाचे नाव आहे 'सेंट्रल विस्टा'. सेंट्रल विस्टा दिल्लीतील त्या भागाला नाव आहे जिथे देशाच्या सरकारची सर्वात महत्वाची कार्यालये पूर्वीपासून आहेत. याच भागाला नव्याने 'विकसित' करून अनेक इमारती बांधण्याच्या प्रकल्पालाच आता 'सेंट्रल विस्टा' प्रकल्प नावाने ओळखले जाऊ लागले आहे. या प्रकल्पाला 20,000 कोटी रुपये खर्चून बनवले जात आहे. प्रकल्पामध्ये दिल्लीतील सत्तेचे केंद्र असलेल्या नॉर्थ ब्लॉक, साऊथ ब्लॉक, राष्ट्रपती भवन, राजपथ आणि 3 किलोमीटर पर्यंत पसरलेल्या इमारती आहेत. सेंट्रल विस्टा योजनेअंतर्गत संसद भवनाजवळ एक नवीन त्रिकोणी आकाराची संसद बनवली जाईल. याची आधारशिला मोदीने 10 डिसेंबर 2020 रोजी रचली होती. फक्त या नव्या संसद भवनाच्या इमारतीसाठीच 971 कोटी रुपये खर्च केले जात आहेत. 2022 मध्ये 75 व्या स्वातंत्र्यदिनाच्या अगोदर याचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पा अंतर्गत प्रधानमंत्र्यासाठी नवीन भव्य घर आणि ऑफिस सुद्धा बनवले जाणार आहे. याशिवाय खासदारांसाठी व्ही.आय.पी. लाऊंज (विश्रामखोली) आणि कार्यालयीन जागाही बांधली जाणार आहे. या प्रकल्पाची जबाबदारी मोदीच्या विश्वासातील बिमल पटेल यांना मिळाली आहे. यांनीच काशी विश्वनाथ आणि साबरमती रिव्हर फ्रंट प्रकल्प राबवले होते.

पान 6 वर

# दुसऱ्या लॉकडाऊनमध्ये सुद्धा बांधकाम कामगार बेहाल!

## जमिनीवरील वास्तव: लॉकडाऊन काळात मिळाली ना मजुरी, ना राशन, ना व्हॅक्सिन, ना शिक्षण, ना सरकारी मदत !

✎ शब्दांकन: नेहा

कोरोना संक्रमणाची दुसरी लाट रोखण्यासाठी सरकारने लागू केलेल्या टाळेबंदीमुळे हातावरचे पोट असलेल्या बांधकाम कामगारांना मोठा फटका बसला आहे. बिगुल तर्फे काही मजुर अड्ड्यांवर केलेल्या पाहणीत आणि कामगारांशी केलेल्या संवादामधून दिसणारी वस्तुस्थिती शब्दांकन करून येथे देत आहोत.

कोरोना साथीच्या काळातही पुण्यातील अप्पर डेपो भागातील कामगार सकाळी 7 वाजता डब्यात चटणी भाकर घेऊन मजूर अड्ड्यावर येत असतात व कुठेतरी काम मिळेल या आशेने कामाची वाट बघत असतात. यापैकी काही कामगारांशी संवाद केला असता खालील परिस्थिती दिसून आली.

मजूर अड्ड्यावरील बिगारी कामगार किशोर कांबळे म्हणतात की "आम्हाला मोठ्या मुश्किलने आठवड्यातून एखादे काम मिळाले तर मिळाले, नाहीतर खाली हातांनीच घराची वाट धरावी लागते. ठेकेदारी पद्धतीचे काम असल्यामुळे ठेकेदार कामावर कुठे घेऊन जाईल, किती तास काम करून घेईल, कशाप्रकारचे काम असेल याची कसलीही माहिती नसते, दिवसभर हाड-तोड मेहनत करूनही ठेकेदार मजुरी देईल की नाही याची कुठलीच शाश्वती नसते. अशा परिस्थितीतच आम्हाला कुटुंबाचा सांभाळ करावा लागतो. घरात खायला अन्न नसल्यामुळे खिशात पैसे नसल्यामुळे मुलाबाळांसह उपासमारीने मरण्याची वेळ आमच्यावर आली आहे. राशन कार्ड असूनसुद्धा राशन मिळत नाही. राशनच्या दुकानात गेल्यावर राशन संपेलेलं असते किंवा राशन कार्ड मध्ये काही त्रुटी काढून राशन पासून वंचित ठेवल्या जाते."

वयाने ज्येष्ठ कामगार राजेश नेवल बिगारी काम करून भाड्याच्या घरात राहतात. राजेश नवल म्हणाले की "भाड्याच्या घरात राहत असल्यामुळे घरमालक घरभाडे भरण्यासाठी दबाव आणत आहेत. कुणाकडून कसेतरी पैसे उधार घेऊन घरभाडे चुकवावे लागत आहे. वर्षभराचे थकीत वीज बिलही 20-30 हजारांवर येऊन पोहचले आहे.पहिल्या लॉकडाऊनसाठी घेतलेले कर्ज अजून फिटत नाहीतर पुन्हा कर्ज घेण्याची वेळ आली आहे. डोक्यावरचा कर्जाचा डोंगर वाढतच चालला आहे. सरकारने आश्वासन दिले होते की घरभाडे, वीज बिल माफ करू पण अजूनही सरकारने कुठलेच भाडे माफ केल्याचे दिसत नाही. ह्या सगळ्या पोकळ घोषणा सरकारं करतच राहतात."

बिगारी कामगार चंद्रकला गायकवाड यांच्या शब्दात सांगायचे तर, "लॉकडाऊन मध्येही ठेकेदार मजुरी बुडवत आहेत. ठेकेदाराला पैसे मागण्यासाठी फोन केला तर फोन बंद करत आहेत. काही ठेकेदार काम करवून घेतात आणि काम झाल्यावर पैसे देत नाहीत किंवा पैसे आज देतो, उद्या देतो, किंवा सध्या आमची पण तंगी आहे असे करत पैसे बुडवत आहेत."

संगीता अरेंनकरी यांच्या अनुभवानुसार "घरात मुलांची फी भरायला पैसे नसल्यामुळे मुलांचे शिक्षण थांबले आहे. सरकारने ऑनलाईन शिक्षण पद्धती लागू तर केलीच पण कामगारांच्या मुलांकडे अँड्रोइड मोबाइल नसल्यामुळे मुले ऑनलाइन शिक्षण कसे घेतील याचा कुठलाही विचार केलेला नाही."

इतर अनेक कामगारांना आरोग्य सुविधांविषयी विचारले असता, त्यांच्याकडून आले की आज घरात कुणाला काही आजार झालाच किंवा कुणाला कोरोना झालाच तर आजाराने मरण्याचीच वेळ येणार आहे. वस्तीमध्ये एकही सरकारी आरोग्य केंद्र उभे केलेले नाही. आरोग्याची कुठलीच सुविधा वस्त्यांमध्ये केलेली नाही. साधे लसीकरण केंद्र सुद्धा उभारलेले नाही. सरकारने मागे जाहीर केले होते की 18-45 वर्ष वयोगटाला मोफत लस देऊ, पण अजूनही जवळपास कोणालाच लस मिळालेली नाही, आणि खाजगी दवाखान्यात लस घेण्याइतपत तर कोणाची परिस्थितीच नाही. सरकारने बांधकाम कामगारांसाठी 1,500 रुपये अर्थसहाय्य लॉकडाऊन काळात जाहीर केले होते. 1,500 मध्ये कुटुंब चालवायचं कसं हे सरकारच जाणो, पण हे 1,500 पण कोणापर्यंत पोहोचलेच नाहीत. सरकारने जाहीर केलेली मदत ही अतिशय तोकडी आहे. काम मिळत नाही. पेट्रोलचे भाव, तेलाच्या किमती, सिलिंडर चे भाव प्रचंड वाढले आहेत, अशा परिस्थितीमध्ये कामगारांनी जगावे कसे याचा विचार सरकारला करायचाच नाहीये असे दिसते.

साथींनो

'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लूट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.


• रूम नंबर 209, हिरानंदानी बिल्डिंग-7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043 मो. - 9619039793, 9082861727

• अहमदनगर - 9156323976, 9657590491

• पुणे - 9422308125


## 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

**1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांतींचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.**

**2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.**

**3. 'कामगार बिगुल' स्वतः अश्या चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य लाइनची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य लाइनच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.**

**4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्याच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतीकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.**

**5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.**

**बिगुल व्हॉट्सअ‍ॅप चॅनेल**

**जर तुम्ही आमच्याशी व्हाट्सअ‍ॅप वर जोडून घेऊ इच्छिता, तर या लिंक वर जाऊन आमचा व्हॉट्सअ‍ॅप चॅनेल जॉईन करावा - http://www.marathi.mazdoorbigul.net/whatsapp**

**चॅनेल जॉईन करण्यामध्ये काही समस्या असेल तर या नंबर वर आपले नाव आणि जिल्हा लिहून पाठवावा - 9892808704**



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वतः कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**

**लेनिन**


# कामगार बिगुल

खाजगी वितरणासाठी

| | | |
|---|---|---|
| संपादक मंडळ | : | निखील एकडे, बबन ठोके |
| संपादकीय कार्यालय | : | रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग - 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट), मुंबई 400043 |
| संपर्क | : | 8669735643 , 9619039793 |
| ईमेल | : | bigulakhbar@gmail.com |
| सहयोग राशी | : | रु. 5 (एका अंकासाठी) |
| वार्षिक | : | रु. 100 (टपाल शुल्कासह) |

# सरकारी योजनांच्या निव्वळ पोकळ घोषणा! टाळेबंदीमध्ये कामगार उपाशीच!

✒ अश्विनी

गेल्या दीड वर्षांपासून देशच नाही तर संपूर्ण जगभरात करोना महामारीने थैमान घातलंय. अनियोजित टाळेबंदीमुळे सर्वच प्रकारचे कामधंदे बंद आहेत. मध्यमवर्ग उच्चमध्यमवर्ग यांच्याकडे निदान काही महिने घरी बसून पोट भरता येईल इतकी बचत असते. पण हातावर पोट असलेल्या कामगारवर्गाचं काय? मजूर नाक्यावर जाऊनही काम मिळत नाही, तसेच असंघटित क्षेत्रातल्या कामगारांना पोट भरण्यासाठी कुठला मार्गच शिल्लक राहिला नाही. टाळेबंदी जाहीर करताना सरकारने कामगार-कष्टकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी मोठमोठ्या घोषणा केल्या पण प्रत्यक्षात त्यांची अंमलबजावणी कुठेच होताना दिसलेली नाही. केलेल्या सर्व घोषणा पोकळ आहेत, फक्त कागदावरच आहेत, आणि प्रत्यक्षात मात्र सरकारने कामगार-कष्टकऱ्यांना वाऱ्यावर सोडले आहे! काही कामगारांनी प्रत्यक्ष दिलेली माहिती आणि उपलब्ध आकडेवारीवरून ही स्पष्ट होते.

पुण्यातील अप्पर भागातील घरकाम करणाऱ्या वर्षाताई नुसार गेल्यावर्षी प्रमाणेच यावर्षीही गरीब माणसाचा कुठलाच विचार न करता लॉकडाऊन लावून सरकार मोकळं झालंय. त्यांनी आपली स्थिती सांगितली की कामावर जातो तेथील मालकिणीनेही म्हटलंय की सध्या कामावर येण्याची गरज नाही. करोनाचा धोका वाढलाय तर आम्ही स्वतःच कामं करू. घरात खायला अन्नाचा कण नाही की ऑनलाईन शिक्षणामुळे पोरांच्या शाळांचा ठिकाणा नाही. ठाकरे सरकार 1500 रुपये खात्यावर टाकणार असं ऐकलेलं खरं, पण 4 वेळेस बँकेत जाऊन विचारले तरी अजून काही पैसे आले नाहीत खात्यावर.

अप्परमध्येच राहणाऱ्या 70 वर्षाच्या जनाबाईंनी आपली स्थिती सांगत म्हटले की की अपघाताने त्यांचा नवरा वारला. त्याच अपघातात त्या पांगळ्या झाल्या. स्वतः कमावून खातील अशी त्यांची परिस्थितीच नाही. 40 वर्षाचा मुलगा आहे, पण बिगारी काम करून बायकापोरांचे कसेबसे पाहतो आणि आईचा नंबर शेवटी! त्यांच्या मुलाचंही काम सध्या बंद आहे. राशन दुकानात मोफतचं राशनसुद्धा मिळत नाही कारण राशनकार्ड बंद आहे. पैसाच नाही तर खाणार काय? म्हणून 3 किलोमीटर रोज शिवभोजन केंद्रावर त्या चालत येतात. अपघाताच्या जखमेमुळे पाय खूप दुखतात पण जगण्यासाठी खाण्याची व्यवस्था तर करावीच लागेल असं त्या म्हणतात.

सुप्परमधील रफिक चाचा त्यांचे अनुभव सांगताना म्हणाले “मी रिक्षा चालवतो. लॉकडाऊन मुळे सीट मिळत नाही तर धंदा बंद असल्यासारखाच आहे. गेल्या 6 महिन्यापासूनचं घरभाडे आणि लाईटबील थकलंय. रिक्षाचं निम्मे कर्ज अजून फेडायचं बाकी आहे. सरकारने दोन घास कमवण्याचे सर्वच मार्ग बंद केलेत. सरकारकडून काही पैसे मिळणार होते घर चालवायला. पण तपास केल्यावर कळलं की ती मदत फक्त नोंदणीकृत रिक्षाचालकांना मिळणार आणि माझी तर काही नोंदणी झालेली नाही. नोंदणी कशी करायची याची माहिती पुरवणारं सुद्धा कोणी नाही, आणि करायला जावं तर ऑनलाईन पद्धत जीवघेणी! पार वैताग आलाय असं कुढत जगण्याचा.”

कोणत्याही कामगार वस्तीमध्ये सहजच फिरून विचारपूस केली तरी हजारो कामगार सापडतील जे कुठल्या ना कुठल्या प्रकारे या महामारी आणि टाळेबंदीच्या आगीतून होरपळून निघत आहेत. 2020 मध्ये लागू केलेल्या पहिल्या लॉकडाऊनमध्ये तर मोदी सरकारने जनतेला वाऱ्यावरच सोडले. अनियोजित, अमानुष लॉकडाऊन लागू करून कोट्यवधी कामगारांना उन्हातान्हात, उपाशी-तापाशी पायपीट करवत शेकडो किलोमीटर घरी जायला भाग पाडले. तीन महिने लॉकडाऊन राहिला, आणि या संपूर्ण काळात हातावर पोट असलेले कामगार-कष्टकरी कसे जगतील याची ना मोदी सरकारला पर्वा होती ना ठाकरे सरकारला. या काळात “पंतप्रधान गरीब कल्याण योजने”द्वारे 80 कोटी गरिबांना ‘कवच’ देण्याची घोषणा केली गेली. दारिद्र्य रेषेखालील प्रत्येक व्यक्तीला 5 किलो गहू, 5 किलो तांदूळ, 1 किलो डाळ 3 महिन्यांपर्यंत देण्याचे आश्वासन दिले गेले. वयोवृद्ध, दिव्यांग आणि विधवांना जनधन योजनेद्वारे पुढील 3 महिन्यात 1,000 रुपये दोन भागात देण्याचे कबुल केले गेले. अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी 1.70 लाख कोटींचं पॅकेज गरिबांना देण्याची घोषणा केली. जमिनीवरचा प्रत्यक्ष अनुभव ही सांगतो की यापैकी कोणतीही योजना बोटभर कामगारांपलीकडे कोणापर्यंतही पोहोचलीही नाही. रेशन दुकानात नावावर रेशन आलेलं असलं तरीही तुमच्या कार्डवर शिक्काच नाही, मग तुमचं कार्ड गावाकडचं आहे, तुमच्या कार्डावर दारिद्र्य रेषेची नोंदच नाही, आधार लिंक झालेले नाही, अशी एक ना दोन, असंख्या कारणे देऊन गरजूंपर्यंत तर राशन पोचलेच नाही मात्र राशनवाल्याने स्थानिक नगरसेवक आणि नेत्यांशी संधान साधून उरलेलं राशन कमी किमतीत नेत्यांना विकले. नगरसेवक आणि नेत्यांनी मग त्याच गरजूंना तेच राशन मोफत वाटत, स्वतःची पाठ थोपटून घेत पुढच्या निवडणुकीतल्या मतांची बेगमी पक्की केली. वयोवृद्ध, विधवा आणि अपंग तर मुळातच करोनाच्या आधीपासून पेन्शन मिळवण्यासाठी झटत होते. दारिद्र्य रेषेखालील उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, घरमालकाचे संमतीपत्र अशा असंख्य विविध कागदपत्रांची पूर्तता करू न शकल्याने त्यांना देऊ केलेली 1,000 रुपयांची चिमूटभर योजना सुद्धा कागदावरच राहिली. जून पर्यंत चाललेल्या या लॉकडाऊन मध्ये शिवभोजन केंद्रात थाळीची किंमत 10 वरून 5 रुपये केली. मात्र ती प्रत्यक्षात किती गरिबांपर्यंत पोचतेय याचा कुठलाही लेखाजोखा मिळत नाही. घरमालकाने लॉकडाऊन असेपर्यंत 3 महिने कुठल्याही परिस्थितीत घरभाड्याची मागणी करू नये अशी तोंडी घोषणा करोना ठाकरे सरकार मोकळे झाले. प्रत्यक्षात मात्र ही वसुली मात्र चालूच राहिली. तसेच लाईटबील भरण्याची सक्ती या कठीण काळात केली जाणार नाही असेही ठाकरे सरकारने सांगितले मात्र 3 महिन्यांनंतर नेहमीच्या बिलांच्या 4 पटीने बिलं यायला लागली आणि ती आजपर्यंत तेवढीच येत आहेत. देशाला `आत्मनिर्भर' बनवण्यासाठी 20 लाख कोटींच्या गडगंज रक्कमेचे पॅकेज देऊ करणारी `मन की बात' मोदी शेठने बोलून दाखवली. पण प्रत्यक्षात या पैकी एक दमडी सुद्धा कामगारांपर्यंत पोहोचली नाही.



ऑगस्टनंतर करोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यावर मजूर जेव्हा शहरांकडे परतू लागले तेव्हा ई-पास नसल्याचे कारण सांगत पोलिसांनी सुद्धा त्यांच्याकडून हजारोंची वसुली केली. डिसेंबरमध्ये दुसऱ्या लाटेचा इशारा दुर्लक्षून करोनाला हरवल्याबद्दल जगभरात मोदी स्वतःची पाठ थोपटून घेत होते. मार्च शेवटी दुसरी लाट चालू झाल्यानंतरही दुसऱ्यांदा जनतेला वाऱ्यावर सोडून दुसरे लॉकडाऊन लादले गेले. महाराष्ट्रात ठाकरे सरकारने फेसबुक लाईव्ह मध्ये वारंवार सांगितले की सरकारला जनतेची किती काळजी आहे. मोठमोठ्या घोषणा करत 7 कोटी लाभार्थ्यांना मोफत राशन, 50 लाख मोफत शिवभोजन थाळ्या, श्रावणबाळ, संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी वृद्धापकाळ योजना, इंदिरा गांधी दिव्यांग योजना सारख्या 5 वेगवेगळ्या कल्याणकारी योजनांमधून सुमारे 35 लाख लाभार्थ्यांना 2 महिने प्रत्येकी फक्त 1 हजार रुपये अशी चिल्लर मदत देण्याच्या पोकळ घोषणा केल्या. सोबतच 12 लाख नोंदणीकृत बांधकाम कामगार, 5 लाख फेरीवाले, 12 लाख नोंदणीकृत रिक्षाचालक, 25लाखाच्या आसपास नोंदणीकृत घरकाम कामगारानां प्रत्येकी 1,500 रुपये खात्यावर जमा करण्याचे कबुल केले. इतकंच नाही तर 30 दिवसानंतर पुन्हा ‘लाईव्ह’ येऊन कबुल केलेल्यांपैकी किती योजनांच्या पूर्तता केल्या याची फुशारकी मिरवत मंजूर केलेल्या 3400 कोटी निधीपेक्षा जास्त निधी म्हणजे 3850 कोटी योजनांसाठी खर्च केल्याचे नमूद केले. या सर्व योजनांच्या मुळाशी गेले तर लक्षात येते की विविध सर्वेक्षणांमध्ये दिसून आल्याप्रमाणे एकूण कामगार संख्येच्या 40% लोकांना आपल्यासाठी योजना आहेत हेच माहित नसते, 96% बांधकाम कामगारांची नोंदणीच झालेली नाही. घरकामगारांच्या बाबतीतही **2012 पासून तर घरकामगारांसाठीचे कामगार कल्याण मंडळ अस्तित्वातच नाहिये, मग नोंदण्या होतीलच कुठून?** पुण्यामध्ये एकट्या अप्पर भागामध्ये 5,000 च्या आसपास घरकाम करणाऱ्या महिला राहतात, यापैकी निम्म्या **महिलांना कामगार कल्याण मंडळ माहितच नाही**! नोंदणी न झालेल्या अथवा नूतनीकरण न झालेल्यांची संख्याच 70% पेक्षा जास्त आहे. अशा परिस्थितीत ही आलेली मदत नक्की कोणाच्या खात्यात जमा झाली या प्रश्नाचे उत्तर समजणे अवघड नाही! हीच परिस्थिती रिक्षाचालक, फेरीवाले आणि असंघटित क्षेत्रातील सर्वांनाच लागू होते.

नोंदणी प्रक्रिया अशी की लाभापेक्षा खर्चच जास्त! फक्त ऑनलाईन असलेल्या **विविध नोंदणी** प्रक्रिया ओटीपी आधारित आहेत, आधार कार्ड, मनपा किंवा मालकाचे प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला, अशा विविध कागदपत्रां ना ऑनलाईन भरणे, त्यातही चूक झाली तर अनेक आठवड्यांची प्रक्रिया पुन्हा राबवणे, दरवर्षी नूतनीकरण करणे, मोबाईल-कंप्युटर-इंटरनेटची ओळख नसल्यामुळे पैसे देऊन एजंट करवी काम करवणे, अनेकदा हेलपाटे मारणे आणि हे सर्व झाले तर नोंदणी होऊन हातात काय मिळणार तर शे-पाचशे रुपये. नोंदणी प्रकिया ही कामगारांच्या नोंदणी करिता नसून त्यांना नोंदणी पासून दूर ठेवण्यासाठीच आहे!

शिवभोजनबद्दल तथ्य काय आहे? 307,713 चौरस किलोमीटर क्षेत्रफळ असणाऱ्या महाराष्ट्र राज्यात एकूण 893 शिवभोजन केंद्रे आहेत. म्हणजे जवळपास 15 किलोमीटरच्या अंतरावर एक शिवभोजन केंद्र. पुण्यातच बघता 331 चौरस किलोमीटर क्षेत्रफळात एकूण 97 शिवभोजन केंद्रे आहेत. म्हणजे 10 किलोमीटरची पायी फरफट करून, पुन्हा 10 किलोमीटर चालत जाण्यातच कामगाराची संपूर्ण ऊर्जा नष्ट होते. बहुसंख्य उपाशी लोक त्यामुळे शिवभोजनच्या नादीही लागत नाहीत! शिवभोजन योजना गरिबांसाठी कमी आणि सत्ताधाऱ्यांच्या कार्यकर्त्यांना उद्योगाला लावण्याच्या आणि अनुदानाचे पैसे त्यांच्या खिशात टाकण्याच्याच जास्त कामी येते!

शाळांची फी बद्दलही अशीच स्थिती आहे. शाळा कॉलेजेस पूर्णतः बंद असताना,कॉम्प्युटर लॅब्स, इतर प्रयोगशाळा, शाळेचे ग्राऊंड्स पूर्ण बंद असताना शाळा विद्यार्थ्यांना मात्र फीस साठी वारंवार मागण्या करत आहेत. खरेतर उत्पन्न थांबलेले असताना खरेतर सर्व फी माफ अशीच घोषणा करणे अपेक्षित होते, पण महाराष्ट्र सरकारचा जी.आर. आला आहे की शाळांना लॉकडाऊन असेपर्यंत फी वाढवता येणार नाही आणि उरलेली फी 3 हप्त्यांमध्ये भरता येईल. शाळा मात्र पालकांनी फीस भरली नाही म्हणून घोर अपमान करत आहेत. “फी भरण्याची ऐपत नसेल तर कॉर्पोरेशनच्या शाळेत प्रवेश घ्या” अशा अर्वाच्य शब्दात पालकांची हेटाळणी होत आहे. म्हणजे शासनाचे सर्वच जी.आर. कागदापुरतेच मर्यादित असल्याचे निदर्शनास येत आहे.

तेव्हा राणा भीमदेवी थाटात केल्या गेलेल्या घोषणा या फक्त जनतेला भ्रमात ठेवण्यासाठी आणि लोकरंजकतेसाठी आहेत! वास्तवात कामगार-कष्टकरी जनतेपर्यंत काहीही मदत पोहोचलेलीच नाही! करोना महामारीत सर्वच सरकारी योजनांचे पितळ तर उघडं पडलंच आहे; परंतु हे समजणे आवश्यक आहे की कामगार-कष्टकऱ्यांना खोटी आशा लावत वास्तवात मात्र त्यांना वंचित ठेवण्यासाठीच या योजना बनवल्या गेल्या आहेत!

# भांडवलशाहीची कमाल: कामगार भुकेकंगाल, उद्योगपती मालामाल!

पान 1 वरून

संकट चालूच आहे, त्यामुळे गृहनिर्माण क्षेत्रातील मंदीही चालूच राहणार आहे. याच्या परिणामी बांधकामाचे साहित्य पुरवणाऱ्या प्रचंड मोठ्या अशा स्टील, सिमेंट सारख्या उद्योगांमध्येही तेजीची शक्यता नाही. भांडवली तज्ज्ञांचेच सर्व उपलब्ध अंदाज हे स्पष्ट सांगत आहेत की येत्या काळात अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर मंदच राहणार आहे. थोडक्यात उद्योगांमध्ये वाढ होणार नाही. परिणामी प्रचंड बेरोजगारी आणि बदहालीचा काळ लवकर संपण्याची कोणतीही लक्षणे दिसत नाहीत.

परंतु असे असताना मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक मात्र विक्रमी 52,000 च्या आकड्यावर जाऊन पोहोचला आहे. जमिनीवर उत्पादन ठप्प होत असताना, अनेक उद्योग-दुकाने बंद पडत असताअना, शेअर बाजारात मात्र प्रचंड तेजी आहे. घरी बसून ऑनलाईन शेअर बाजारात फक्त पैसे एकडचे तिकडे फिरवून पैसे कमावण्यामागे लाखो लोक धावत आहेत. या अश्लिल विडंबनेतून हे पूर्वापारचे सत्य तर पुन्हा अधोरेखित होतेच की शेअर बाजार हे आता मुख्यत्वे सट्टाबाजार-जुगारघरं आहेत, आणि वास्तव अर्थव्यवस्थेशी त्यांचा फार कमी संबंध उरला आहे; शिवाय हे सुद्धा दिसून येते की लॉकडाऊन काळामध्ये मोठ्या प्रमाणात पैशातून-पैसा कमावण्याकरिता जगभरातील मोठमोठ्या वित्तीय संस्थांपासून खात्यापित्या वर्गातील सर्वच जण शेअर बाजाराच्या जुगारात हात धुऊन घेण्यासाठी धावत आहेत. अर्थव्यवस्थेमध्ये नफ्याच्या घसरत्या दराचे आर्थिक संकट तीव्र होत आहे, आणि भांडवलदारांकडे पडून असलेले प्रचंड भांडवल उत्पादन विस्ताराच्या प्रक्रियेत गुंतवणे अव्यवहार्य झाले आहे; आणि त्यामुळेच सट्टेबाजी-जुगारी व्यवस्थेकडे भांडवलाचा ओघ वाढत आहे. अब्जाधीशांच्या संपत्तीत तासाला कोटी-कोटींची वाढ होत असताना जनता मात्र बेरोजगारी आणि महागाईने बेहाल आहे.

## प्रचंड वाढती बेरोजगारी

एप्रिल 2020 मध्ये 23 टक्क्यांवर पोहोचलेला बेरोजगारीचा दर दुसऱ्या लॉकडाऊन नंतर सध्या 12 टक्क्यांच्या आसपास आहे. गेल्या तीन दशकांमधील सर्वोच्च बेरोजगारी दरांमध्ये हा दर येतो. सेंटर फॉर मॉनिटरींग इंडियन इकॉनॉमी नुसार दुसऱ्या करोना लाटेदरम्यान किमान 70 लाख लोकांचा रोजगार गेल्याचा अंदाज आहे, तर लॉकडाऊन मुळे मे 2021 मध्ये 1.5कोटी नोकऱ्या गेल्याचा अंदाज आहे. बेरोजगारीचा फटका रोजंदारी काम करणाऱ्यांपासून ते पांढरपेशा वर्गापर्यंत सर्वांना बसला आहे. एप्रिल 2020 ते एप्रिल 2021 या काळात पांढरपेशा वर्गातील जवळपास 50 लाख लोक या काळात बेरोजगार झाले आहेत. मोदी सरकार कितीही थापा मारो, आणि खोटा आशावाद पैदा करो, वास्तवात तर हेच दिसून येते की उद्योग पूर्ण क्षमतेने चालू नाहीत; अनेक कारखाने अजूनही बंद आहेत; नफ्याचा दर वाढवण्याकरिता मजुरीमध्ये कपात सर्वत्र चालू आहे, आणि रोजगार मिळणे अत्यंत दुरापास्त आहे!

## अन्नधान्य उत्पादनात विक्रमी वाढ; तरीही कामगार-कष्टकरी भुकेकंगाल

पोकळ घोषणाबहाद्दर मोदीने पुन्हा एकदा नोव्हेंबर पर्यंत मोफत राशन देण्याची घोषणा केली आहे. जनतेला आता या घोषणांचे सत्य पुरेपूर उमगलेले आहे. दिल्लीमध्ये केलेल्या एका सर्वेक्षणात दिसून आले की 144 राशन दुकानांपैकी फक्त 44 राशन दुकानांवर वाटप चालू होते. जमिनीवरचे सत्य हेच आहे की बहुसंख्य गरिबांपर्यंत राशन पोहोचतच नाहीये. लॉकडाऊनच्या काळात जवळपास 23 कोटी लोक दारिद्र्यरेषेखाली ढकलले गेलेत असा अंदाज आहे आणि दुसऱ्या एका अंदाजानुसार किमान 45 कोटी लोक दारिद्र्यरेषेखाली जगत आहेत. हे विसरता कामा नये, की भारतात दारिद्र्य रेषेची व्याख्याच इतक्या खालच्या स्तराची आहे की तिला गरीबी रेषा न म्हणता भूकबळी रेषा म्हटले पाहिजे आणि त्यामुळेच 45 कोटींचा हा आकडा सुद्धा वास्तवापासून खूप दूर आहे.

हे सर्व तेव्हा झाले आहे, जेव्हा सन 2020-21 मध्ये देशात अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन झाले आहे. देशात 121.5 दशलक्ष टन एवढे तर फक्त तांदळाचे उत्पादन झाले आहे, म्हणजे प्रतिव्यक्ती जवळपास 90 किलो! गव्हाचे उत्पादन 108.8 दशलक्ष टन (प्रतिव्यक्ती 80 किलो), भरडधान्यांचे उत्पादन 49.7 दशलक्ष टन (प्रतिव्यक्ती 36 किलो), डाळींचे उत्पादन 25.6 दशलक्ष टन (प्रतिव्यक्ती 18 किलो) झाले आहे. पण राशनवर धान्य मिळत नाही! देशातील बहुसंख्य गरीब जनता अजूनही आपल्या कुटुंबाचे पोषण करू शकत नाही आणि जागतिक भूक निर्देशांकावर 2020 मध्ये भारत 107 देशांमध्ये 94 व्या स्थानावर आहे. स्पष्ट आहे की देशात पैदा झालेले हे अन्न, देशातील जनतेची भूक मिटवण्यासाठी नाहीये तर त्या अन्नावर ज्यांची मालकी आहे त्या धनाढ्य शेतकरी, कॉर्पोरेट कंपन्या, आडती, व्यापाऱ्यांना नफा कमावता यावा म्हणून आहे.

## दुष्काळात तेरावा महिना - महागाईचा प्रचंड मार!

एकीकडे बेरोजगारी, लॉकडाऊनमुळे बंद झालेले किंवा घटलेले उत्पन्न आणि दुसरीकडे अनेक जीवनावश्यक वस्तूंची महागाई यात कामगार-कष्टकरी वर्ग भरडला जात आहे. डाळींचे आणि खाद्यतेलाचे भाव गगनाला भीडले आहेत. ग्राहक किमतींचा निर्देशांकानुसार महागाईचा दर 6 टक्यांवर जाऊन पोहोचला आहे, ज्यामध्ये खाद्यपदार्थांपैकी डाळी आणि खाद्यतेलाच्या भावांचा महत्त्वाचा वाटा आहे.

या महागाईमागे जी प्रमुख कारणे आहेत त्यात पेट्रोल-डिझेलचे उच्चांकी दर, शेतमालाला दिलेला हमीभाव, काही प्रमाणात काळाबाजारी आणि जागतिक बाजारातील तात्कालिक चढ-उतारांची कारणे स्पष्टपणे दिसून येतात. जागतिक बाजारात कच्च्या तेलाचे भाव उतरलेले असतानाही भारतात मात्र अव्वाच्या सव्वा कर लावून राज्य आणि केंद्र सरकारांनी जनतेच्या खिशातून लाखो कोटी रुपयांची कर वसूली चालू ठेवली आहे. पेट्रोलच्या भावांनी तर आता 100 रुपयांचा विक्रमी टप्पाही पार केला आहे. पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीमुळे एकंदरीत वाहतुकीचा खर्च वाढतो आणि वाहतुकीचा खर्च हा बहुसंख्य वस्तूंच्या उत्पादन खर्चात वाढ करत असल्यामुळे महागाई वाढतेच. दुसरीकडे मोदी सरकारने आंदोलनरत श्रीमंत शेतकऱ्यांना आमिष दाखवत नुकतेच खरीप पिकांच्या हमीभावामध्ये 50टक्क्यांहून जास्त वाढ केली आहे, ज्यात गहू, ज्वारी, बाजरी, मका, तूर, मूग, उडीद, शेंगदाणा अशा सर्वच पिकांना हमीभाव वाढवलेला आहे. सरकारने दिलेल्या हमीभावामुळे बाजारातील भाव वाढतातच आणि महागाईचा बोजा पडतो तो कामगारांच्या माथी. महागाईचा हा बोजा येत्या काही महिन्यात कमी होण्याची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत.

बेरोजगारी, महागाईचा परिणाम आहे की सामान्य लोक आज पूर्वीपेक्षा कमी खात आहेत, मुलांच्या शाळांच्या फी पासून ते औषधपाण्यापर्यंत प्रत्येकी खर्चात कपात करावी लागत आहे. 2012 पासून ते 2018 पर्यंत देशातील एकंदरीत बचतीपैकी घरगुती बचतीच हिस्सा 24 ट्क्क्यांवरून 17 टक्क्यांवर आला होता, थोडक्यात बचत खर्च करून जीवनाच्या गरजा भागवण्याची स्थिती तर गेल्या काही वर्षांपासून बनलेली आहे. लॉकडाऊनमध्ये ही स्थिती अजूनच बिकट झाली. अनेकांच्या आयुष्यभर जपलेल्या बचती लॉकडाऊनमध्ये समाप्त झाल्या, आणि शिक्षण, कौशल्य बाजूला ठेवून आज मिळेल ते काम करण्याचा नाईलाज झालेला आहे.

## भांडवलशाही विषमता वाढवतेच आणि संकटकाळात तर अजूनच

गेल्यावर्षीच्या तिसऱ्या तिमाहीतच देशातील सर्वात मोठ्या 1897 कंपन्यांनी 1.33 लाख कोटी रुपयांची कमाई केली. सगळी अर्थव्यवस्था ‘ठप्प’ असतानाही हे कसे झाले? याचे पहिले कारण आहे वाढत्या बेरोजगारीचा फायदा घेऊन कामगारांची मजुरी घटवून, आणि त्याकरिताच मोठ्या प्रमाणात कायम कामगारांची कपात करत कंत्राटीकरणाचा आश्रय घेऊन. दुसरीकडे जगातील अतिश्रीमंतांकरिता करोना महामारी आणि लॉकडाऊन वेगळी पर्वणी घेऊन आले. त्यांच्याकडे असलेल्या पैशांच्या प्रचंड साठ्याच्या जोरावर लॉकडाऊनमुळे खालावलेल्या स्थितीतील कंपन्या, साधनसंपत्ती विकत घेऊन आणि त्याच सोबत शेअर बाजारातील सट्टेबाजीच्या जोरावर. मोदीनी लॉकडाऊन काळात 12 जून 2020 रोजी आपल्या भांडवलदार मालकांना ‘संकटात संधी’ शोधण्याचा सल्ला दिला होता, ज्याची खरेतर गरज नव्हती कारण भांडवलदार नेहमीच संकटात संधी शोधतच असतात; मग तो कफन विकण्याचा धंदा असो, वा करोना सारख्या रोगामध्ये चढे औषधदर, महागड्या लसी विकण्याचा मार्ग असो.

परंतु करोना सारखी संकटे फक्त अस्तित्वात असलेल्या आजाराच्या लक्षणांना तीव्र करतात, मूळ आजार तर भांडवली उत्पादन व्यवस्थाच आहे. मोदी आपल्या मालकांच्या स्तुतीत कितीही म्हणोत की ‘भांडवलदार संपत्ती निर्माण करतात’, वास्तव हेच आहे की माणसाचा हात लागल्यशिवाय कोणतेही काम होत नाही, कोणतेही माल उत्पादन होत नाही! भांडवली उत्पादन व्यवस्थेत संपत्ती निर्माण करणाऱ्या कामगारांना मिळते ती फक्त जगण्यापुरती मजुरी आणि निर्मित संपत्तीचा राहिलेला मोठा वाटा जातो नफ्याच्या रूपाने मालकांच्या खिशात. विषमता निर्माण करणे हे त्यामुळेच भांडवली उत्पादन व्यवस्थेत होतच राहणार. भांडवली बाजाराच्या स्पर्धेमध्ये काही भांडवलदार हरतात, नष्ट होतात आणि जिंकणाऱ्यांकडे भांडवलाचे केंद्रीकरण आणि संचय वाढतच जातो. करोना सारख्या संकटांच्या काळामध्ये कमी भांडवल असलेल्या भांडवलदारांकरिता धंदा चालवणे, स्पर्धेत टिकणे अवघड होते आणि हे बंद पडलेले उद्योग तुलनेने मोठ्या भांडवलदारांना आयते गिळायला मिळतात. भांडवलशाहीत एक बाजूला कमीत कमी कामगारांकडून जास्त काम करवून घेऊन मालक नफ्याचा दर वाढवतात आणि दुसरीकडे यातूनच निर्माण होणारी बेरोजगारी मजुरी कमी करण्यासाठी दबावाचे कामही करते. तेव्हा भांडवली व्यवस्था बेरोजगारी पैदाही करते आणि बेरोजगारी तिची गरजही असते. करोना सारख्या संकटांच्या काळात, जेव्हा कामगार वर्गावर आजारांचा आणि बेरोजगारीचा दुहेरी मारा सुरू असतो, तेव्हा भांडवलशाहीची आर्थिक संरचना तिच्या सर्वाधिक भीषण रूपात कार्यरत होते आणि कामगार वर्गाच्या रक्ता-घामाचा शेवटचा थेंबही शोषून घेऊ पाहते.

## प्रत्येक गोष्टीला अंत आहे! भांडवलशाहीलाही!

एका बाजूला ऐश्वर्याची बेटं उभी होत असताना, दुसरीकडे पैदा होणारे दारिद्र्याचे महासागर या बेटांना घेरून उभे आहेत. आज एका सशक्त योग्य राजकीय पर्यायाच्या अभावी कामगार चळवळ विखुरलेली आहे, परंतु कोट्यवधी कामगार-कष्टकऱ्यांकरिता असलेली जीवनाची वास्तव दाहक परिस्थिती सतत त्या शक्यतांना जन्म देत राहील ज्या भांडवली व्यवस्थेचा नाश करणाऱ्या एका झंझावाती क्रांतिकारी चळवळीला जन्म देतात. आज कामगार वर्गाचे कोणतेही मोठे व्यापक देशव्यापी आंदोलन अस्तित्त्वात नसताना सुद्धा जनतेच्या विविध हिश्यांच्या हितांकरिता आवाज उठवणाऱ्या, लोकशाही-नागरी अधिकारांकरिता लढणाऱ्या, विद्यार्थी-युवक आंदोलकांवर जे राजद्रोहापासून ते षडयंत्र पर्यंतचे खोटे खटले दाखल केले जात आहेत, आणि मानवाधिकारांना तिलांजली देऊन जनतेचे व कार्यकर्त्यांचे दमन चालू आहे, ते हेच दर्शवतात की सत्तेचा मालक असलेल्या भांडवलदार वर्गाला या भीषण विषमतेची जाणीव आहे आणि म्हणूनच विरोधात उठणारा कोणताही स्वर दाबून टाकण्याचा प्रयत्न चालू आहे. कम्युनिस्ट मॅनिफेस्टोच्या सुरूवातीलाच कार्ल मार्क्स व फ्रेडरीक एंगल्सने म्हटल्याप्रमाणे कामगार वर्गीय क्रांतिकारी चळवळीचे ‘भूत’ अजूनही सत्ताधारी भांडवलदारांना सतावतेच आहे. आंदोलनाच्या या ओहोटीच्या काळात गरज आहे की कामगार वर्गाच्या अग्रदलाने पाय रोवून घट्ट उभे रहावे आणि क्रांतिकारी चळवळीच्या बीजांना खतपाणी घालत कठोर मशागत करत रहावी.

# इलाज आणि आरोग्यरक्षणाचा अधिकार धुडकावून फॅसिस्ट राज्यसत्तेद्वारे मानवाधिकारांचे अभूतपूर्व दमनचक्र सुरूच!

प्रवीण एकडे

पहिल्या करोना लाटेवेळी तुरुंगातील कैद्यांना संसर्ग होऊ नये म्हणून तुरुंगातून सोडले गेले होते. परंतु तेव्हाही आणि आत्ताही राजकीय दमनाचे बळी असलेल्या विविध मानवाधिकारांसाठी, कामगार अधिकारांसाठी, दलित अत्याचाराविरोधात काम करणाऱ्या राजकीय कार्यकर्त्यांना तुरूंगात डांबून ठेवून त्यांचा जीव धोक्यात आणण्याचे काम भांडवली राज्यसत्तेने चालवले आहे. भीमा कोरेगाव प्रकरणात धादांत खोटे आरोप करून, खोटे पुरावे पेरून तुरुंगात टाकलेल्या अनेक कार्यकर्त्यांच्या आरोग्याच्या गंभीर स्थितीकडे दुर्लक्ष करून त्यांना जामीन न मिळू देणाऱ्या मोदी सरकारचे फॅसिस्ट चरित्र पुन्हा ठळकपणे अधोरेखित झाले आहे. यातून दिसून येते की 'लोकशाही' आणि 'मानवतेचे' ढोंग करत नामचीन गुन्हेगारांनाही मोकळे सोडणाऱ्या राज्यसत्तेचे खरे काम जनतेकरिता आवाज उठवणाऱ्या कार्यकर्त्यांचे, जन आंदोलनांचे दमन हेच आहे!

अटकेत असलेल्यांपैकी मानव अधिकार कार्यकर्ते स्टॅन स्वामी हे अनेक दिवसांपासून पार्किन्सन रोगाने ग्रस्त आहेत. या रोगामध्ये पेशंटला स्मृतीनाश होतो आणि आठवेनासे होते. 27 मे ला त्यांना कोरोना झाल्याचेही निदान झाले आहे. आदिवासींच्या हक्कांसाठी पुढाकार घेणाऱ्या स्टॅन स्वामींवर यू.ए.पी.ए. या काळ्या कायद्यासोबतच भारतीय दंड संहिते (आय.पी.सी.) च्या अनेक गंभीर कलमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अनेक महिन्यांपासून जामीन मिळवण्यासाठी कोर्टाचे दार ठोटावणाऱ्या स्टॅन स्वामी यांना कोर्टाने पुन्हा जामीन नाकारला आहे. पार्किन्सन आजाराने ग्रस्त झाल्यापासून स्टॅन स्वामी यांना स्वतःची काळजी सुद्धा घेता येत नाही आहे. चालणे, स्वतःच्या हाताने जेवण करणे यासारख्या सामान्य गोष्टी करण्यास स्टॅन स्वामी आजाराने असमर्थ ठरले आहे. अशी गंभीर शारीरिक स्थिती असणारा व्यक्ती सुद्धा राज्यसत्तेला गंभीर धोका वाटतो! अनेक वेळा जामीन मिळवण्यासाठी प्रयत्न करून सुद्धा सरकारच्या आग्रहामुळे स्टॅन स्वामी यांना जामीन देण्यास कोर्टाने नकार दिला आहे.

स्टॅन स्वामी तळोजा कारागृहात बंद आहेत. तळोजा कारागृहात एकही एम.बी.बी.एस. डॉक्टर उपलब्ध नाही. तीन डॉक्टर आहेत तेही आयुर्वेदिक डॉक्टर आहेत. आज बहुतेक सर्व कारागृहांची वैद्यकीय सुविधांच्या दृष्टीने अशीच अवस्था आहे. कोरोना मुळे आणि मूलभूत वैद्यकीय सुविधांच्या अनुपलब्धतेमुळे अनेक कच्च्या अटकेतील(अंडर ट्रायल) कैद्यांचा मृत्यू झाला आहे. एवढी गंभीर शारीरिक स्थिती असताना आणि तळोजा कारागृहात काहीच वैद्यकीय सुविधा नसताना स्टॅन स्वामी यांना कारागृहात बंद ठेवून सरकार आणि न्यायालय त्यांच्या मानवी अधिकारांचे उल्लंघन करते आहे. ही फक्त स्टॅन स्वामी यांची स्थिती नाही तर असंख्य मानवाधिकार कार्यकर्त्यांची, राजकीय कार्यकर्त्यांची स्थिती आहे ज्यांना मोदी सरकारने सत्तेत आल्यापासून यू.ए.पी.ए. सारख्या दमनकारी कायद्याखाली जेल मध्ये डांबले आहे.

दिल्ली विद्यापीठाचे प्राध्यापक हनी बाबू यांना 28 जुलै ला भीमा कोरेगाव प्रकरणात अटक झाली होती. हनी बाबू हे तळोजा कारागृहात बंद आहेत. हनी बाबू हे कोरोना संक्रमित झाल्यानंतर काही दिवसांनी त्यांच्या डोळ्याला ही संसर्ग झाला. या संसर्गाने त्यांच्या डोळ्याला कायमची इजा होऊन डोळ्याची दृष्टी कायमची जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. हनी बाबू यांच्या कुटुंबाने कारागृह प्रशासन हनी बाबूंना उपचार देण्यास नकार देत आल्याचा अनेक वेळा आरोप केला आहे. अनेक वेळा जामीन मिळवण्यासाठी प्रयत्न केल्या नंतर कोर्टाने हनी बाबू यांना एका खाजगी दवाखान्यात उपचार घेण्याची परवानगी दिली. हनी बाबू यांना त्यांच्या मूलभूत हक्कासाठी सुद्धा अनेक वेळा कोर्टाचे दार ठोठवावे लागले परंतु न्यायालयाकडून त्यांना नेहमी निराशाच मिळाली आहे.

भीमा कोरेगाव खटल्यामध्ये अटक झालेले वर्वरा राव हे 82 वर्षीय मानव अधिकार कार्यकर्ते आहेत. वर्वरा राव यांना या आधी सुद्धा वेगवेगळ्या घटनांमध्ये अटक झाली होती परंतु अनेक वर्षे तुरुंगात राहिल्यानंतर त्यातील बहुसंख्य खटल्यांमध्ये त्यांची निर्दोष मुक्तता झालेली आहे. वर्वरा राव यांना भीमा कोरेगाव हिंसाचार मामल्यात अटक होऊन येत्या ऑगस्ट महिन्यात 3 वर्ष होतील, परंतु इतकी वर्ष उलटूनही त्यांच्यावरील आरोप अजून सिद्ध झालेले नाहीत. आता नुकतेच वर्वरा राव यांना एका नवीन खटल्यामध्ये अटक करून मोदी सरकारने त्यांचा अनेक वर्षे तुरुंगात डांबण्याचा बंदोबस्त केला आहे. वर्वरा राव हे सुद्धा वयाशी संबंधित व्याधींनी अनेक महिन्यांपासून ग्रस्त होते. स्टॅन स्वामी यांच्या प्रमाणेच त्यांनाही स्वतःची काळजी स्वतः घेता येत नाही आहे. अनेक वेळा जामीन मिळवण्यासाठी प्रयत्न केल्यानंतर अखेर त्यांना मुंबई उच्च न्यायालयाने 6 महिन्यांसाठी सशर्त जामीन मिळाला आहे. जामीन देताना न्यायायाने त्यांच्यावर अनेक निर्बंध लादले आहेत. न्यायालयाने त्यांना मुंबईत राहूनच उपचार घेण्याचे आदेश दिले आहेत. तसेच मुंबईत एन.आय.ए. न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात राहून त्यांना बोलावले जाईल तेव्हा तपासासाठी हजर राहण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

वरवरा राव यांना आधीच्या काँग्रेस सरकारने सुद्धा यू.ए.पी.ए. अंतर्गत अटक केलेली आहे. त्यातील बहुसंख्य खटल्यांमधून वर्वरा राव यांची अनेक वर्षे तुरुंगात राहिल्या नंतर निर्दोष सुटका झाली आहे. मोदी सरकार सत्तेत आल्यापासून राजकीय कार्यकर्त्यांचे दमन वाढले असले तरी त्या आधीच्या काँग्रेस सरकारने सुद्धा मानव अधिकार कार्यकर्ते आणि राजकीय कार्यकर्त्यांचे यू.ए.पी.ए. आणि इतर दमनकारी कायद्यांखाली अटक करून दमन केलेले आहे हे आपण विसरता कामा नये. भांडवलदार वर्गाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कुठल्याही पक्षाच्या सरकारकडून राजकीय प्रकरणांमध्ये मानवीय न्यायाची अपेक्षा ठेवणे हे राजकीय मुर्खपणाचेच ठरेल. आता फासीवादी भाजपा सरकार सत्तेत आल्यापासून तर राजकीय कार्यकर्त्यांचे दमन आता मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

भीमा कोरेगाव हिंसाचाराच्या घटनेनंतर मोदी सरकारने अनेक मानवाधिकार कार्यकर्त्यांना लक्ष करत अनेकांना या खटल्यात अटक केली आहे. आजपर्यंत 16 राजकीय कार्यकर्त्यांना या खटल्यात अटक करण्यात आली आहे तर 3 आरोप पत्र दाखल करण्यात आले आहे. आनंद तेलतुंबडेंसह अटक झालेले बहुसंख्य कार्यकर्ते हे भीमा कोरेगाव शौर्य दिवसाच्या कार्यक्रमातच्या आयोजनात सामील नव्हते वा तिथे उपस्थितही नव्हते. तरीही तीन वर्षांपेक्षा जास्त काळ त्यांना विना खटला, विना जामीन तुरूंगात ठेवले गेले आहे. यू.ए.पी.ए. अंतर्गत अटक झाल्यानंतर पुरावे नसतानाही बहुसंख्य राजकीय कैद्यांना अनेक वर्षे तुरुंगात राहिल्या नंतर सुद्धा जामीन मिळत नाही हा आजवरचा इतिहास आहे. या कायद्या अंतर्गत अटकेचे लक्ष्य मानवाधिकार, राजकीय कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात ठरत आले आहेत. यातील बहुसंख्य खटल्यांमध्ये अनेक वर्षे तुरुंगात राहिल्या नंतर निर्दोष सुटका झालेल्यांचे प्रमाण मोठे आहे. फासीवादी मोदी सरकार सत्तेत आल्यापासून तर यासारख्या कायद्या अंतर्गत अटक होणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. यू.ए.पी.ए. सारखे कायदे कुठल्याही प्रकारचा विरोधाचा स्वर दाबून टाकण्याचे सत्ताधारी वर्गाचे हत्यार बनले आहे. नियमित गुन्हेगारी प्रकरणांमध्ये जामीन मिळणे हा एक नियम मानल्या जातो. परंतु यू.ए.पी.ए. अंतर्गत अटक झाल्या नंतर मात्र जामीन मिळण्यासाठी वर्षानुवर्षे वाट बघावी लागते.

एका बाजूला अर्णब गोस्वामी सारख्या सांप्रदायिक विष पेरणाऱ्या आणि मोदी सरकारचे पाय चाटणाऱ्या व्यक्तीच्या, आत्महत्येला प्रवृत करवण्याच्या गंभीर खटल्यातही जामीनाच्या याचिकेवर सुनावणी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालय एका रात्रीत तयार होते आणि दुसरीकडे मात्र मानव हक्क अधिकारांसाठी संघर्ष करणाऱ्या कार्यकर्त्यांना सुनावणीसाठी तारीख ही मिळत नाही. यावरून न्यायालयांचे वर्ग चरित्रही उघड होते. कुठलेही न्यायालय निष्पक्ष नसून ते सत्ताधारी वर्गाच्याच हितासाठीच कार्यरत असते, आणि यु.ए.पी.ए. सारख्या कायद्यांच्या गैरवापरालाच नाही तर वापरालाही अनेक वर्षे परवानगी देत, त्यांना घटनाबाह्य जाहीर न करता, न्यायालयांनी सुद्धा आपला वर्गीय पक्षपात दाखवून दिला आहे.

आज फॅसिस्ट मोदी सरकारच्या दडपशाहीला न जुमानता या सर्व मानवाधिकार कार्यकर्त्यांच्या आणि सर्व राजकीय कार्यकर्त्यांच्या सुटकेसाठी संघर्ष करण्याचे काम सर्व न्यायप्रिय जनतेने हाती घेणे गरजेचे आहे. विचारांची असहमती असू शकते, परंतु सर्वांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी आज आवाज बुलंद करणे गरजेचे आहे.

# जागतिक पर्यावरण दिनाच्या (5 जून) निमित्ताने काही उद्धरणे

अशाप्रकारे प्रत्येक पावलावर आपल्याला जाणीव होते की एखाद्या विजेत्याने विदेशी लोकांवर विजय मिळवावा तसे, एखाद्या बाह्य शक्तीप्रमाणे, आपण निसर्गावर राज्य करत नाही; तर आपण हाडा-मांसा-रक्ता-बुद्धीची माणसं निसर्गाचाच भाग आहोत आणि निसर्गातच अस्तित्वमान आहोत, आणि निसर्गावरील आपले सगळे प्रभुत्व यातच सामावले आहे की निसर्गाचे नियम समजू शकण्याची आणि अचूकरित्या लागू करण्याची इतर सजीवांपेक्षा उजवी अशी आपली क्षमता आहे.

**- फ्रेडरिक एंगल्स, "निसर्गाचा द्वंद्ववाद"**

एखादा संपूर्ण समाज, राष्ट्र अथवा अगदी सर्व अस्तित्वातील समाज जरी एकत्र घेतले, तरी ते पृथ्वीचे मालक होऊ शकत नाहीत. ते फक्त तिचे धारक आहेत, तिचे लाभधारक आहेत, आणि येणाऱ्या पिढ्यांना पृथ्वी अधिक उत्तम स्थितीमध्ये सुपूर्द करणे हे त्यांचे एक सामान्य पालकासारखे कर्तव्य आहे.

**- कार्ल मार्क्स, "भांडवल, खंड 3"**

वर्ग संघर्षाशिवाय पर्यावरणाचा मुद्दा, म्हणजे निव्वळ बागकाम!

**- चिको मेंडिस, ब्राझिली पर्यावरण कार्यकर्ता**

मनुष्य निसर्गाचा भाग आहे... निसर्ग म्हणजे माणसाचे अजैव शरीर - निसर्ग, म्हणजे मानवी शरीराबाहेरील सर्व काही. मनुष्य निसर्गातच जगतो - म्हणजे निसर्ग त्याचे शरीर आहे ज्यासोबत मृत्यूपर्यंत त्याला सतत आंतरक्रिया करणे भाग आहे. माणसाचे शारीरिक आणि आत्मिक जीवन निसर्गाशी जोडलेले आहे म्हणजे थोडक्यात निसर्ग स्वत:शीच जोडलेला आहे, कारण मनुष्य निसर्गाचा भाग आहे.

**- मार्क्स, आर्थिक आणि तत्वज्ञानविषयक हस्तलिखिते 1844**

# सामान्य जनतेच्या प्रेतांवर आणि सगळे लोकशाही नियम-कायदे तोडून उभा केला जात आहे 'सेंट्रल विस्टा'!


पान 1 वरून

2024 पर्यंत हा प्रकल्प पूर्ण झालाच पाहिजे हा मोदी सरकारचा अट्टाहास आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला 100 वर्षे पूर्ण होणे आणि 2024 च्या निवडणुकां अगोदर मोदी सरकारच्या 'गौरवशाली' इतिहासाच्या शिरपेचात अजून एक तुरा रोवला जाणे हे तर याचे उद्दिष्ट आहेच; सोबतच या सोबतच संघाच्या 'हिंदुराष्ट्राच्या' कल्पनेला पुढे नेण्यासाठी भारताच्या मुघल किंवा ब्रिटीश अशा सर्व गैर-हिंदू इतिहासला नाकारत, किंवा झाकोळत संरचनेमध्ये 'शिखर' असणारे एक भव्य स्मारक उभे करणे हे सेंट्रल विस्टा प्रकल्पामागील राजकीय गणित आहे.

भांडवलदारांशी यारी, जनतेशी गद्दारी

नवीन संसद बनवण्यामध्ये आणि संपूर्ण विस्टा प्रकल्प उभारण्यामध्ये जनतेच्या घामाची कमाईच खर्च केली जात आहे. हा प्रकल्प 73 वर्षांच्या स्वातंत्र्याचे एक करुण चित्र आहे. एका बाजूला तर सध्या असलेली संसदच ऐयाशी आणि विलासितेचे प्रतीक आहे. जनतेच्या विरोधात कायदे बनवणाऱ्या या संसदेत बसणारे खासदार तर बहुतांश करोडपती, अरबपती आहेतच; या संसदेच्या कामकाजावर आणि खासदारांवरही दरवर्षी कोट्यवधींची उधळपट्टी केली जाते. 2019 च्या लोकसभा निवडणुकांमध्ये जिंकलेल्या 539 खासदारांपैकी 475 खासदार करोडपती आहेत. यापूर्वी ही संख्या 315 होती. एका अहवालानुसार भाजपच्या 303 खासदारांपैकी 265 करोडपती आहेत. यावर वरताण म्हणून राज्यसभा आणि लोकसभेची एक संयुक्त समिती आहे जी खासदारांच्या पगाराची नियमावली बनवते आणि संसदेतल्या सुविधांवरही लक्ष ठेवते ज्यामध्ये रोजचे खर्च जसे की मेडिकल, टेलिफोन, संसदगृहाचा खर्च सामील असतो. नुकतेच या सर्वांनी आपले स्वत:चे पगार वाढवून घेतले आहेत. आता नव्या नियमावलीनुसार राष्ट्रपतींना महिना 5 लाख रुपये, उपराष्ट्रपतींना महिना 4 लाख रुपये, प्रधानमंत्र्याला महिना 2 लाख रुपये आणि प्रत्येक खासदाराला महिना 1 लाख रुपये पगार मिळेल. याशिवाय प्रत्येक खासदाराला पगाराशिवाय 70,000 रुपये मतदारसंघाकरिता वेगळे मिळतात आणि सेक्रेटरीच्या पगारासाठी रु. 60,000 सुद्धा वेगळे मिळतात. यानंतर हे करोडपती, अरबपती खासदार संसदेत बसून 'तू नंगा-तू नंगा'चा खेळ खेळतात. यानंतर बनवले जातात जनतेविरोधात आणि भांडवलदारांच्या बाजूचे नवे कायदे. या ऐयाश संसदेचे कामकाज चालवायला दर मिनिटाला 2.5 लाख रुपये खर्च होतात, थोडक्यात वर्षाला शेकडो कोटी रुपये! आता हे सांगायची गरज नाही की खासदारांच्या आलिशान जीवनशैलीला लागणारा सगळा खर्च सामान्य कष्टकरी जनतेच्या मेहनतीच्या कमाईतून वसूल केलेल्या टॅक्स मधूनच केला जातो!

हे सगळे त्या देशामध्ये केले जाते जिथे जुलै 2019 मधील विश्व खाद्य संघटनेच्या अहवालानुसार 19 कोटी 44 लाख लोक अल्पपोषित आहेत, म्हणजे देशातील प्रत्येक सहाव्या व्यक्तीला पुरेसे पोषण मिळत नाही. याचप्रकारे जागतिक भूक निर्देशांका प्रमाणे 2019 मध्ये भूक आणि कुपोषणाच्या मामल्यात भारत जगातील 117 देशांपैकी 102 व्या क्रमांकावर आहे, जिथे श्रीलंका (66), बांग्लादेश (88)आणि पाकिस्तान (94) सुद्धा आपल्यावर आहेत. भारत सरकारचे आकडे याला दुजोरा देतात. भारताच्या 73 वर्षांच्या स्वातंत्र्यानंतर ही स्थिती आहे. अशामध्ये देश करोनाच्या दुसऱ्या भयावह लाटेचा सामना करत असताना सेंट्रल विस्टा बनवणे अजून गंभीर प्रश्न उपस्थित करते.




रोज रेकॉर्ड प्रमाणात मृत्यू होत आहेत. करोनानंतर काळ्या बुरशीसारख्या आजारांचा सामना करावा लागत आहे. अशामध्ये मोदी सरकारने करोनाच्या दुसऱ्या लाटेमध्ये केलेल्या गैरव्यवस्थापनामुळेच देशातील जनता ऑक्सिजन, लस आणि औषधांच्या कमतरतेशी लढत आहे. या सर्वांदरम्यान कुंभमेळा आणि बंगालच्या निवडणूका घेऊन करोनाला मोठ्या प्रमाणात पसरवण्याचे काम मोदी सरकारनेच केले आहे. या सर्व स्थितीमध्ये सुद्धा सेंट्रल विस्टा प्रकल्पाला 'अत्यावश्यक सेवे'च्या श्रेणीत टाकले गेले, हा एक गंभीर गुन्हाच आहे. पण भाजप सरकारने केलेला हा एकमात्र गुन्हा नाही. देशातील 'लोकशाही' यंत्रणेचा पुरेपूर वापर करत अत्यंत हुकूमशाही पद्धतीने या प्रकल्पाला परवानग्या मिळवल्या गेल्या आहेत आणि देशावर अक्षरश: हा प्रकल्प थोपवला गेला आहे. ज्या पद्धतीने या प्रकल्पाला मान्यता दिल्या गेल्या आहेत त्यातूनही पुन्हा एकदा दिसून येते की भांडवली राज्यसत्तेकरिता 'लोकशाही प्रक्रिया' आणि कायदे हे तोपर्यंतच पाळायचे असतात, जोपर्यंत ते सोयीचे असतात! सोयीचे नसतील तेव्हा राज्यसत्तेच्या सर्व अंगांना - कायदेमंडळ, नोकरशाही, न्यायपालिका, नियम, कायदे - पाहिजे तेवढे वाकवून मार्ग काढलेच जातात!

ब्रिटीशकालीन काळे कायद्यांच्या आधारे, प्रस्थापित कायद्यांना मुरड घालून आणि सगळे नियम धाब्यावर बसवून बनवला जात आहे सेंट्रल विस्टा

नव्या संसदेच्या आणि इतर इमारतींच्या बांधकामाकरिता मोदी सरकारने अनेक कायदे बदलले आहेत, आणि ब्रिटीशकालीन गव्हर्मेंट बिल्डिंग ॲक्ट 1899या काळ्या कायद्याच्या आधारे मनमर्जीने प्रकल्प पुढे ढकलला आहे. तसे पाहिले तर ऐतिहासिकरित्या फॅसिस्ट मोदी सरकारने आपल्या सगळ्या फॅसिस्ट कार्यक्रमाला संविधानमान्य पद्धतींनीच लागू केले आहे. कारण भारताच्या संविधानातच अगोदरपासूनच अशा तरतुदी आहेत ज्या फॅसिस्टांना त्यांचे काम करण्यापासून अडवत नाहीत. जिथे कुठे आपल्या फॅसिस्ट अजेंड्याला पूर्ण करण्यासाठी यांना नियम आणि कायदे तोडण्याची आणि वळवण्याची गरज भासते, तिथे मोदी सरकार अजिबात ढिलाई दाखवत नाही. या प्रकल्पाच्या बाबतीतही हेच झाले आहे.

सेंट्रल विस्टा प्रकल्पाला साकार करण्यासाठी अगोदर टप्प्याटप्प्याने आणि तुकड्यातुकड्यांमध्ये पूर्वतयारी केली गेली. या प्रकल्पाच्या संपूर्ण माहितीला अनेक तुकड्यांमध्ये विभागले गेले जेणेकरून मान्यता देणाऱ्या विविध संस्थांनाही याची पूर्ण माहिती मिळू नये. प्रकल्पाच्या निर्मितीसाठी ज्या सरकारी संस्थांची मान्यता हवी होती, जसे सेंट्रल विस्टा समिती (सी.व्ही.सी.), वारसा संरक्षण समिती (एच.सी.सी.), दिल्ली शहर कला आयोग (डी.यू.ए.सी.) अशा सर्व संस्थांना अनेक तुकड्यांमध्ये प्रकल्पाची माहिती, परवानग्या आणि बदलांची कागदपत्रे दिली गेली, जेणेकरून त्यांना प्रकल्पाची संपूर्ण कल्पना येऊच नये. आत या प्रक्रियेत कोणाला कोणी, किती, आणि काय कागदपत्रे दिली याची माहिती काढणेच दुरापास्त झाले आहे. उदाहरणार्थ, पर्यावरण विभागाची परवानगी मिळवण्यासाठी या प्रकल्पाला जुन्या संसद भवनाच्या एका हिस्स्याच्या रूपात दाखवले गेले, तर सी.व्ही.सी.ला सांगितले गेले की हे नवीन बांधकाम आहे, आणि पर्यावरणाच्या नियमांना बगल दिली गेली. जिथे ज्याने काम होईल ती क्लृप्ती वापरली गेली आहे. अजून एक उदाहरण. इंदिरा गांधी राष्ट्रीय कला केंद्रातील 2,000 झाडे कापली जाणार आहेत पण संपूर्ण प्रकल्पात किती झाडे कापली जाणार आहेत, याची कुठे माहितीच नाही. याचप्रकारे वारसा रक्षण समितीने सर्वोच्च न्यायालयासमोर निर्लज्जपणे घोषित केले की विजय चौक हा या प्रकल्पाचा हिस्सा नाही कारण तसे बोलले असते तर ही माहिती समोर आली असती की विजय चौक 90 वर्षे अगोदर बनवला गेला होता आणि तो नेहमीच सेंट्रल विस्टाचा भाग होता, आणि यामुळे नवीन संसदेला विविध नियमांना सामोरे जावे लागले असते.

दिल्लीमधील स्थापित बांधकाम कायद्यांनुसार कोणत्याही नवीन बांधकामाला दिल्ली महानगरपालिका कौन्सिल (एन.डी.एम.सी.), त्यानंतर वारसा रक्षण समिती, पर्यावरण मंत्रालयाची तज्ञ समिती, आणि शेवटी दिल्ली नागरी कला आयोगाच्या (डी.यू.ए.सी.) मान्यता मिळवणे भाग आहे. या सर्व समित्यांवर भाजपचे नसलेले, इतर पक्षांचे निवडून आलेले लोकप्रतिनिधी, स्वतंत्र तज्ञ यांच्या मान्यता मिळवणे प्राप्त होते. तेव्हा प्रस्थापित कायद्यांच्या मर्यादांमध्ये हा प्रकल्प करणे शक्य नव्हते. विशेषत: ग्रेड-1 च्या वारसा क्षेत्रामध्ये तपासणी आणि सार्वजनिक हानीची जोखीम फार होती. या प्रकल्पाला पूर्ण करण्यासाठी अनेक प्रतिष्ठित इमारती पाडणे, हजारो झाडे कापणे, प्रस्थापित बांधकाम नियमांपलीकडे इमारतींचे बांधकाम, 'सार्वजनिक वापराच्या' जागेचा वापर अशा अनेक गोष्टींकरिता जर परवानग्या घेण्याचा 'लोकशाही' मार्ग वापरला असता, तर अनेक परवानग्या मिळणेच अशक्य होते आणि प्रकल्प पुढे जाणे शक्य नव्हते. त्यामुळे या 'अति लोकशाही' मार्गाला फाटा देणे भागच होते. म्हणून, 'न्युजलाऊंड्री' मध्ये प्रकाशित एका अभ्यासानुसार, खालील विविध हातखंडे वापरून या प्रकल्पाला 'मान्यता' मिळवल्या गेल्या.

वारसा म्हणून घोषित केलेल्या भागामध्ये होत असलेल्या आणि विविध प्रकारची हानी करू शकणाऱ्या या प्रकल्पावर प्रश्नच उपस्थित होऊ नयेत म्हणून दिल्ली महानगरपालिका कौन्सिल (एन.डी.एम.सी.) कडे कोणताही प्रस्ताव मान्यतेकरिता दिला गेलाच नाही. त्याऐवजी केंद्र सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाला (सी.पी.डब्ल्यु.डी.), जो केंद्र सरकारच्या तालावर नाचतो, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या रूपात अधिकार दिले गेले. थोडक्यात एका सरकारी विभागाला निवडून आलेल्या लोकांचे अधिकार प्रदान केले गेले. स्वाभाविकपणे सी.पी.डब्ल्यु.डी. ने मोदी

पान 7 वर

# पुण्यात पिरंगुट येथे नफ्याच्या आगीत होरपळून 17 कामगारांचा मृत्यू

**बिगुल पत्रकार**

07 जून 2021 रोजी दुपारी 03:30 च्या आसपास उरवडे गाव, मुळशी तालुका, पुणे येथील पिरंगुट एम.आय.डी.सी. क्षेत्रातील एस.व्ही.एस. ॲक्वा कंपनीत मालकांने नफेखोरीपायी केलेल्या हलगर्जीपणामुळे आग लागली आणि 17 कामगारांचा जळून मृत्यू झाला! दुपारी कारखान्यात 3 स्फोट झाले व त्यानंतर क्षणार्धात आगडोंब उसळला आणि विषारी धुराने परिसराला व्यापून टाकले असे प्रत्यक्षदर्शी कामगारांकडून समजले. स्थानिक नागरिक आणि अग्निशमन दलाचे बचावकार्य सुरु होईपर्यंत जवळपास 17 कामगार जळून कोळसा झाले होते.

कंपनीत पाण्याच्या शुद्धीकरणासाठी उपयोगात येणाऱ्या क्लोरिन डायऑक्साइडची पावडर आणि गोळ्या बनून पॅकिंग होत असे. कारखान्याच्या मागील बाजूस असणाऱ्या खोलीत पावडरचे पॅकिंग होत असे. ह्या खोलीतील एका पॅकिंग मशीनमध्ये शॉर्ट सर्किट झाल्याने आग लागली. ह्या खोलीतून बाहेर पडण्यासाठी एकच दरवाजा होता. आगीमुळे व धुरामुळे ह्या खोलीतील कामगार बाहेर पडू शकले नाहीत व त्यांचा जागीच जळून मृत्यू झाला. बचावकार्यासाठी आलेल्या अग्निशमन दलाला कारखान्याची मागील भिंत फोडून कामगारांचे कोळसा झालेले मृतदेह बाहेर काढावे लागले.

### नफा वाढवण्यासाठी कामगारांच्या जीवाशी खेळ

कंपनीकडून कामगारांच्या सुरक्षेच्या बाबतीत गुन्हेगारी स्वरूपाचा हलगर्जीपणा झालेला असल्याचे कारखान्याची पाहणी करताना दिसून आले. कारखान्यात बनवले जाणारे केमिकल अत्यंत ज्वलनशील आहे. तरीदेखील आग, स्फोट व इतर कुठल्याही अपघातापासून सुरक्षेसाठी हवी असणारी सुरक्षा व्यवस्था आणि



इमारत परवाने धाब्यावर बसवून कंपनीत काम चालू होते. आपत्कालीन स्थितीमध्ये बाहेर पडण्यासाठी आपत्कालीन मार्ग आखला गेलेला नव्हता. आगीशी लढण्याकरिता कामगारांचे कोणतेही प्रशिक्षण वा फ़ायर ड्रिल झालेले नव्हते. क्लोरिन डायऑक्साइड हे अत्यंत विषारी देखील आहे. ह्या विषारी रसायनाच्या उत्पादनात कार्यरत असणाऱ्या कामगारांना कंपनीने योग्य मास्क, ग्लोव्हज़ इत्यादी सुरक्षाउपकरणे देखील दिलेली नव्हती. अत्यंत ज्वलनशील व विषारी रसायनाच्या कारखान्यात काम करत असूनदेखील कंपनीने एकाही कामगाराचा कुठलाही विमा काढला नव्हता. सर्वच कामगार ठेकेदारी पद्धतीने काम करत होते. कारखान्यात क्लोरिन डायऑक्साईडचा मोठा साठा होता, व ह्या रसायनाने पेट घेतल्यामुळेच आग इतक्या जलदगतीने पसरत गेली. परंतु कंपनीकडे ह्या रसायनाचा साठा करण्याचा परवाना नव्हता असे स्थानिक तहसिलदारांनी कामगार बिगुलशी बोलताना सांगितले. कोरोनाची साथ आल्यानंतर कंपनीने कारखान्याच्या बाहेरील बाजूस सॅनिटायझरचा देखील अवैध साठा केला होता, व आग लागल्यावर ह्या साठ्याने देखील पेट घेतला.

### सरकारचे देखील दुर्लक्ष

दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी एक चौकशी समिती गठित केली आहे. ह्या समितीच्या प्राथमिक अहवालात कंपनीने कारखान्यातील अग्निशमन प्रणाली व सुरक्षेच्या नियमांना धाब्यावर बसवल्याचे म्हटले आहे. तसेच औद्योगिक सुरक्षेचे नियम धाब्यावर बसवून ज्वलनशील रसायनांचा साठा केल्याचे देखील म्हटले आहे. ह्या कारखान्यामध्ये सुरक्षेच्या दृष्टीने 12 महत्त्वाच्या त्रुटी असल्याचे अहवालात म्हटले आहे.

असे असूनही हा कारखाना चालवण्याचा परवाना कंपनीला दिला गेला होता. कंपनीचे मालक निकुंज शहा ह्यांनी पोलिसांना दिलेल्या जवाबामध्ये कारखान्याचे अग्नीसुरक्षा ऑडिट देखील झाले असल्याचे म्हटले आहे. इतक्या त्रुटी असताना, सर्व नियमांची इतकी उघडउघड पायमल्ली होत असताना देखील कारखान्याच्या अग्नीसुरक्षा ऑडिटमध्ये कारखान्यावर कोणतीही कारवाई झाली नाही. कंपनीने कारखान्याच्या आवारात अवैध बांधकाम केलेले होते, तसेच अतिज्वलनशील सॅनिटायझरचा मोठा साठा मागील दीड वर्षापासून केलेला होता. ह्या बाबतीत देखील कोणतीही कारवाई सरकारकडून केली गेलेली नव्हती. गेल्या नऊ वर्षात कारखान्याचे एकही इन्स्पेक्शन झाले नसल्याचे तेथील कामगारांनी सांगितले.

मालकांनी नफ्यासाठी सर्व नियम व सुरक्षाव्यवस्था ह्यांची पायमल्ली चालवली असताना देखील सरकारकडून कोणतीही कारवाई केली गेलेली नाही. उलट ह्या सर्व त्रुटींकडे कानाडोळा करून सरकारने सर्व ऑडिट व परवाने कंपनीला दिले गेले होते. तेव्हा कंपनीचा कामगारांप्रती निष्काळजीपणा हा सरकारच्या हलगर्जीपणामुळेच आहे.

पान 12 वर

# सामान्य जनतेच्या प्रेतांवर आणि सगळे लोकशाही नियम-कायदे तोडून उभा केला जात आहे 'सेंट्रल विस्टा'!

पान 6 वरून

सरकारला हव्या त्या सर्व परवानग्या इमानेतबारे देण्याचे काम केले. सी.पी.डब्ल्यु.डी.ला हे अधिकार देण्याकरिता ब्रिटीश काळात बनलेल्या 'गव्हर्मेंट बिल्डिंग ॲक्ट 1899' चा आधार घेतला गेला. ब्रिटिशांना नेहमीच भारतीय लोक बंड करतील ही भिती वाटत होती, त्यामुळे त्यांनी दिल्लीतील आपल्या सत्तेच्या रक्षणाकरिता हवे तसे बांधकाम करण्याची मुभा हवी होती. त्यामुळे त्यांनी सी.पी.डब्ल्यु.डी. या सरकारी कार्यालयाच्या प्रकल्पांना स्थानिक परवानग्या लागणार नाहीतच अशी तरतूद करून ठेवली होती. ब्रिटिशांचा वारसा नाकारण्याचा दिखावा करत, लोकशाहीचे सोंग आणत, नवीन प्रकल्प उभा करणाऱ्या सरकारचा हा लाडका प्रकल्प अशारितीने ब्रिटीशकालीने काळ्या कायद्यांच्या आधारेच बांधला जात आहे. हे काम मे 2016 मध्ये केले गेले.

यानंतर 2017 मध्ये सरकारी इमारती बांधण्याकरिता 'सार्वजनिक वापराच्या' जागेवर बांधकाम करण्याची परवानगी देणारा आदेश डी.यू.ए.सी. कढून काढला गेला. 2019-2020 मध्ये एक आठवड्याच्या काळात 1292 आपत्तींना फाट्यावर मारून दिल्ली विकास आयोगाने (डी.डी.ए.) या परिसरातील 100 एकरांच्या पेक्षा जास्त जागेला 'सार्वजनिक वापरा' पासून 'सरकारी वापरा'च्या जमिनीत रूपांतरीत करण्याचे काम केले. या प्रक्रियेत वारसा प्रकल्प समितीच्या परवानग्यांशिवाय या भागातील जमीन वापराला 'सार्वजनिक वापराच्या' श्रेणीतून 'सरकारी वापराच्या' श्रेणीत बदलवले गेले; आणि वारसा प्रकल्प म्हणून मान्यता देताना जनसुनावण्या घेतल्याच गेल्या नाहीत.

या सर्व प्रक्रियेदरम्यान कोणत्याही प्रकारचे संपूर्ण तांत्रिक आराखड्यांचे कागद कधीही कोणाला मान्यतेकरिता सादर केलेच गेले नाहीत सविस्तर चिकित्सा होऊ नये म्हणून डी.यू.ए.सी. च्या 'ओपास' (OPAAS) या ऑनलाईन प्रणालीचा वापर केला गेला. म्हणायला 'आधुनिकीकरण' असलेल्या या प्रणालीचा उपयोग आधीपासूनच सविस्तर मान्यता प्रक्रियेला बगल देण्याकरिता, पूर्ण कागदपत्रे जमा न करत मान्यतांसाठी, कागदपत्रे कधीही बदलता येण्याच्या सोयीसाठी केला जात होता. आता तर काम मोदीचे होते! या सर्व प्रक्रियेत 'सलामी स्लायसिंग' (म्हणजे '(उदाहरणार्थ कांद्याचे) उभे छोटे छोटे काप करणे' ) या पद्धतीचा वापर केला गेला आणि माहिती याद्वारे माहिती दडवली गेली.

संपूर्ण प्रक्रियेमध्ये विविध समित्यांवर असलेल्या स्वतंत्र्य व्यावसायिक सदस्य आणि विशेषज्ञांच्या समित्यांना पूर्णत: बगल देऊन, त्यांच्या मतांची नोंद न घेता, त्यांच्या अनुपस्थितीत अशा विविध मार्गांनी निर्णय घेतले गेले आणि कोणत्याही स्वतंत्र विचारांना रेकॉर्डवर येऊच दिले नाही.

यानंतर शेवटी दिल्ली नागरी कला आयोगाने स्वत:चेच नियम धाब्यावर बसवून 'स्थानिक' मान्यतांशिवाय परवानग्या दिल्या. या आयोगाच्या अध्यक्षांना , पी.एन. एस. राव यांना मोदी सरकारने विशेष मेहरबानी दाखवत या प्रकल्पाच्या टेंडर मूल्यांकन समितीचे अध्यक्ष बनवले. मग या महाशयांनी स्वत:च डी.यू.ए.सी. समोर प्रकल्प ठेवला आणि स्वत:चा त्याला मान्यता दिली!

अशाप्रकारे सर्व नियम-कायदे खिशात ठेवून मोदी शेठनी प्रकल्पाला मान्यता मिळवली. यानंतर जेव्हा या प्रकल्पाविरोधात सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली तेव्हा 2:1 च्या बहुमताने कोर्टानेही सरकारच्या बाजूने निर्णय दिला. अपेक्षेप्रमाणे कोर्टाने सरकारच्या अधिकारांमध्ये ढवळाढवळ न करण्याच्या 'न्यायिक सीमे'च्या सिद्धांताच्या आधारावर निर्णय दिला आणि समित्यांनी निर्णय प्रक्रियेत कायदा मोडला की नाही, प्रक्रिया पालन केले की नाही या मुद्यांकडे दुर्लक्ष करण्याचे मान्यच केले! परंतु अल्पमताच्या निर्णयात मात्र उल्लेख आला आहे की जर प्रकियाच योग्य नसेल तर तिचा निर्णय योग्य असू शकत नाही. आता तर गोष्टी अजून हाताबाहेर गेल्या आहेत. दिल्ली उच्च न्यायालयाने या प्रकल्पावर प्रश्न उपस्थित करणाऱ्या एका फिर्यादीवरच 1 लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. तेव्हा आता सेंट्रल विस्टाविरोधात बोलणे सुद्धा गुन्हा ठरवले गेले आहे!

थोडक्यात साम, दाम, दंड, भेद सर्व पद्धती वापरून, ब्रिटिशकालीन काळे कायदे वापरून, लोकशाही प्रकल्पांना धाब्यावर बसवत चालू असलेल्या या प्रकल्पाच्या कामाने हे पुन्हा एकदा दाखवून दिले आहे की भांडवलदारांच्या लोकशाहीमध्ये कायदे, प्रक्रिया हे फक्त तोपर्यंतच असतात जोपर्यंत ते राज्यसत्तेला सोयीचे असतात!

फॅसिस्टांसाठी 'इभ्रतीचा' मुद्दा बनलेला हा प्रकल्प त्या काळात बनवला जात आहे जेव्हा सर्व देश होरपळत आहे. जनता कवडीमोल भावाने मरत असताना अत्याधिक प्राधान्य देऊन, उधळपट्टी करून, जनतेलाच धमकावून, जनतेपासून माहिती लपवून, कायदेबाह्य पद्धतीने बांधला जात असलेला हा मोदी-महाल जनतेच्या प्रेतांवर उभी अशी इमारत आहे जिच्यावर लागलेले रक्ताचे डाग भविष्यातील राज्यकर्त्यांनाही पुसता येणार नाहीत.

# अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या गळचेपीचे माहिती तंत्रज्ञान नियम 2021

✎ रवी

भारतात कार्यरत असलेल्या सोशल मीडिया कंपन्यांना आता नवे माहिती तंत्रज्ञान नियम पाळावे लागणार असून, 27 मे 2021 पासून ते लागू झाले आहेत. 'इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (इंटरमीजियरी गाईडलाईन्स अँड डिजिटल मीडिया इथिक्स कोड) रुल्स 2021' म्हणजेच 'माहिती तंत्रज्ञान नियम 2021' या नावाने हे नियम ओळखले जाणार आहेत. हे नियम केंद्र सरकारने फेब्रुवारी 2021 मध्ये जाहीर केले होते. सोशल मीडिया कंपन्यांना या नियमांनुसार कार्यवाही करण्यासाठी तेव्हापासून तीन महिन्यांची मुदत देण्यात आली होती. या नियमांद्वारे वास्तवात नियमनाच्या नावाखाली केंद्र सरकार सोशल मीडीया, डिजिटल वृत्तसंस्था आणि ओटीटी (ओव्हर-द-टॉप, म्हणजे नेटफ्लिक्स, अमेझॉन प्राईम सारखी माध्यमे) माध्यमांवर नियंत्रण ठेवण्याचे कटकारस्थान करत आहे.

फॅसिस्ट भाजप सरकारांनी केलेल्या जनतेच्या दमनाबद्दल बातम्या देणे, जनतेच्या आंदोलनाबद्दल ट्वीट करणाऱ्या पत्रकार, वृत्तसंस्था, कार्यकर्ते, राजकीय नेते आदींचे ट्विटर खाते बंद करणे, कोरोनाच्या संदर्भातील सरकारवर टिप्पणी करणारे ट्विट्स काढून टाकणे, भाजपच्या संबित पात्राने टाकलेल्या खोटा माहितीला खोटी माहिती म्हणून ध्वजांकित करणे, उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या ट्वीटर खात्यावरील 'ब्ल्यू टिक' (सत्यापित खाते असल्याची खूण) त्यांच्या निष्क्रियतेमुळे हटवणे इत्यादी अनेक कारणांमुळे मागच्या काही महिन्यांमध्ये केंद्र सरकार विरुद्ध ट्विटर असा वाद चालू होता. मोदी सरकारच्या अनेक आदेशांना ट्विटरने जनतेच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या योग्य कारणामुळे फेटाळून लावले होते. परंतु आता केंद्र सरकारच्या अनेक नोटिसा आणि ट्विटर कार्यालयावरील छाप्यांनंतर ट्विटरला नमते घ्यावे लागले आहे. गूगल, फेसबुक हे तर आधीपासूनच या नियमांचे पालन करण्यास उत्सुक होतेच आता त्यात ट्विटरची सुद्धा भर पडली आहे.

या सर्व घडामोडींमागे आहेत नवीन माहिती तंत्रज्ञान नियम 2021.

### काय आहेत हे नियम आणि त्यांचे परिणाम?

सोशल मीडिया कंपन्यांसाठी असलेल्या 'माहिती तंत्रज्ञान नियम 2021' नुसार या कंपन्यांना भारतात तक्रार निवारण अधिकारी नियुक्त करावा लागणार आहे. ट्वीटर, फेसबुक, व्हाट्सअप सारख्या या कंपन्यांना आता, त्यांच्या माध्यमांवरच्या सर्व 'पोस्ट'चे सतत निरीक्षण करणे, तक्रारींची (म्हणजे विशेषत: सरकारने केलेल्या तक्रारींची) दखल घेऊन प्रतिसाद देणे, भारतातील वापरकर्त्यांचा दर महिन्याला नियमपालन अहवाल देणे, स्वनियंत्रणाची प्रणाली आणि इलेक्ट्रॉनिक्स व माहिती-तंत्रज्ञान मंत्रालयाने तयार केलेली निरीक्षण प्रणाली (ओव्हरसाईट मेकॅनिझम) लागू करणे या नियमांनुसार कंपन्यांना बंधनकारक आहे. तसेच कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांना, म्हणजेच सरकारला, हवी ती माहिती व मदत 72 तासांच्या आत देणे या कंपन्यांसाठी बंधनकारक करण्यात आले आहे. एवढेच नाही तर तपासासाठी वापरकर्त्यांची माहिती 180 दिवस साठवून ठेवण्याचा नियमही त्यात जोडण्यात आला आहे. त्याबरोबरच वापरकर्त्यांना स्वेच्छेने स्वतःची ओळख सत्यापित करण्याचा पर्यायसुद्धा द्यावा लागणार आहे आणि अशा वापरकर्त्यांना ओळखण्यासाठी वेगळी खूण सुद्धा त्यांच्या नावापुढे जोडावी लागणार आहे (असे अनेक नियम जे आधी स्वेच्छेने करण्यासाठी होते, नंतर त्यांना अनिवार्य करण्यात आलेले आहे). सर्व सोशल मीडिया कंपन्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता(आर्टिफिशियल इंटेलिजन्स) वापरून संबंधित सोशल मीडीयावर प्रसारित करण्यात येणाऱ्या पोस्ट्सचे निरीक्षण करुन "ध्वजांकित" पोस्ट्स काढून टाकण्याची स्वनियंत्रित प्रक्रिया अमंलात आणावी लागणार आहे. म्हणजे वापरकर्त्यांचे अभिव्यक्तिस्वातंत्र्य आता संगणक प्रोग्राम ठरवणार आहेत. फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, कू यांच्यासारख्या 50 लाखांहून अधिक युझर्स असलेल्या सोशल मीडिया कंपन्यांचा यात समावेश होतो.

यात कळीचा मुद्दा जो सर्वच सोशल मीडिया वापरकर्त्यांवर परिणाम करणारा आहे तो म्हणजे पहिल्या प्रवर्तकाची(ओरिजिनेटर) म्हणजेच एखादा मेसेज कुठून सुरू झाला, त्या व्यक्तीची ओळख सरकारला गरजेनुसार देणे बंधनकारक केले आहे. एन्ड-टू-एन्ड एन्क्रिप्शन म्हणजेच सुरु-ते-शेवट पर्यंत माहितीचे सांकेतिकीकरण करणाऱ्या तंत्रज्ञानाचा वापर करुन सध्या काम करत असलेल्या व्हाट्सअप, टेलिग्राम, सिग्नल सारख्या माध्यमांच्या वापरकर्त्यांच्या निजतेला या नियमामुळे धोका निर्माण झाला आहे. सध्या या तंत्रज्ञानाचा वापर चालू असल्याने दोन वापरकर्त्यांमधील संभाषण कोणालाच वाचता येत नाही. परंतु नवीन नियमांनुसार, मेसेज सुरु करणाऱ्या व्यक्तीची ओळख पटवण्यासाठी या तंत्रज्ञानामध्ये बदल करावा लागणार आहे, ज्याने प्रभावीरित्या सर्व वापरकर्त्यांचे सर्व संदेश सरकारसाठी खुले केले जाणार आहेत!

भारताचे सार्वभौमत्व आणि अखंडत्व यांना धोका, राज्यांच्या सुरक्षिततेला धोका, परराष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध किंवा सार्वजनिक हिताचे आदेश किंवा यापैकी कोणत्याही परिस्थितीत घडलेला गुन्हा रोखणं, शोधणं, तपासणं, शाबित करणं आणि शिक्षा देणं यासाठी केंद्र सरकारने हा नियम लागू करण्यामागचे कारण सांगितले आहे. परंतु ही सर्व दिखाव्याची कारणे आहेत. ऐतिहासिक अनुभवातून समोर आलेले वास्तव आहे की या कारणांनी आजवर इतर कायद्यां अंतर्गत दाखले केलेले खटले मोठ्या प्रमाणात खोटे ठरले आहेत. भारतामध्ये 2010 पासून 11,000 व्यक्तींवर देशद्रोहाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यांपैकी 65% गुन्हे मोदी सरकार सत्तेत आल्यापासून दाखल केले गेले आहेत. हे गुन्हे प्रामुख्याने राजकीय विरोधक, विद्यार्थी, पत्रकार, लेखक आणि शिक्षणक्षेत्रातील लोकांविरुद्ध लावले गेले आहेत. यातून स्पष्टच होत आहे कि नवीन नियम अन्यायाविरुद्ध उठणारे आवाज दाबण्यासाठीच आणले गेले आहेत आणि आता सोशल मीडीया पोस्टचे निमित्त साधून सुद्धा अशाप्रकारचे गुन्हे दाखल करण्याचे सरकार नियोजन करत आहे.



या नियमांची अंमलबजावणी झाली नाही तर या माध्यमांना दिले जाणारे कायद्याचे संरक्षण सुद्धा काढून घेतले जाणार आहे. सोशल मीडियावरील माहितीचे उत्तरदायित्त्व कायद्यानुसार सोशल मीडिया कंपन्यांवर नसते; कारण या कंपन्या फक्त मध्यस्त आहेत आणि मेसेज करणारे व्यक्ती जबाबदार धरले जातात. वापरकर्त्यांमध्ये होणाऱ्या माहितीच्या देवाणघेवाणीसाठी या कंपन्या एक माध्यम आहेत. त्यांना असलेले कायद्याचे संरक्षण काढले, तर या प्लॅटफॉर्म्सवर जे काही पोस्ट होईल, त्याची जबाबदारी या माध्यमांची असेल आणि वादग्रस्त पोस्ट्स साठी त्यांच्यावर गुन्हेसुद्धा लावले जातील. स्वाभाविकपणे या नियमांमुळे या कंपन्यांवर सरकारी कारवाईचे दडपण मोठे असेल आणि अत्यंत अवाजवी मुद्द्यांवरसुद्धा सरकारच्या कोणत्याही आदेशाचे पालन करणे त्यांच्याकरिता बंधनकारक राहिल.

फक्त सोशल मीडियाच नाही तर डिजिटल वृत्तसंस्था आणि ओव्हर-द-टॉप(ओटीटी) यावरसुद्धा नियंत्रण आणण्याचा घाट सरकारने घातला आहे. माहिती तंत्रज्ञान कायद्यामध्ये बसत नसताना देखील डिजिटल वृत्तसंस्था आणि ओटीटी माध्यमांना हे नियम लागू करण्यासाठी बाध्य केले गेले आहे. याचा सर्वात मोठा फटका वायर, स्क्रोल, मिंट, कारवान मॅगझीन सारख्या स्वतंत्र मीडिया आणि तसेच नेटफ्लिक्स, ऍमेझॉन प्राईम, हॉटस्टार सारख्या ओटीटी माध्यमांवर होणार असून पत्रकार आणि कलाकारांच्या मुक्तपणे बातम्या, लेख, व्हिडिओ, इत्यादी बनवून जनतेपर्यंत पोहोचवण्याच्या अभिव्यक्तीस्वातंत्र्यावर गदा आणली जाणार आहे. या वृत्तसंस्था आणि ओटीटी माध्यमांनाही आता तीन स्तरीय नियंत्रण यंत्रणेला सामोरे जावे लागेल. पहिल्या स्तरावरील यंत्रणा माध्यमे स्वतःच स्थापन करतील, दुसऱ्या स्तरावर विविध माध्यमे एकत्र येऊन नियामक मंडळ बनवतील; परंतु सर्वोच्च आणि तिसऱ्या स्तरावर मात्र पूर्णतः सरकारी अधिकाऱ्यांची नियंत्रण समिती असेल जिला या माध्यमांवर एखादी बातमी, व्हिडिओ इत्यादी हटवण्याचा किंवा माध्यमाला बंद ठेवण्याचाही अधिकार असेल!

अभिव्यक्तीस्वातंत्र्यावर होत असलेले हे हल्ले, फॅसिस्ट उभाराचाच एक भाग आहेत. भांडवलशाहीचे आर्थिक संकट जेव्हा तीव्र होते, तेव्हा लोकशाहीचा दिखावा बुरखा सरू लागतो आणि फॅसिझमसहीत विविध प्रकारच्या निरंकुश सत्ताचा पर्याय भांडवलदार वर्गाला प्यारा वाटू लागतो. गेल्या दशकभरापासून भारतात भांडवलदारांच्या नफ्याचा दर घसरत चालल्यामुळे आर्थिक संकट गंभीर होत चालले होते, जे करोनाने तीव्र केले आहे. अशा काळात भांडवलदारांचा नफा टिकून ठेवण्यासाठी कामगार-कष्टकऱ्यांचे शोषण अभूतपूर्व वाढवणे, आणि त्याचवेळी उठणारे असंतोषाचे स्वर दाबणे, लोकशाही-नागरी अधिकारांचे वाढते हनन हे सुद्धा एक महत्वाचे काम बनते. म्हणूनच भांडवलदार वर्ग भाजप सारख्या फॅसिस्ट पक्षांवर जास्त विश्वास ठेवतो आणि सत्तेच्या स्पर्धेत त्यांच्यामागे खंबीरपणे उभा राहतो. नोटबंदी, जीएसटी, कामगार कायद्यातले बदल, जनाआंदोलनांचे दमन, खाजगीकरणासारख्या पावलांमुळे वाढलेला जनतेचा असंतोष करोना काळातील भयंकर अनागोंदीमुळे तीव्र झाला आहे. यामुळेच फॅसिस्ट मोदी सरकार आता पुढील दमनकारी पावले टाकत आहे, आणि यातच उदारवादी भांडवली प्रसारमाध्यमांचेही दमन करत आहे! मोठमोठी भांडवली प्रसारमाध्यमे अभिव्यक्तीस्वातंत्र्यावर कितीही बोलोत, या ना त्या मार्गे या नियमांच्या अंमलबजावणीकडे जाणारच कारण अंतिमतः त्यांचे उद्दिष्ट नफा आहे, लोकशाही नाही; परंतु जनपक्षधर, जनतेच्या निधीवर चालणाऱ्या प्रसारमाध्यमांविरोधात कारवाया आणि दडपशाहीकरिता मोदी सरकारला निश्चित या कायद्यांची आवश्यकता आहे. सोशल मीडिया सारख्या जनसामान्यांना अभिव्यक्तीची दारं उघडी करणाऱ्या माध्यमांवर बंधनं घातली गेली नाहीत तर फॅसिस्ट सरकारला निरंकुशपणे काम करता येणार नाही आणि भांडवलदार वर्गाची निरंकुश सत्ता राखणे कठीण होईल. फॅसिझम त्यामुळेच अभिव्यक्ती स्वातंत्र्याची वाढती गळचेपी करतच जातो. पत्रकारांवर राजद्रोहाचे खटले, फेसबुक सारख्या माध्यमांवरुन सरकारविरोधी पोस्ट हटवणे, फॅसिस्ट गुंडांद्वारे पत्रकारांवर हल्ले या साखळीतलेच पुढचे पाऊल आहेत हे नवीन नियम, जे जनतेच्या अभिव्यक्तीस्वातंत्र्याच्या वाढीव मुस्कटदाबीचा अधिकार आता अधिक 'कायदेशीरपणे' सरकारच्या हातात ठेवत आहेत.

# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (पुष्प चौथे)

आज भारतातच नाही, तर संपूर्ण दुनियेत कामगार भांडवली लुटखोरांच्या वेगवान होत चाललेल्या हल्ल्यांचा सामना करत आहेत, आणि कामगार आंदोलन विखुरलेपण, साचलेपणा, आणि हताशेने ग्रासलेले आहे. अशामध्ये इतिहासाची पाने उलटून कामगार वर्गाच्या गौरवशाली संघर्षांपासून शिकण्याचे आणि त्यांच्यापासून प्रेरणा घेण्याचे महत्व फार वाढते. **आजपासून 150 वर्षे अगोदर, 18 मार्च 1871 ला फ्रांसची राजधानी पॅरिस मध्ये पहिल्यांदा कामगारांनी आपले शासन कायम केले. याला पॅरिस कम्युन म्हटले गेले.** त्यांनी शोषकांद्वारे पसरवल्या जाणाऱ्या या विचारांना ध्वस्त केले की कामगार राज्यकारभार चालवू शकत नाहीत. पॅरिसच्या बहादूर कामगारांनी फक्त भांडवली सत्तेच्या रथालाच उलटवले नाही तर 72 दिवसांच्या शासनाच्या दरम्यान येणाऱ्या दिवसांचे एक छोटे मॉडेल जगासमोर प्रस्तुत केले आणि दाखवले की समाजवादी समाजामध्ये भेदभाव, असमानता, आणि शोषण कशाप्रकारे समाप्त केले जाईल. पुढे चालून 1917 च्या रशियन कामगार क्रांतीने या क्रांतीचा पुढचा टप्पा रचला.

कामगार वर्गाच्या या साहसी कारवाईने फक्त फ्रांसमधीलच नाही तर जगातील भांडवलदारांचे काळीज थरथरले. त्यांनी कामगारांच्या पहिल्या सत्तेला सुरूंग लावण्यासाठी जीवतोड प्रयत्न केले आणि शेवटी कामगारांच्या कम्युनला त्यांनी रक्ताच्या नद्यांमध्ये न्हाऊन काढले. पण कम्युनचे सिद्धांत अमर झाले.

पॅरिस कम्युनच्या पराजयातूनसुद्धा जगातील कामगार वर्गाने महत्वाचे धडे घेतले. पॅरिसच्या कामगारांचे बलिदान कामगार वर्गाला सतत आठवण देत राहील की भांडवलशाहीला नष्ट केल्याशिवाय त्यांना मुक्ती मिळू शकत नाही.

पॅरिस कम्युनला 150 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने 'कामगार बिगुल' च्या या अंकापासून आम्ही जगातील पहिल्या कामगार राज्याच्या सचित्र कथेची सुरुवात करत आहोत. 'मजदूर बिगुल' मध्ये मार्च 2012 पासून प्रकाशित झालेल्या धारावाहिक कथेचा अनुवाद पुढील अंकांमध्ये आम्ही देत राहू. — संपादक मंडळ

**या मालिकेतील पहिल्या दोन पुष्पांमध्ये पॅरिस कम्युनच्या पार्श्वभुमीवर आपण हे पाहिले की, कामगारांनी भांडवलशाही विरुद्ध लढण्याची सुरवात कशी केली आणि चार्टीस्ट आंदोलन तसेच 1848च्या क्रांतिमधून कामगारांची चेतना आणि संघटनबध्दता सतत पुढे कशी वाढत गेली. आपण कामगार वर्गाच्या वैज्ञानिक विचारधारेच्या विकासाबद्दल आणि त्यांच्या पहिल्या आंतरराष्ट्रीय संघटनेबद्दल (इंटरनॅशनल बद्दल) जाणून घेतले. मागील भागात (तिसरे पुष्प) आम्ही पॅरिस कम्युनच्या कहाणीला थोडक्यात वाचकांसमोर मांडले होते. या अंकापासून आपण कम्युनची स्थापना आणि तिचे रक्षण करण्यासाठी कामगारांचा शौर्यमय संघर्ष तसेच कम्युनच्या त्या महान निर्णय आणि कामांबाबत विस्तृत चर्चा सुरु करणार आहोत, जे आजही जगभरातील कामगार वर्गाला मार्ग दाखवत आहेत.**

## अशी झाली पॅरिस कम्युनची सुरूवात



पॅरिसची कामगार जनता या गोष्टी पासून तटस्थ नव्हती की देशाचे शासक काय करत आहेत. ते हे समजून चुकले होते की शत्रूचे सैन्य दरवाज्यावर उभे आहे आणि शासक देशाचे रक्षण करण्यापेक्षा तडजोडी आणि षडयंत्र करण्यात गुंतलेले होते. रस्त्यावर, चहाच्या दुकानांवर लोक एकत्र येवून या स्थितीवर चर्चा करत होते

**1.** पॅरिस कम्युनच्या स्थापनेकडे घेवून जाणाऱ्या घटनाची सुरुवात तेव्हा झाली जेव्हा प्रशिया सोबत झालेल्या लढाईत सप्टेंबर 1870 मध्ये फ्रांसचा वाईट प्रकारे पराभव झाला. साम्राज्य उध्वस्त होताच फ्रांसची राजधानी असलेल्या पॅरिसच्या कामगारांनी तिसऱ्या गणराज्याच्या स्थापनेची घोषणा केली . एक हंगामी सरकार बनले, ज्याला राष्ट्रीय संरक्षक सरकार म्हटले गेले. परंतु कामगारांना हत्यारबंद केल्याशिवाय आणि त्यांना एका प्रभावी लढाऊ दलामध्ये संघटित केल्या शिवाय पॅरिसचे रक्षण केले जावू शकत नव्हते. परंतु पॅरिसच्या कामगारांना हत्यारबंद करणे म्हणजे क्रांतिलाच हत्यार बंद करणे होते. प्रशियाच्या हल्लेखोर सेनेवर पॅरिसचा विजय म्हणजे फ्रांसचा भांडवलदार वर्ग आणि त्याचा चाकर असलेल्या सरकारी अधिकाऱ्यावर फ्रेंच कामगारांचा विजय बनला असता. राष्ट्रीय कर्तव्य आणि वर्गहित यांच्या संघर्षामध्ये तथाकथित राष्ट्रीय संरक्षक सरकारने विदेशी शत्रू समोर गुडघे टेकायला थोडाही संकोच केला नाही, जेणेकरून कामगारांना चिरडणे शक्य व्हावे. पण पॅरिसचे कष्टकरी समर्पण करायला तयार नव्हते. गरीब आणि पीडीत जनतेची मदत आणि मोठ्या प्रमाणात भागीदारीतून उभ्या झालेल्या पॅरिसच्या नॅशनल गार्डने (1789 च्या क्रांतिदरम्यान जनतेमधून उभे झालेले सैन्यदल) शहराचे रक्षण करण्यासाठी कंबर कसली. सप्टेंबर 1870च्या शेवटच्या दिवसात प्रशियाच्या सेनेने पॅरिसची घेरेबंदी केली, जी पाच महिने टिकली. या दरम्यान पॅरिसच्या सामान्य जनतेला भयानक संकटांचा सामना करावा लागला, पण ते हटले नाहीत. भांडवली सरकारचे प्रमुख एडोल्फ थियेर यांनी अपमानास्पद अटींवर प्रशिया सोबत तडजोड केली. तरीही पॅरिसच्या जनतेने समर्पण करण्यास नकार दिला आणि नॅशनल गार्डमध्ये भरती चालूच राहिली.

**2.** थियेरला व्यवस्थित समजत होते होते की जोपर्यंत पॅरिसच्या कामगारांच्या हातात हत्यारं आहेत तोपर्यंत संपत्तीधारी वर्गांच्या – मोठे भूस्वामी, आणि भांडवलदार – यांच्या राज्याला धोका कायम असेल. दुसरीकडे प्रशियाचा शासक बिस्मार्क, फ्रांसच्या जमिनीवरील आपल्या पाच लाख सैनिकांचा खर्च सुद्धा फ्रेंच सरकार कडून वसूल करण्याची मागणी करत होता. थियेर आणि सरकारमधले त्याचे भ्रष्ट सहयोगी गणराज्याची सत्ता पलटवण्याचे षडयंत्र रचत होते, जेणेकरून प्रशियाची मागणी पूर्ण करण्याची जबाबदारी देशाच्या कष्टकरी जनतेवर थोपवण्यात येईल. या षडयंत्रापुढे एकच अडसर होता, तो म्हणजे कामगारांचे पॅरिस. पॅरिसच्या घेरेबंदीसाठी नॅशनल गार्डच्या सैनिकांनी स्वबळावर 400 तोफांचा तोफखाना उभा केला होता. पॅरिसला नि:शस्त्र करणे ही थियेरसाठी यशाची पहिली अट होती. 18 मार्च 1871 ला थियेरने नॅशनल गार्डच्या तोफांसहीत त्याची हत्यारं हिसकवण्यासाठी आपली सेना पाठवली. सकाळ होण्यापूर्वी केल्या गेलेल्या या अचानक हल्ल्यामध्ये काही ठिकाणी सरकारी सैनिकांना काही तोफांवर ताबा मिळवण्यात यश आले; परंतु मोंतमार्त्र या भागात ते पोहचले तेंव्हा नाराज कामगार स्त्रियांच्या जमावाने त्यांना घेरले आणि आपल्याच लोकांवर गोळ्या चालवण्याबद्दल त्यांचा धिक्कार केला. स्त्रियांच्या तुकडीने तोफांचे रक्षण केले आणि चौफेर बातमी पसरवली. थोड्याच वेळात नॅशनल गार्डचे हजारो सैनिक रस्त्यावर आले आणि नगारे वाजवून त्यांनी लोकांना संघटित करायला सुरुवात केली. दुपारी तीन वाजेपर्यंत जगातील सर्वात मोठ्या शहरामधील एक असलेल्या पॅरिस शहरावर हत्यारबंद कामगारानी ताबा घेतला होता.



पॅरिसच्या बाहेरील बाजूला कामगारांचा निवासी भाग होता. जस-जसे या उपनगरातील लोक जागे झाले आणि त्यांना थियेरच्या नीच कृतीबद्दल समजले, तस-तसे आपल्या अवजारांसह आणि हत्यारांसह ते रस्त्यावर उतरले आणि तोफांच्या रक्षणासाठी एकत्र आले. वरील चित्रात स्त्रिया आणि मुलांचा एक गट दोन तोफांना ढकलून मोंतमार्त्र डोंगरावर घेवून चालला आहे.

# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (पुष्प चौथे)

**3.** लवकरच सेनेच्या अन्य तुकड्यांनी सुद्धा बंड केले आणि बंडाची आग इतकी जोमाने पसरली की घाबरून थियेरने आपली उरली-सुरली सेना घेवून सरकारला पॅरिस सोडून वर्साई येथे जाण्याचा आदेश दिला. त्यांच्या सोबत पॅरिसचे सर्व श्रीमंत लोक आणि सरकारी अधिकारी पण पळून गेले. कम्युनार्डांनी त्यांना जावू दिले, जेव्हा की ते त्या सैनिकांना आपल्या पक्षात सामील करू शकत होते. त्यांनी पॅरिस मधून पळून जाणाऱ्या श्रीमंत लोकांना बंदी बनवायला पाहिजे होते. आपल्या या उदारपणाची त्यांना चांगलीच किंमत मोजावी लागली, कारण भांडवलदारानी कामगारांच्या रक्ताचे पाट वाहवण्यात थोडी सुध्दा उदारता दाखवली नाही.



सरकारी फौजेचे जनरल क्लोद मार्टीन लेकॉम्ते यांनी जनतेच्या गर्दीवर गोळीबार करण्याचे तीन वेळा आदेश दिले. या गर्दीमध्ये स्त्रिया आणि मुलेही होती. परंतु थियेरच्या सैनिकांनी गोळीबार करण्यास नकार दिला आणि उलट आपल्याच जनरलना गोळ्या घातल्या. वरील चित्रात जनरल लोकॉम्ते आणि एका अन्य जनरलला गोळी मारताना सैनिक दाखवले आहेत.

आपल्या बग्ग्यांमधून पळताना पॅरिसमधील श्रीमंत लोक. सामान्य जनता या लोकांना पळताना पाहण्यासाठी रस्त्याच्या कडेला गर्दी करत होती आणि त्यांना हे पाहून खूप मजा येत होती की, आपला जीव वाचवत पळताना सुध्दा श्रीमंतांना आपला पोषाख, हॅट, आणि आपले किमती दागिने सांभाळण्याची काळजी लागली होती.






सुरवातीला सरकारी सैन्याने नॅशनल गार्ड आणि जनतेवर हल्ला केला आणि त्यांच्या तोफा हिसकावण्याचा प्रयत्न केला. परंतु जनतेमध्ये क्रांतिकारी चैतन्य निर्माण झाले होते आणि कामगार लढण्यासाठी पूर्णपणे तयार होते. त्यांनी मोक्याच्या जागोजागी रस्त्यांवर अडथळे (बॅरिकेड) लावले होते आणि शेकडोंच्या संख्येने ते लढायला सज्ज झाले होते. वरील आणि खालील चित्रात मोंतमार्त व एका अन्य ठिकाणी आपल्या आघाडीवर खंबीरपणे उभे असलेले कामगार आणि नॅशनल गार्डचे सदस्य दिसत आहेत. सर्व जागी थियेरशी इमानदार असलेल्या सैन्याच्या तुकड्यांना मागे ढकलले गेले.




कम्युन मार्फत प्रसारित पोस्टर वाचताना एक कम्युनार्ड








**4.** 18 मार्च रोजी पॅरिस मध्ये सगळीकडे गगनभेदी गर्जना गर्जत राहिली—“Viva La Commune!” म्हणजे "कम्युन जिंदाबाद!” पण हे कम्युन म्हणजे काय होते?

कम्युनच्या केंद्रीय कमिटीने 18 मार्च रोजी पॅरिमधून प्रसारित केलेल्या आपल्या घोषणापत्रात म्हटले होते की: “शासक वर्गाचे अपयश आणि फितुरी पाहून पॅरिसचे कामगार समजले आहेत की आता वेळ आली आहे सार्वजनिक कार्याची दिशा आपल्या हातात घेवून परिस्थितीवर ताबा मिळवण्याची... त्यांना समजले आहे की सरकारी सत्तेवर आपला ताबा घेवून आपणच आपल्या भाग्याचे सूत्रधार स्व:तच बनणे हे आता त्यांचे अनिवार्य कर्तव्य आणि सर्वोच्च अधिकार आहे!” ही इतिहासातील अभूतपूर्ण घटना होती. त्या वेळेपर्यंत सत्ता साधारणपणे जमिनदार किंवा भांडवलदाराच्या, म्हणजेच त्यांच्या विश्वसनीय लोकांच्या हातात असायची, ज्यांना एकत्र करून सरकार स्थापन केले जात होते. परंतु 18 मार्चच्या क्रांतीनंतर, जेव्हा थियेरचे सरकार आपले सैनिक, पोलीस, आणि ऑफिसर यांना घेवून पॅरिस मधून पळून गेले तेव्हा जनता या स्थितीत स्वामी बनली आणि सत्ता कामगारांच्या हातात पोहचली. परंतु आधुनिक समाजात जोपर्यंत कामगार वर्ग त्याला भांडवलासोबत बांधून ठेवणाऱ्या बेड्या तोडत नाही, तोपर्यंत तो राजकीयदृष्ट्या आपले वर्चस्व प्रस्थापित करू शकत नाही. म्हणूण हे गरजेचे बनले होते की कम्युनच्या आंदोलनाने समाजवादी वळण घ्यावे, म्हणजेच बुर्झ्वा वर्गाच्या वर्चस्वाला, भांडवलाच्या वर्चस्वाला, उलथवण्याचा आणि प्रस्थापित सामाजिक व्यवस्थेला मूळासकट नष्ट करण्याचा प्रयत्न सुरु करावा.

# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (पुष्प चौथे)




28 मार्च 1871 ला टाऊन हॉल मध्ये पॅरिस कम्युनची औपचारिक घोषणा केली गेली.

**5.** 18 मार्च 1871 रोजी पॅरिस कम्युनची स्थापना केली गेली. नॅशनल गाड्र्या केंद्रीय समितीने लगेचच मुनिसिपल (नगर पालिका) सरकार निवडणुकीचे आव्हान केले. परंतु हे स्पष्ट होते की नवे सरकार पूर्वीप्रमाणे निवडलेल्या प्रतिनिधींच्या परंपरागत संसदेसारखे नसून एक नव्या प्रकारचे शासन असेल, जे खरोखर जनतेप्रती जबाबदार असेल, आणि ज्यात जनतेला सरळ भागीदारी असेल. 26 मार्चला कम्युनची निवडणुक झाली. कम्युन परिषदेत 92 सदस्यांमध्ये मोठ्या संख्येने कुशल कामगार, कारागीर तसेच अनेक डॉक्टर, पत्रकार असे व्यावसायिक लोक सामील होते. त्यातील बहुतेक राजकीय कार्यकर्ते होते, ज्यांत सुधारवादी गणतंत्रवादी आणि विविध प्रकारचे समाजवादी सामील होते. सुरवातीला आंदोलन बरेच गोंधळलेले आणि अनिश्चित होते. त्यात असे देशभक्त पण सामील झाले होते ज्यांना आशा होती की कम्युन जर्मनीसोबत परत युध्द सुरू करेल आणि यशस्वी समारोपाकडे नेईल. छोट्या दुकानदारांनी पण कम्युनला समर्थन दिले, कारण कर्ज आणि घरभाडे माफ केले गेले नाही तर नष्ट होण्याची त्यांना भिती होती. सुरवातीला कम्युनला बुर्झ्वा जनतंत्रवादी लोकांची सुद्धा एका मर्यादेपर्यंत सहानुभूति मिळाली होती कारण त्याना भय होते की प्रतिक्रियावादी राष्ट्रीय सभा राजेशाहीची पुर्नस्थापना करेल. परंतु या आंदोलनामध्ये मुख्य भुमिका नि:संशयपणे कामगारांची (विशेष्त: पॅरिसच्या कारागिरांची) होती, ज्यांच्यामध्ये दुसऱ्या साम्राज्याच्या शेवटच्या वर्षांमध्ये सक्रिय समाजवादी प्रचार केला गेला होता आणि ज्यापैकी अनेक कम्युनिस्ट इंटरनॅशनलमध्ये सामील होते.

खाली – कम्युनच्या स्थापनेचा जल्लोश साजरा करताना कष्टकऱ्यांचा जमाव.





RÉPUBLIQUE FRANÇAISE

N° 342 LIBERTÉ — ÉGALITÉ — FRATERNITÉ N° 342

COMMUNE DE PARIS

APPEL

AUX OUVRIÈRES

Le Comité central de l'Union des femmes pour la défense de Paris et les soins aux blessés, chargé par la Commission de Travail et d'Échange de la Commune, de l'organisation du travail des femmes à Paris, de la constitution des chambres syndicales et fédérales des travailleuses unies,

Vu l'identité des chambres syndicales et fédérales des travailleurs, du groupement des ouvrières en sections de métier formant des associations productives libres, fédérées entre elles,

En conséquence, invite toutes les ouvrières à se réunir, aujourd'hui mercredi 17 mai, à la Bourse, à 7 heures du soir, afin de nommer des déléguées de chaque corporation pour constituer les chambres syndicales qui, à leur tour, enverront chacune deux déléguées pour la formation de la chambre fédérale des travailleuses.

Pour tous les renseignements, s'adresser au *Comité de l'Union des femmes*, institué et fonctionnant dans tous les arrondissements.

Siége du *Comité central de l'Union* : rue du Faubourg-Saint-Martin, à la Mairie du X[e] arrondissement.

Vu et approuvé :
*Le Délégué au département du Travail et de l'Échange,*
Léo FRANKEL.

*La Commission exécutive du Comité central.*
NATHALIE LE MEL.
ALINE JACQUIER.
LELOUP.
BLANCHE LEFEVRE.
COLLIN.
JARRY.
ÉLISABETH DMITRIEFF.

IMPRIMERIE NATIONALE. — Mai 1871.




कम्युनच्या आठवणीत सोवियत संघाने प्रसारित केलेले टपाल तिकीट.

**6.** कम्युनच्या निवडणुकीसाठी इंटरनॅशनलच्या पॅरिस युनिट्ने प्रसारित केलेल्या "कामगारांना आवाहन" (उजव्या बाजूला या पत्रकाचे चित्र दिले आहे) या पत्रकावरून कम्युनच्या पुढे काय प्रश्न होते याचा अंदाज येतो. खाली या पत्रकाच्या काही भागाचा अनुवाद दिला आहे.

कामगारांनो: आम्ही संघर्ष केला आहे, आणि आपल्या समतावादी सिद्धांतांसाठी अडचणींना सामोरे गेलो आहोत. जो पर्यंत आम्ही नव्या सामाजिक संरचनेचा पाया घालण्यास मदत करू शकतो, तो पर्यंत आम्ही मागे हटणार नाही.


आम्ही कोणत्या गोष्टीची मागणी केली आहे? कर्ज, देवाण-घेवाण, उत्पादक सहकारी संस्थांच्या समुहांचे काम अशा प्रकारे संघटित केले जावे की ज्यामुळे कामगारांना त्यांच्या श्रमाचे पूर्ण मूल्य मिळण्याची खात्री मिळेल. सगळ्यांना मोफत, एकसारखे आणि संपूर्ण शिक्षण; सभा घेण्याचे, संघटित होण्याचे आणि स्वतंत्रपणे प्रेस चालवण्याचे अधिकार, तसेच व्यक्तीस्वातंत्र्याचे अधिकार; पोलीस, सैन्य, स्वच्छता, गणना इ. चे प्रशासन नागरिकांच्या समुदायांकडून व्हावे.

आतापर्यंत शासन करणारे आम्हाला फसवत आले, आणि आम्हाला आपापसात लढवून आपला स्वार्थ साधत आले.

आज पॅरिसची जनता दूरवर बघत आहे. ती एखाद्या सत्ताधीशाचे बोट धरून चालणाऱ्या लहान मुलाची भुमिका नाकारत आहे आणि (26 मार्च 1871च्या) नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये, जी स्वत: जनतेच्या कृतींचा परिणाम आहे, ते लक्षात ठेवतील की समाज सुध्दा त्याच सिद्धांतावर चालला पाहिजे, ज्या सिद्धांतावर समुदाय आणि संघ चालतात. म्हणून ते ज्याप्रकारे एखाद्या बाह्य शक्तीद्वारे थोपवलेले सरकार व अध्यक्ष यांना बरखास्त करतील, त्याचप्रमाणे ते अशा कोणत्याही नगराध्यक्षाला(मेअर) या पोलीस प्रमुखाला( प्रीफेक्ट) सुद्धा बरखास्त करतील जे जनतेच्या आकांक्षेवर खरे उतरणार नाहीत... आम्हाला विश्वास आहे की रविवार, 26 मार्च रोजी पॅरिसची जनता कम्युनला मत देणे सन्माननीय गोष्ट समजेल.

**– इंटरनॅशनलची संघीय परिषद(पॅरिस) आणि ट्रेड युनियन्सचा महासंघ, 23 मार्च 1871)**

**7.** खूप कठीण हलाखीच्या स्थितीतही काही मोठे निर्णय घेण्यात कम्युनला यश आले. कम्युनने स्थायी सेनेऐवजी, म्हणजेच सत्ताधारी वर्गाच्या हातातील राक्षसी अस्त्राच्या ऐवजी, पूर्ण जनतेला हत्यारबंद केले. तिने धर्माला सत्तेपासून वेगळे करण्याची घोषणा केली, धार्मिक संस्थांना सरकारकडून दिली जाणारी मदत (म्हणजेच पुरोहित-पाद्र्यांचे राजकीय वेतन) देणे बंद केले. जनतेचे शिक्षण खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्ष (सेक्युलर) केले आणि अशा प्रकारे झगाधारी पोलिसांवर तीव्र प्रहार केला. शुद्ध सामाजिक क्षेत्रात कम्युनला खूप कमी काम करता आले, परंतु हे "खूप कमी" काम सुध्दा जनतेच्या, कामगारांच्या सत्तेच्या रूपामध्ये तिचे स्वरूप स्पष्टपणे समोर आणते. बेकरीच्या दुकानांवर रात्रीचे काम करण्यास मनाई केली गेली. दंड लावण्याची व्यवस्था, जी कामगारांवर कायदेशीर दरोड्याचीच व्यवस्था होती, तिला संपवले गेले. शेवटीची गोष्ट, तो आदेश प्रसारित केला गेला, ज्यानुसार मालकांनी सोडून दिलेले, अथवा बंद केले गेलेले कारखाने-मील आणि वर्कशॉप, उत्पादन सुरू करवण्यासाठी कामगार संघाच्या ताब्यात दिले गेले. आणि खऱ्या लोकशाही, कामगारवर्गीय सरकारच्या आपल्या स्वरूपावर जोर देण्यासाठी कम्युनने हे निर्देश दिले की सर्व प्रशासकीय अथवा सरकार अधिकाऱ्यांचे वेतन सामान्य कामगारापेक्षा जास्त नसेल आणि कोणत्याही स्थितीत वर्षाला 6,000 फ्रँकपेक्षा जास्त असता कामा नये. या सगळ्या पावलांनी एकदम स्पष्टपणे दाखवून दिले की जनतेची गुलामी आणि शोषण यावर आधारित जुन्या दुनियेसाठी कम्युन एक घातक संकट होते. यामुळेच बुर्झ्वा समाज तोपर्यंत बेचैन राहिला, जो पर्यंत पॅरिसच्या नगर संसदेवर कामगार वर्गाचा लाल झेंडा फडकत होता.



पॅरिस कम्युन मध्ये सामील झालेले काही अग्रणी कामगार.

**पुढील अंकात: कम्युनने पहिल्यांदा खऱ्या लोकशाही तत्त्वांना व्यवहारात कसे लागू केले.**

# तुमच्या इतिहासाभिमानाचा आणि संस्कृतीचा ऱ्हास

पान 13 वरून

मानवता जास्त आढळेल.

संस्कृतीचे एक अंग आहे कला. कलेमध्ये सुद्धा आम्ही कुठवर सगळ्या समाजाचा विचार केला आणि जुन्या काळातही साधारण जनतेला कलेचा आस्वाद घेता येत होता? हजारो वर्षे संगीताचा उपयोग राजांच्या आणि धनिकांच्या कामुकतेला उत्तेजित करण्यासाठी केला गेला. माणसाला असलेले संगीताचे आकर्षण नैसर्गिक आहे. सभ्यतेच्या सर्वात खालच्या स्तरावरील जातींपासून ते सभ्यतेच्या उत्कर्षाच्या शिखरापर्यंत पोहोचलेल्या जातींपर्यंत सर्वांमध्ये नृत्याबद्दल प्रेम बघायला मिळते. पण फक्त आपलाच देश आहे जो सभ्य म्हणवणाऱ्या जगातील सर्व देशांपुढे स्वत:ला ठेवू पहातो पण या दोन्ही ललित कलांना अशा खालच्या श्रेणीत मोजतो, ज्याला जगात तोड नाही. इंग्लंड, अमेरिका आणि जपानच्या सुशिक्षित घरांमध्ये संगीत आणि नृत्य कलेला सभ्य जीवनाचे एक अंग समजले जाते, पण आमच्या इथे या गोष्टी फक्त वेश्यांसाठी सोडल्या आहेत. यामुळे संगीत आणि नृत्य कला प्रतिष्ठित घरातील स्त्रियांसाठी त्याज्य मानली जाते.

आम्ही सुसंस्कृत आहोत, आम्ही सभ्य आहोत – अशा पद्धतीने आत्मस्तुती केल्याने दुनिया आपल्याला सभ्य म्हणणार नाही. आपल्या जीवनाचे प्रत्येक अंग ज्याप्रकारे कलुषित आणि दिखाव्याने भरलेले आहे, तसे जगात इतर कोणा समुदायाचे नसेल. अजून तर आम्ही माणसासारखे रहायलाही नाही शिकलो. परिसराच्या सफाईच्या बाबतीत तर आम्ही जनावरांपेक्षा मागास आहोत. हिंदुस्तानाच्या गावांसारखी घाणेरडी गावं तर जगात शोधून सापडणार नाहीत. हे तर आमच्या गावांचे वैशिष्ट्यच म्हटले पाहिजे की एक आंधळा माणूसही मैलभर अंतरावरून गाव आले हे ओळखू शकतो, कारण त्याचे नाक विष्ठेच्या दुर्गंधीने फाटू लागते. स्वच्छतेच्या बाबतीत स्वत:ला अद्वितीय समजणारे आमच्या देशाचे हिंदू-मुसलमान मलविसर्जनासाठी व्यवस्था गरजेचीही समजत नाहीत. गावाशेजारची शेतं तर त्यासाठीच आहेत. एखादा विदेशी जर एकदाही भारताच्या गावांमध्ये फिरेल आणि आसपासच्या शेतांमध्ये विखुरलेल्या आणि उन्हात सुकणाऱ्या विष्ठेला पाहिल तर त्याला कसे समजेल की भारतात माणसं राहतात. एकदा माझ्या एका जपानी मित्राला भारतात येण्याची संधी मिळाली. अनेक दिवस या मित्राच्या आतिथ्याचा लाभ मी घेतला होता. त्यांनी ही इच्छा व्यक्त केली की ते भारतातील ग्रामीण जीवन जवळून पाहू इच्छितात. पत्र मिळाल्यावर मी चिंतेत पडलो की यांना कोणत्या गावात घेऊन जाऊ? सर्वात मोठी समस्या तर शौचाची आणि आंघोळीची होती. भारतातील गावांमध्ये खुल्या शेतांशिवाय तर शौचाची सोयच नाही. गावांचे तर सोडाच, शहरात सुद्धा पन्नास हजारांचा महाल बांधणारे शौचालयासाठी पन्नास रुपयांचा 'सेप्टीक टँक' लावणे शिक्षा समजतात. स्नानगृह तर इंग्रज आणि ख्रिस्ती लोकांची गोष्ट आहे. माझ्या चिंतेला पाहून एका मित्राने स्वत:च्या घरी विशेषत: शौचालय आणि स्नानगृह बनवण्याचा मनोदय जाहीर केला. असो, माझ्या जपानी मित्राचे येणे टळले. पण पत्र मिळाल्यावर जे अनेक महिने मी चिंतेत घालवले, त्यातून मला समजले की आपण किती पाण्यात आहोत. मला आश्चर्य वाटते की आपल्या पूर्वजांनी स्वच्छतेसाठी आवश्यक या गोष्टींवर लक्ष का नाही दिले? उलट लक्ष घातले असेलच तर उफराटे, ज्यामुळे स्वच्छतेच्या कामात अडथळेच येतात. विष्ठा उचलण्याच्या कामाला आपल्या देशात सर्वात हलके काम समजले जाते. त्या जातींना तर आम्ही आर्थिक जात्यात भरडून काढले आहे आणि भुकेसमोर त्यांना सन्मान-आत्मसन्मानाचा विचारही मनात येत नाही. पण एक दिवस तो विचार येईल नक्की. त्या दिवशी समाजाच्या केलेल्या सर्वात मोठ्या सेवेच्या बदल्यात प्रचंड लांछन सहन करण्यास ते कसे तयार होतील? आणि जर त्यांनी विष्ठा साफ करणे बंद केले तर आमचे महाल काही दिवसातच सूनसान होणार नाहीत काय? इंग्लंडला जा, तिथे जो व्यक्ती अन्न शिजवतो, तोच शौचालयातही झाडू मारतो. जपानला जा, तर तिथे विष्ठा विकणारे अनेक उच्चभ्रू व्यापारी आहेत. कोणालाही विष्ठा उचलण्यात घृणा वाटत नाही. आमची दुनियाच न्यारी आहे.

कोणत्याही नवीन उपयुक्त गोष्टीचा स्विकार करताना आम्ही आपल्या संस्कृती आणि सभ्यतेला वाखाणणे चालू करतो. हॅट, कोट, पॅंट पाहून कितीतरी लोक नाक मुरडतात, भुवया उंचावतात. ऐपतीपेक्षा जास्त खर्च करायचा असेल तिथे आम्ही काही बोलत नाही; पण ढगळ धोतर किंवा लांबलचक सलवार काय काम करणाऱ्या माणसाला सोयीस्कर असू शकते? अर्ध्या बाहीचा कुडता, विजारी आणि सोलो हॅट (मोठी टोपी) काम करण्यासाठी अत्यंत उपयुक्त पोशाख आहेत. उन्हापासून बचाव करायचा असेल तर सोलो हॅट खूपच कामाची गोष्ट आहे. या गोष्टींना पाश्चात्य युरोपीयन किंवा ख्रिस्ती म्हणून आम्ही झिडकारतो. पण आम्हाला माहितीही नाही की त्या ना पाश्चात्य आहेत, ना युरोपीयन ना ख्रिस्ती. दोनशे वर्षे अगोदर इंग्रजांचे पूर्वजही डोक्यावर जटा वाढवायाचे. त्यांचा पोशाखही चित्रविचित्र असायचा. आधुनिक पोशाख गेल्या दोनशे वर्षांच्या चिंतन आणि परिवर्तनाचा परिणाम आहे. अगदी महायुद्धाच्या अगोदर पर्यंत युरोपातील स्त्रिया लांबलचक केस ठेवत. त्यांच्या पोशाखांमध्ये आत्तापेक्षा बरेच जास्त कापड लागत असे. अनैसर्गिक पद्धतीने आवळून ठेवून त्यांच्या कंबरी बारीक ठेवल्या जात. आज युरोपातील स्त्रियांनी केस कापले आहेत, त्यांचा पोशाख हलका झाला आहे. कंबर बारीक ठेवण्याची जुनी फॅशनही आता राहिली नाही.

स्त्री-पुरुषाचा विवाह का होतो? संतती ही त्यातली मुख्य गोष्ट नाही. वास्तवात आपल्याकडे तर विवाहाचं ओझं आई-वडील जबरदस्तीने आपल्या डोक्यावर घेऊ पाहतात. अपत्यांनी यात लक्ष घालू नये, म्हणून लहानपणीच लग्न लावू पाहतात. हे सुद्धा आमच्या संस्कृतीचे एक मोठे 'उज्ज्वल' अंग आहे की सारे आयुष्या ज्यासोबत घालवायचे आहे, त्यांना एकमेकांच्या सवयी आणि आवडीनिवडींशी परिचय करण्याची संधी सुद्धा न देता कायमस्वरूपी एकमेकांच्या गळ्यात बांधले जाते. अशाप्रकारच्या निरंकुशतेने लाखो कुटुंबांचे जीवन नरकासमान बनवले आहे , तरीही कोणी शिकायला तयार नाही. आई-बाप लग्न लावून देतात, तरीही विवाहित जोडप्याला समाजाचा कडक धाक आहे की त्यांनी तरुणपणात तरी खुलेपणाने एकमेकांना भेटता कामा नये. जगाच्या सर्वच भागांमध्ये विवाहित स्त्री-पुरुषांचा वेगळा बिछाना नसतो. तिथे बिछाना वेगळा असण्याचा अर्थ आहे विभक्त होण्याची तयारी. पण आमच्याकडे बिछानाच वेगळा नाही, तर झोपण्याची जागाही वेगळी असते आणि शिष्टाचार म्हणून पतीने घरच्यांच्या ध्यानात येईल अशा पद्धतीने पत्नीजवळ जावू नये. विवाहित पुरुष आपल्या पत्नीला सोबत ठेवू शकत नाही. वर्षानुवर्षे व्यापार किंवा नोकरीमुळे दूर रहावे लागले तरी अशाप्रकारच्या स्वातंत्र्याला शिष्टाचाराविरुद्ध समजले जाते.

थोडक्यात असे की ज्या इतिहासाचा आणि संस्कृतीचा आम्हाला अभिमान आहे, ती आम्हाला एका सामान्य माणसासारखे जगू देत नाहीत. खाणे-पीणे, रहाणीमान, लग्न, आरोग्य-स्वच्छता, आणि बंधुता - या सर्व बाबतीत ती आम्हाला दुनियेसमोर अवमानित करू पाहतात. आपल्यासाठी सर्वात चांगले हेच असेल की आपल्या इतिहासाला फाडून फेकून द्यावे आणि स्वत:ला संस्कृतीपासून वंचित समजून जगातील इतर समुदायांकडून पुन्हा क, ख, ग शिकणे चालू करावे.

✎ अनुवाद: अभिजित

# मानखुर्द–गोवंडीत औषधांची वाढती नशाखोरी!

पान 15 वरून

धंद्यांच्या मागे आहेत हे सुद्धा खुले गुपित आहे. स्थानिक नगरसेवक, आमदार, खासदार यांच्या कडून या नशेखोरीच्या गंभीर परिणामाची अजिबात दखल घेणे दूरच या धंद्याला आश्रय देणेही यांच्या साठी सुद्धा गरजेचे झाले आहे. निवडणुकीच्या काळात नशेचे सामान इतर वेळेच्या तुलनेत जास्त विकले जाते कारण निवडणुकीच्या वेळेला स्थानिक लोकप्रतिनिधीं नशेखोरांना "वोट बँक" प्रमाणे वापरत असतात.

दुसरीकडे हे समजणे आवश्यक आहे की गरिबांसाठी नशाबाजीची गरज ही जीवनाच्या अत्यंत अमानवीय स्थितींमधून पैदा होते. जेव्हा कामाच्या जागची स्थिती अमानवी असते, जेव्हा रक्त-पाणी आटवूनही घर चालवले जाऊ शकत नाही, जेव्हा फुरसत काय असते ही कल्पनाच जीवनातून गायब झालेली असते, जेव्हा किमान मानवीयतेची वागणूकही दुर्लभ झालेली असते, दुर्गंधी, प्रदूषण हे जीवनाच्या परिस्थितीचे अविभाज्य भाग बनवले गेलेले असतात, जेव्हा माणसाला स्वत:मधला आणि जनावरामधला फरक समजणे अवघड जाईल अशी जीवनाची स्थिती करून ठेवलेली असते, तेव्हा गरीब वर्गाचा एक मोठा हिस्सा नशेच्या मागे जातो. नशेखोरीमागील सामाजिक-आर्थिक संरचनात्मक कारणे विसरली किंवा नजरेआड केली तर नशेच्या समस्येशी लढणे शक्य नाही.

नफ्याकरिता चालणारी बाजारू व्यवस्था एकीकडे दिवसरात्र काम करवून घेऊन कामगारांना उसाच्या चरकातून पिळवटून काढते; तर दुसरीकडे या दैन्यावस्थेचा विसर पडावा म्हणून नशेच्या पदार्थांचा अवैध धंदा करवून कामगार-कष्टकरी-युवक वर्गाच्या मोठ्या हिश्श्याचे मानवी सारतत्त्वही हिरावून घेते. तेव्हा नशेखोरी विरुद्ध लढताना फक्त वैध-अवैध धंद्यांविरोधात लढणे पुरेसे नाही, तर नशाखोरीला जन्म देणाऱ्या अमानवीय भांडवली, नफेखोर व्यवस्थेशी लढणे, कामाचे तास कमी करण्याकरिता, मजुरी वाढवण्याकरिता, एका सन्माननीय जीवनाच्या गरजांच्या पूर्ततेसाठीच्या आंदोलनांद्वारे समाजाच्या संरचनेत क्रांतिकारी परिवर्तनासाठी लढणे आवश्यक आहे.

# नफ्याच्या आगीत होरपळून 17 कामगारांचा मृत्यू

पान 7 वरून

घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर पत्रकारांशी बोलताना विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे ह्यांनी मृत्यूमुखी पडलेल्या कामगारांच्या कुटुंबियांना राज्य व केंद्र सरकारकडून पाच लाखांची मदत देऊ केली असल्याचे सांगितले. परंतु ह्या लाजिरवाण्या तुटपुंज्या मदतीपलिकडे सरकारने दुर्घटनाग्रस्त कामगार व त्यांच्या कुटुंबियांकरिता काहीही केलेले नाही. मृत कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी सरकारतर्फे मदत मिळण्याबद्दल विचारल्यावर नीलम गोऱ्हेंनी 'कुटुंबियांनी स्वयंसेवी संस्थांशी संपर्क करावा' असे उत्तर दिले. भांडवली सरकारांसाठी कामगारांचे जीवन हे पालापाचोळ्यासमान आहे, हेच यातून दिसून येते.

दरम्यान कंपनीचे मालक आणि सीईओ निकुंज शहा ह्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. परंतु इतर अनेक आद्योगिक अपघातांच्या प्रकरणांमधील अनुभवाच्या आधारावर ह्याही प्रकरणाला काही दिवसात अडगळीत टाकून देण्यात येणार असेच दिसते. मालकासोबतच सरकारी यंत्रणेलाही ह्या दोषातून मुक्त करता येणे शक्य नाही. त्यामुळे सर्व संबंधित अधिकाऱ्यांवरही सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करणे गरजेचे आहे; परंतु आजवरचा अशाप्रकारच्या औद्योगिक अपघातांचा, तपासाचा, आणि खटल्यांचा इतिहास पाहता, अशी सर्व प्रकरणे विस्मृतीच्या अडगळीट जमा केली जातात; आणि दीर्घकालीन खटल्यानंतर मालकांना नाममात्र शिक्षा होते, किंवा अनेकदा तर निर्दोषच सोडले जाते; आणि अधिकाऱ्यांना तर आरोपीही बनवले जात नाही. परवाने देण्याच्या, नियमित तपासणीच्या हलगर्जीपणातून झालेल्या पिरंगुटमधल्या अपघाताने पुन्हा एकदा मालक आणि सरकारांमधले साटेलोटे समोर आणून व्यवस्थेचे भांडवली चरित्र अधोरेखित केले आहे.

# तुमच्या इतिहासाभिमानाचा आणि संस्कृतीचा ऱ्हास

राहुल सांकृत्यायन

'इतिहास'-'इतिहास' – 'संस्कृती'-'संस्कृती' चा सारखा ओरडा चालू असतो. असं वाटतं की इतिहास आणि संस्कृती फक्त गोड, सुखकारकच गोष्टी होत्या. तसा तर आपल्या समाजाचा पंचवीस वर्षांचा अनुभव आम्हालाही आहे. हा अनुभवच तर भविष्यातील पिढ्यांसाठी इतिहास असेल, नाही? आज जो अंधकार दिसतोय, तो हजार वर्षे अगोदर आजच्या पेक्षा कमी होता का? आपला इतिहास तर राजांचा आणि पुरोहितांचा इतिहास आहे जे आजच्यासारखेच त्या काळातही मौजमजा करत होते. त्या असंख्या माणसांचा इतिहासात कुठे उल्लेख आहे ज्यांनी आपल्या रक्ताचं पाणी करून ताजमहाल आणि पिरॅमिड बनवले, ज्यांनी आपल्या अस्थिमज्जेनं नूरजहाँला अत्तराचे स्नान करवले, ज्यांनी लाखोंच्या संख्येने प्राण देऊन पृथ्वीराजाच्या महालात संयोगितेला पोहोचवले? त्या असंख्य योद्ध्यांच्या शौर्याबद्दल कधी माहिती होऊ शकते का, ज्यांनी सन सत्तावनच्या स्वातंत्र्य लढ्यात आपले प्राण अर्पण केले? दुसऱ्या देशातील लुटखोरांची मोठमोठी स्मारके बनली, पुस्तकांमध्ये त्यांच्या कौतुकानं पानं भरली. गेल्या महायुद्धातच कोट्यवधींनी बलिदान दिले, पण इतिहास त्यांच्यापैकी कितींबद्दल कृतज्ञ आहे?

इतिहास आपल्या समाजाच्या जुन्या बेड्यांना मजबूत करतो. इतिहास आपल्या मानसिक स्वातंत्र्याचा सर्वात मोठा शत्रू आहे. इतिहास आपल्या जुन्या शत्रुत्वाला आणि झगड्यांना सतत ताजेतवाने करत राहतो. हजारो वर्षांपासून माणसाचा घोर शत्रू सिद्ध झालेला धर्म तर बऱ्यापैकी इतिहासावरच टिकलेला आहे. विश्वामित्र असो वा वशिष्ठ, मनू असो वा याज्ञवल्क्य, व्यास असो वा पतंजली, नानक असो वा कबीर, मोझेस असो वा येशू - सर्व पन्नासेक वर्षे जगले. न जाणे किती लोकांचे मन त्यांनी दुखावले असेल, किती जणांचा अधिकार हिरावला असेल, किती दास-दासी विकत घेऊन आयुष्यभर त्यांच्याकडून पशुसारखे काम करवले असेल. आपल्या मालकांच्या आणि अन्नदात्यांच्या चापलुसीमध्ये किती कुकर्म केले असतील. यशस्वी दरोडेखोरांचे आणि खून्यांचे गौरवीकरण करण्याची जी प्रवृत्ती दिसून येते, तिच्यातून दिसून येते की इतिहासात वीरपुजेमध्येही तिचा मोठा हिस्सा राहिला असेल.

हिंदुंच्या इतिहासात रामाचे स्थान मोठे आहे. आजकाल आपले मोठे नेते, गांधीजी, सदानकदा रामराज्याचा दाखला देत असतात. ते रामराज्य कसे असेल जिथे बिचाऱ्या शंबुकाचा एवढाच गुन्हा होता की तो धर्मप्राप्तीकरिता तपस्या करत होता आणि या कारणाने रामासारख्या अवतार धर्मात्म्याने त्याची मुंडी छाटली? ते रामराज्य कसे असेल जिथे एका माणुस फक्त बोलला म्हणून रामाने गर्भवती सीतेला जंगलात सोडले? रामराज्यात दास-दासींची संख्या कमी नव्हती. अठराव्या-एकोणीसाव्या शतकापर्यंत जगात गुलामीची पद्धत किती कृरपणे अस्तित्वात होती याबद्दल आपल्याला बरीच माहिती आहे. त्याकाळी स्वेच्छेने स्वत:ला आणि मुलाबाळांना विकले जात नव्हते, उलट समुद्र आणि नदीकिनारी असलेल्या गावांमध्ये माणसांना पकडून आणण्यासाठी हल्ले केले जात. डाकू गावावर छापा मारत आणि धनासकट तिथल्या काम करण्यालायक माणसांनाही धरून घेऊन जात. दरवर्षी पोर्तुगीज डाकू अशाप्रकारचे हजारो गुलाम पकडून बर्माच्या अराकन प्रदेशात घेऊन जात. रामराज्यात या प्रकारची लूट आणि दरोडेखोरी नसेल पण दास-प्रथा तर नक्कीच होती. आत्ता दहा-बारा वर्षेच झाली असतील की हिंदूंना अभिमान वाटतो त्या नेपाळच्या राजाने, दास-प्रथा समाप्त करवली आहे. मिथिलेत अजूनही कितीतरी घरांमध्ये कागदपत्रे आहेत ज्यांमध्ये बहियांच्या (दास) खरेदी-विक्रीच्या नोंदी आहेत. दरभंगा जिल्ह्याच्या तरोनी गावात (बहेडा ठाणे) दिगंबर झा यांच्या पणजोबांनी दुसऱ्या कोणत्या तरी मालकाकडून मँडर हमालाच्या आजोबांना विकत घेतले होते आणि दिगंबर झाने पन्नास रूपये नफ्याला त्यांना विकून टाकले होते. तीन पिढ्या अगोदर पर्यंत इंग्रजी राज्यात सुद्धा ही प्रथा चालूच होती आणि सर्व धार्मिक हिंदू आणि मुसलमान जेव्हा आपल्या मनुस्मृतींमध्ये आणि हदीस मध्ये गुलामांवर मालकांच्या हक्कांबद्दल वाचतात, तेव्हा त्यांच्या तोंडाला पाणी सुटल्याशिवाय रहात नाही.



चला, रामराज्यातील दासप्रथेवर एक नजर टाकूयात. एक साधारण बाजार आहे जिथे फक्त दास-दासींची विक्री होते. लाखभर झाडे असलेली बाग आहे. खाण्यापिण्याची दुकानं सजलेली आहेत. शेळ्या-मेंढ्या आणि शिकारीच्या जनावरांव्यतिरिक्त उच्चवर्णीय आर्यांचे जेवण आणि पंचांमृतासाठी गोमांस विशेष पद्धतीने बनवून विकले जात आहे. जागोजागी सफेद दाढ्यांवाले ऋषी, दुसरे ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य आपल्या राहुट्या ठोकून आहेत. कोणी नवीन दास किंवा दासी विकत घ्यायला आले आहे. एखाद्याचे दिवस वाईट चाललेत, त्यामुळे तो आपल्या दासांना किंवा दासींना विकून जरा रोकड गोळा करू पहातोय. काही फक्त या विचारांनी आपल्या दास-दासींना जत्रेत घेऊन आलेत की त्यांना विकून 'नवीन' घ्यावेत. काही मोठे व्यापारी असेही आहेत जे झटपट विकून निघू पाहणाऱ्यांकडून स्वस्तात दास-दासी विकत घेतात आणि जास्त नफ्याने विकतात. मालकांनी काही महिने अगोदरच जत्रेत जायचा निर्णय घेतला होता. तेव्हापासूनच दास-दासींना चांगले खाऊ -पिऊ घालणे सुरू केले होते जेणेकरून चरबीने त्यांची हाडं झाकली जावीत आणि बाजारात अधिक भाव मिळावा. त्यांचे पांढरे केस रंगवून काळे केले गेले आहेत आणि जत्रेत चांगल्या-चुंगल्या कपड्यांनी सजवून त्यांचा बाजार लावला आहे. एखाद्या ठिकाणी कोणी एखाद्या दास-दासीला घेऊन बसले आहे तर कुठे शे-दोनशे दास-दासींची रांग लागली आहे. घेणाऱ्यांची गर्दी आहे. विकत घेणारे म्हणतात – यावेळी बाजार जरा महागच होता, गेल्या वेळी अठरा वर्षांची सुंदर दासी दहा रूपयांना मिळत होती, पण यावेळी तर तीसमध्येही हात धरू देत नाहीत. एकाला दासी विकत घ्यायची आहे, पण पैसे कमी पडताहेत. तो एका चाळीस वर्षांच्या सौद्याजवळ जातो. दासीचे तृतीयांश केस सफेद झालेत, पण रंगवून काळे केले होते. मालकाचे नशीबच की दासीचे सगळे दात शाबित होते. घेणाऱ्याने जवळ जाऊन दात पाहिले – एकदम ठीक. डोळे पाहिले – काही समस्या नाही. कान व्यवस्थित काम करताहेत. हात उचलून चाचपून पाहिले – कमजोर नाहीत. चालवून पाहिले – पाय पण ठिकच आहेत. म्हटला – "वशिष्ठ जी! तुमची दासी तर म्हातारी झालीये. पण असो, आमच्याकडे काम पण हलके आहे; भाव काय आहे?"

वशिष्ठ – "गौतमजी, चुकीचं बोलताय तुम्ही. ही तर आत्ताशी वीस वर्षांची छोकरी आहे. तुम्ही पाहिले नाही का की हिचे हात-पाय किती मजबूत आहेत, किती सुंदर आहे ती; दहा वर्षांमध्ये तर हिला दहा मुलं होतील. दुप्पट दाम तर एका मुलातच वसूल होईल. तुमच्याशी भाव करायची इच्छा नाहीये. पन्नास रूपये मिळत होते हिचे, पण तुम्ही ओळखीचे आहात, तर दहा रूपये कमी करू."

गौतम – "तुम्ही तर फारच भाव सांगताय. केस काळे केल्याने आणि दोन महिने खाऊ-पिऊ घातल्याने— असे समजू नका की मला हे माहित नाही—ही पन्नास वर्षांची म्हातारी आहे. मला स्वस्तातला माल पाहिजे, जर तुम्ही भाव नीट सांगाल, तर मी घेईल हिला."

वशिष्ठ – "मला काय जत्रेतल्या इतरांसारखे समजले का तुम्ही? हिच्या बहिणीला मी शंभर रूपयात अयोध्येचे महाराज रामचंद्र यांना विकले आहे. आजकाल महाराज यज्ञ करत आहेत, दक्षिणेत ते प्रत्येक ऋषीला एकेक सुंदरी दासी देऊ इच्छितात. दिसत नाही का, की या वर्षी दासींचा भाव चढा आहे. चला जाऊ द्या, तीस रूपये द्या, आम्हालाही घरी जायचंय परत. ही दासी अशी-तशी नाही, नाचगाणं येतं हिला. काली! एक गाणं गावून दाखव तर."

कालीने एक गाणं गावून दाखवलं आणि नाचाचेही एक-दोन नमुने दाखवले. शेवटी पंधरा रूपयांना सौदा झाला.

लोक आपापले दास घेऊन घरी जात आहेत. कितीतरी दासींची मुलं विकून शेकडो कोस दूर पोहोचली आहेत. कित्येकांची प्रियकरांपासून कायमची ताटातूट झाली आहे. मुलं आणि प्रियकरांपासून विरहामुळे अनेकांचे कामात मन लागत नाहीये, पण नवीन मालक काम करवून घ्यायला उतावीळ झाले आहेत. दोन-चार दिवस जी नरमाईची वागणूक होती, ती संपवून आता लहान-सहान कारणांवरून दासींना चाबकाचे फटके बसत आहेत. दासीचा जीव घेतला तरी मालकाला कोणत्याही मोठ्या शिक्षेचे भय नाही. मालकांसाठी त्या आणि जनावरं सारखीच!

हे आहे रामराज्यातील मनुष्यांच्या एका भागाचे जीवन! आणि हे आहे रामराज्यातील माणसाचे मोल! आम्हाला याचाच अभिमान आहे! ऋषींची दया आणि सहृदयतेचे गुणगान करताना तर आम्ही थकतही नाही आणि ज्या ऋषींच्या आश्रमांजवळ माणसांना अशाप्रकारे गुलाम बनवून ठेवले जाई, ज्या ऋषींना स्वर्ग, वेदांत, आणि ब्रह्मावर मोठमोठी व्याख्याने द्यायला आणि सत्संग करायला फुरसत होती, जे दानावर आणि यज्ञावर मोठमोठ्या पोथ्या लिहू शकत होते, कारण यातून त्यांना आणि त्यांच्या संततींना फायदा होता, परंतु माणसावर पशूप्रमाणे होणाऱ्या अत्याचाराला मूळातून नष्ट करण्यासाठी त्यांना कोणत्याही प्रयत्नांची आवश्यकता वाटली नाही. या ऋषींपेक्षा आजच्या जमान्यातील साधारण माणसातही

पान 12 वर

### लेखकाचा परिचय

राहुल सांकृत्यायन (1893-1963) खऱ्या अर्थाने जनतेचे लेखक होते. ते आजच्यासारख्या तथाकथित प्रगतिशील लेखकांसारखे नव्हते, जे जनतेच्या जीवन आणि संघर्षापासून अलिप्त राहून आपापल्या महालांमध्ये बसून कागदावर प्रकाश टाकत असतात. जनतेच्या संघर्षाचे मोर्चे असोत वा सरंजामदार-जमीनदारांच्या शोषण-दमनाच्या विरूद्ध शेतकऱ्यांच्या संघर्षाचा लढा असो, ते नेहमीच पहिल्या फळीत उभे राहिले. अनेक वेळा तुरूंगात गेले, यातना सहन केल्या. जमीनदारांच्या भाडोत्री गुंडांनी त्यांच्यावर प्राणघातक हल्लासुद्धा केला, परंतु स्वातंत्र्य, समानता आणि मानवी स्वाभिमानासाठी ते ना कधी संघर्षातून मागे हटले आणि ना कधी त्यांची लेखणी थांबली.

जगभरातील 26 भाषा अवगत असलेल्या राहुल सांकृत्यायन यांच्या अचाट बुद्धीचे अनुमान यावरूनसुद्धा लावता येऊ शकते की, ज्ञान-विज्ञानाच्या अनेक शाखा, साहित्याच्या अनेक प्रकारांमध्ये त्यांनी हातोटी मिळवली होती. इतिहास, तत्वज्ञान, पुरातत्वशास्त्र, मानववंशशास्त्र, साहित्य, भाषा-विज्ञान इ. विषयांवर त्यांनी अधिकारवाणीने लेखन केले. बौद्धिक गुलामी, तुमचे अध:पतन, पळू नका-जगाला बदला, तत्वज्ञान-संदर्भ, मानवसमाज, वैज्ञानिक भौतिकवाद, जय यौधेय, सिंह सेनापती, साम्यवादच का?, बावीसावे शतक इ. रचना त्यांच्या महान प्रतिभेची ओळख स्वत:हूनच करून देतात.

राहुल देशातील दलित-शोषित जनतेला हर-तऱ्हेच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी लेखणीचा हत्यारासारखा वापर करायचे. त्यांचं म्हणणं होतं की, "साहित्यकार जनतेचा जबरदस्त सहकारी, सोबतच तो त्यांचा नेता (पुढारी) आहे. तो सैनिक आहे आणि सेनापतीसुद्धा."

राहुल सांकृत्यायन यांच्यासाठी जीवनाचं दुसरं नाव गती होतं आणि मरण किंवा स्तब्धतेचं दुसरं नाव होतं साचलेपणा. यामुळेच अगोदरच तयार असलेल्या मार्गावर चालणे त्यांना कधीही आवडले नाही. ते नव्या मार्गाचे संशोधक होते. परंतु फिरणे म्हणजे त्यांच्यासाठी फक्त भूगोलाची ओळख करून घेणे नव्हते. ते सुदूर देशांतील जनतेचं जीवन आणि त्यांच्या संस्कृतीशी, त्यांच्या जिजीविषेशी ओळख करून घेण्यासाठीचं फिरणं होतं.

समाजाला मागे ढकलणाऱ्या हरतऱ्हेच्या विचार, रूढी, मूल्ये, मान्यता-परंपरांच्या विरूद्ध त्यांचे मन अतिशय तिरस्काराने भरलेले होते. त्यांचं संपूर्ण जीवन आणि लिखाण याविरूद्ध विद्रोहाचं जितं-जागतं उदाहरण आहे. यामुळेच त्यांना महाविद्रोहीसुद्धा म्हटले जाते. राहूल यांची ही वेगळी रचना आजसुद्धा आपल्या समाजातील प्रचलित रूढी-परंपरांच्या विरूद्ध तडजोड विहीन संघर्षाची आरोळी आहे.

# पेटंट : कोरोना लसीकरणातील "बौद्धिक" अडथळा !

पान 16 वरून

नफ्याचीच असतात.

कोरोनाच्या साथीत व्हेंटीलेटरमुळे अनेकांचे जीव वाचले आहेत. इटलीतील एक कंपनी ह्या व्हेंटीलेटरमधील व्हॉल्व बनवून 11,000 डॉलर इतक्या प्रचंड किमतीने विकत होती. तेथील दोन तरुणांनी नवीन तंत्रज्ञान वापरून ह्या व्हॉल्वची किंमत एक डॉलरपर्यंत खाली आणली, तेव्हा त्या कंपनीने ह्या तरुणांना कोर्टात खेचले व त्यांचे उत्पादन बंद पाडले!

नव्या औषधांवर संशोधन करणे, संशोधनातून मिळालेल्या नव्या औषधांवर पेटंट घेणे, त्यानंतर पेटंटच्या आधारे उत्पादनावर आणि किमतीवर एकाधिकार स्थापित करणे, व त्याद्वारे सामान्य रुग्णांची लूट करणे हेच आज खाजगी औषधकंपन्यांचे अर्थचक्र बनले आहे. त्यामुळेच औषधकंपन्या जीवनावश्यक औषधांवर संशोधन करण्याऐवजी जीवनशैलीवर्धक औषधांवर संशोधन करण्यावर भर देतात, कारण जीवनशैलीवर्धक औषधे श्रीमंत रुग्णाना विकून अतिनफा कमावता येतो ! औषधे इतकी महाग होत आहेत त्याचे कारणदेखील हेच आहे. आपली औषधे उत्पादित करण्यापासून ते डीलर, दुकानदार व रुग्णापर्यंत पोचवण्यासाठी प्रत्येक मोठ्या औषधकंपनीची स्वतःची पुरवठासाखळी आहे. औषधातील घटक, त्यांवर केली जाणारी प्रक्रिया, पुरवठा, किंमत, सारेच प्रतिस्पर्ध्यांपासून, व जगापासून गुप्त ठेवले जाते. शिवाय औषधांच्या उत्पादन, पुरवठा, व विक्री हि संपूर्ण साखळीच बड्या औषधकंपन्यांच्या नियंत्रणात असल्याने ह्या कंपन्या औषधांच्या किमती तर ठरवतातच, शिवाय उत्पादन किती होईल व साठा किती राहील हे देखील ठरवतात. ह्या प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्याचे पेटंट ह्या कंपन्यांकडे असते, त्यामुळेच ते हे करू शकतात, हे एव्हाना तुम्हालाही समजले असेलच. वेळोवेळी, व विशेषतः कोरोनाच्या साथीत औषधांचा तुटवडा होण्याचे कारणही हेच आहे.

हीच पेटंटव्यवस्था कोरोनाचे लसीकरण जलदगतीने जगभरात राबवण्यासाठी देखील अडथळा बनत आहे.

### पेटंट : कोरोना लसीकरणाच्या टायटॅनिक मोहिमेच्या वाटेतील हिमनग

कोरोनावरची लसीकरण मोहीम हि संपूर्ण विश्वाची एक 'टायटॅनिक' महाकाय मोहीम आहे. पेटंटव्यवस्था हि ह्या टायटॅनिकच्या वाटेतील हिमनग बनली आहे. लसींवरच्या पेटंटमुळे जागतिक लसीकरण मोहिमेत अनेक अडथळे उभे राहत आहेत.

पेटंट हे लसीकरणातील एवढा मोठा अडथळा का आहे हे समजण्यासाठी आधी लस बनण्याची प्रक्रिया व त्यातील पेटंटचे महत्व समजून घ्यावे लागेल. कोरोनाच्या लसीकरणात पेटंटव्यवस्थेने उभी केलेली दुसरी मोठी समस्या म्हणजे लसींचे असमान वाटप. कोरोनाच्या लसीचे प्राथमिक संशोधन जगभरातील विद्यापीठांमध्ये झाले. कोविशील्डचे प्राथमिक संशोधन ऑक्सफर्ड विद्यापीठात झाले. कोवॅक्सिनचे प्राथमिक संशोधन पुण्यातल्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरॉलॉजी येथे झाले. प्राथमिक चाचण्या झाल्यानंतर ह्या विद्यापीठांद्वारे ह्या लसींचे पेटंट काढले जाते. त्यानंतर ह्या संस्था, प्रयोगशाळा, विद्यापीठांचे बड्या औषधकंपन्यांशी करार होतात. ह्या बड्या औषधकंपन्या विद्यापीठांकडून त्यांचे पेटंट विकत घेतात. ह्या बड्या औषधकंपन्या व्यापक चाचण्या व पुढील संशोधन करण्यासाठी लसीची पहिली खेप बनवतात. त्यानंतर चाचण्यांचे निकाल योग्य आले तर ह्या औषधकंपन्या स्वतःच्या लस कारखान्यात किंवा इतर लस कारखान्यांशी करार करून व्यापक प्रमाणावर लसींचे उत्पादन करतात. ह्या बड्या कंपन्यांच्या सप्लाय चेन (पुरवठा साखळी) स्थापित असतात. त्याद्वारे ह्या लसींचे वितरण केले जाते. म्हणजेच लसीच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत नियंत्रण ह्या बड्या औषधकंपन्यांकडेच असते.

लेखाच्या सुरुवातीलाच म्हटल्याप्रमाणे जगभरातील अनेक लस बनवणारे कारखाने थंड पडून आहेत. केवळ भारतातच, केंद्र सरकारच्या सात वेगवेगळ्या संस्था लसी बनवू शकतात, परंतु बड्या पेटंटधारी कंपन्या राजी नसल्यामुळे ह्या सातही लस उत्पादकांच्या उत्पादनक्षमता कोरोनाची लस बनवण्यासाठी वापरल्या जात नाहीयेत. कोरोनाच्या लसींवरचे पेटंट काढून टाकले तर लस अत्यंत जलदगतीने व अत्यंत कमी किमतीत उपलब्ध होऊ शकेल. परंतु, केवळ उत्पादन कमी आहे हीच एकमेव समस्या नाही. उत्पादनातील कमतरता, किंवा मागणी आणि पुरवठ्यातील तफावत हे त्या हिमनगाचे दिसणारे टोक मात्र आहे.

पेटंटमुळे उभी राहणारी दुसरी मोठी समस्या म्हणजे लसींचे असमान वितरण. कोवॅक्सिन व आणखी एखाददुसरा अपवाद वगळता आजवर आलेल्या सर्व लसींच्या संशोधनासाठी अमेरिका, इंग्लंड, रशिया, जर्मनी ह्यांसारख्या देशांनी बड्या औषधकंपन्यांना व विद्यापीठांना निधी दिला आहे. त्या निधीच्या बदल्यात इतर देशांसाठी लस खुली करण्याअगोदर निधी देणाऱ्या देशाला लसी पुरवण्याचे करार ह्या देशांनी केलेले आहेत. अमेरिकेने सहा लसनिर्मात्या कंपन्यांशी असे करार करून ठेवले आहेत. कॅनडाने तर अशा कराराद्वारे अगोदरच कॅनडाच्या संपूर्ण लोकसंख्येचे पाचवेळा लसीकरण करता येईल इतक्या लसी मिळवल्या आहेत. ह्याचा परिणाम म्हणजे आतापर्यंत निर्माण केलेल्या बहुतांश लसी ह्या धनाढ्य, विकसित देशांकडे गेल्या आहेत. त्यामुळे अविकसित, विकसनशील व गरीब देशांना लसीच्या तुटवड्याला सामोरे जावे लागत आहे. देशांच्या बाबतीतदेखील श्रीमंत देशांना लस लवकर व प्राथमिकतेने मिळत आहे व मागास, गरीब देशांना वाऱ्यावर सोडले जात आहे असेच चित्र दिसून येते. बांगलादेश पाकिस्तान, दक्षिण कोरिया सारख्या देशांमध्ये अनेक लसनिर्मिती कारखाने कंपन्या आहेत, परंतु पुन्हा बड्या औषधकंपन्यांनी लस बनवण्याची परवानगी ह्या स्थानिक कंपन्यांना देण्याचे नाकारले असल्याने अनेक विकसनशील व अविकसित देशांना पुरेशा लसी मिळण्यासाठी 2023 उजाडायची वाट बघावी लागणार आहे. ह्या असमानतेमुळे कोरोना जगभरामध्ये पुढची अनेक वर्षे तग धरून राहील असे तज्ञाचे म्हणणे आहे.

पेटंटद्वारे बड्या खाजगी औषधकंपन्यांनी चालवलेली लूटदेखील कोरोनाच्या ह्या संकटकाळात ह्या व्यवस्थेने चालवलेली क्रूर थट्टा आहे. आज भारतातील लसींची किंमत हजारोंच्या घरात आहे. मोदींनी मोफत लसींची घोषणा केलेली असली, तरी भारत सरकारला जनतेच्या टॅक्सच्या पैशातून ह्या लसी ह्या बड्या कंपन्यांकडून विकतच घ्याव्या लागणार आहेत. पुण्यातील लसनिर्माते सिरम इन्स्टिट्यूटचे पूनावाला ह्यांनी मागेच एका मुलाखतीत सांगितले आहे कि लस बनवायला 40-50 रुपयांपेक्षा जास्त खर्च येत नाही. असे असूनही सरकारला मूळ उत्पादनखर्चाच्या कैकपटीने रक्कम ह्या लसीसाठी मोजावी लागत आहे. वर पाहिल्याप्रमाणे लसींवरचे प्राथमिक संशोधन हे विद्यापीठ, प्रयोगशाळा व संस्थांमध्ये केले जाते. ह्या संस्था अनेक देशांमधील सरकारी विद्यापीठे वा प्रयोगशाळाच असतात. ह्या संस्थांमधील संशोधन हे सरकारच्या निधीवर, म्हणजेच जनतेच्या टॅक्सच्या पैशातून केले जाते. त्यानंतरच्या टप्प्यांमध्ये खाजगी औषधकंपन्यांना देखील वेगवेगळ्या देशांच्या सरकारांनी आर्थिक मदत दिलेली आहे. आज उपलब्ध असलेल्या बहुतांश लसी वेगवेगळ्या देशांच्या सरकारांच्या, म्हणजेच सामान्य जनतेच्या पैशावर उभ्या आहेत. असे असूनदेखील पेटंट मात्र खाजगी बड्या औषधकंपन्यांकडे असल्याने लशींतून मिळणारा सर्व नफा मात्र ह्या कंपन्यांच्या घशात जात आहे ! ह्या लसी जर प्राथमिक टप्प्यामध्ये, किंवा नंतरच्या चाचण्यांमध्ये कुचकामी ठरली असत्या तरी ह्या बड्या कंपन्यांचे काहीच नुकसान झाले नसते ! परंतु नफा उकळण्यात मात्र एकही कंपनी कोणतीही कसर सोडत नाहीये !

जगभरात एवढे भयानक संकट आले असताना ह्या औषधकंपन्या मात्र नफा उकळण्याची एकही संधी सोडत नाहीत. पेटंटव्यवस्थेमुळे ह्या विश्वव्यापी लसीकरण मोहिमेत अनेक अडचणी येत आहेत. ह्यावर तात्कालिक उपाय म्हणजे कोरोनाच्या सर्व लसींवरचे पेटंट हटवून सर्व लसउत्पादकांना लसनिर्मितीची परवानगी त्वरित दिली गेली पाहिजे. ह्या मागणीचे एक निवेदन जागतिक आरोग्य संघटनेत काही देशांनी सादर केलेले आहे, परंतु बड्या औषधकंपन्यांच्या शक्तिशाली लॉबीने ह्या प्रस्तावाला सर्व शक्तीनिशी विरोध केलेला आहे. ज्या श्रीमंत, विकसित देशांनी लसनिर्मितीकरिता औषधकंपन्यांना निधी दिला आहे, जसे अमेरिका, युरोपियन संघ इत्यादी ते देश देखील ह्या प्रस्तावाच्या विरोधात आहेत.

कोरोनावरच्या विश्वव्यापी लसीकरण मोहिमेत पेटंटव्यवस्थेमुळे ह्या व अशा अनेक अडचणी उभ्या आहेत. परंतु पेटंटमुळे केवळ हे लसीकरण, किंवा केवळ औषधनिर्मिती क्षेत्रच प्रभावित होते असे नाही, तर संपूर्ण विज्ञानच पथभ्रष्ट झाले आहे.

### पेटंट व भांडवली संशोधनाची मूळ प्रेरणा

पेटंट म्हणजे एखाद्या कल्पनेला वा शोधाला खाजगी मालमत्तेचे स्वरूप देणारे प्रमाणपत्र हे आपण पाहिलेच. त्याहीपुढे जाऊन, हे प्रमाणपत्र, हे पेटंट बाजारात विकता व खरेदी करता येते. एखादे पेटंट खरेदी करणे म्हणजे ज्या कल्पनेचे वा शोधाचे ते पेटंट आहे, त्या शोधाचे उत्पादन करण्याचे, त्या शोधावर पुढील संशोधन करण्याचे व त्या संशोधन वा कल्पनेतून नफा कमावण्याचे एकाधिकारी हक्क खरेदी करणे. थोडक्यात ती कल्पनाच खरेदी करणे ! म्हणजेच आज भांडवलशाहीने कल्पनांना, शोधांना, व ज्ञानालाच बाजारू माल बनवून टाकले आहे.

वास्तवात, आजच्या भांडवली व्यवस्थेत प्रत्येक गोष्टीची प्रेरणा फक्त नफाच आहे. विज्ञान तंत्रज्ञानातील संशोधनसुद्धा आज मूलतः नफ्यासाठीच केले जाते. सरकारी वा खाजगी विद्यापीठातील व प्रयोगशाळांमधील संशोधनप्रकल्पांना जो निधी मिळतो त्यामागे नफ्याचेच गणित असते. किंबहुना आता स्थिती अशी आहे कि कुठल्या क्षेत्रात निधीपुरवठा आहे ते बघून त्या क्षेत्रातच संशोधन करण्यावर अनेक संशोधक व प्राध्यापकांचा भर असतो. हा निधीपुरवठा अर्थातच मुख्यतः खाजगी उद्योगांकडून, व काही वेळा सरकारकडून केला जातो. खाजगी उद्योगांकडून निधी दिला जात असलेले प्रकल्प हे त्या उद्योगांच्या तात्कालिक व दीर्घकालीन फायद्याला केंद्रस्थानी ठेवूनच केलेले असतात, तर सरकारने निधी दिलेल्या प्रकल्पांचे दूरगामी उद्दिष्ट भांडवलदार वर्गाचा सामुहिक फायदा हेच असते.

आज मानवजातीचा विकास हि संशोधनाची मुख्य चालक शक्ती राहिलेली नाही, तर प्रत्येकच पातळीवर लाभाची, नफ्याची गणितेच विज्ञान-तंत्रज्ञानाच्या विकासाची मुख्य चालक शक्ती बनलेले आहेत. अर्थात अशा व्यवस्थेत विज्ञान-तंत्रज्ञानात जी काही प्रगती होईल ती अंतिमतः बाजारातच विकायला येईल, व खरेदी करण्याची ऐपत असणारेच तिला खरेदी करू शकतील. अर्थात ज्या बहुसंख्य कामगार-कष्टकऱ्यांना हातावर पोट घेऊन जगावे लागते ते विज्ञानातील नवोन्मेषांपासून लांबच राहणार आहेत.

प्रचंड लोकक्षोभानंतर, लाजीरवाणी स्थिती झाल्यावर, मोदींनी नुकतीच लस मोफत देण्याची घोषणा केली आहे. अशा परिस्थितीत, भांडवली राज्यसत्ता जेव्हा एखादी लस मोफत देऊ पाहतात, तेव्हा ते सुद्धा भांडवलदार वर्गाचे दीर्घकालिक हित लक्षात घेऊनच केले जाते. जेव्हा समग्र भांडवलदार वर्गाचा दूरगामी फायदा होणार असतो, तेव्हाच अशा प्रकारे बाजाराच्या नियमांना मुरड घालत विज्ञानातील प्रगती सामान्य कामगार कष्टकऱ्यांपर्यंत पोचवली जाते. ह्या उदाहरणातदेखील, प्रत्येकाचे लसीकरण झाले तर कोरोनाची साथ लवकर आटोक्यात येईल, व उद्योगधंदे आणि बाजारपेठा पुन्हा पूर्वीसारख्या सुरु होतील. ह्याने भांडवलदारांचे रुतलेले नफ्याचे गाडे देखील पुन्हा वेग धरू लागेल. ह्या दूरगामी फायद्याकरिताच आज मोदी सरकारने सर्व

पान 15 वर

# मानखुर्द–गोवंडीत औषधांची वाढती नशाखोरी!

## नफ्याकरिता कामगार-कष्टकरी-युवकांच्या जीवाशी खेळ!

✎ बबन

मुंबईच्या झोपडपट्ट्यांमध्ये नफ्याच्या लालसेने अवैध नशेच्या धंदेबाजांद्वारे नशाखोरीच्या घातक सवयी लावून युवकांचे, कामगार-कष्टकऱ्यांचे जीवन बर्बाद करणे चालू आहे. सरकारी यंत्रणेच्या 'आशिर्वादा'ने चालणाऱ्या नशेखोरीच्या बाजारात सर्व कायदे व संकेत धाब्यावर बसवून अवैध पदार्थांचा धंदा मुक्तपणे चालू आहे!

'नशा' म्हटल्यावर डोळ्यासमोर चटकन बिडी, गुटखा, पान मसाला, तंबाखू , मावा, हुक्का, सिगारेट, दारू, चरस, गांजा, अफिम, हिरोईन, एमडी, ड्रग्ज अशा प्रकारच्या शरीराला कमी-अधिक प्रमाणात घातक असलेल्या, प्रचलित मादक पदार्थांचे चित्र उभे राहते. काही काळापूर्वीपासून काही अशा पदार्थांच्या नशेचे प्रमाण वाढलेले दिसून येत होते जे पदार्थ पारंपारिक नशेच्या प्रकारात मोडत नव्हते. यात व्हाइटनर, थिनर, रंग, आयोडेक्स, सोल्युशन, पेट्रोल यांचा समावेश होता; परंतु अलीकडच्या काही वर्षात याही पुढे जाऊन अजून एक प्रकार मोठ्या प्रमाणात पाहायला मिळतो तो म्हणजे "औषधांपासून करण्यात येणारी नशा"! या प्रकाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत जातांना दिसत आहे. यात प्रामुख्याने केटामाइन, कोडीन, अल्फ्राझोलम, मेफेड्रीन, इफेड्रीन या सारख्या औषधांचे सेवन करण्यात येत आहे. त्यामुळे ड्रग्ज माफियांनी अलीकडेच काही वर्षापासून आपला मोर्चा औषधांच्या साठेबाजी साठी स्मगलिंग करायला सुरुवात झाली आहे. प्रतिबंधित औषधांचा वापर करून नशाखोरीचे प्रमाण वाढत आहे. ही औषधे मेडिकल वर किंवा तिथे शक्य नसेल तर चोरट्या मार्गाने विक्री करणाऱ्या टोळ्याकडून विक्रेत्यांपर्यंत पोहचवली जातात. यात किंमती तीन ते चार पटीने जास्त असल्यामुळे या कामात प्रचंड पैसा कमावला जातो.

### मानखुर्द गोवंडीमध्ये औषधांची नशा!

या नशांचे प्रमाण झोपडपट्टी असलेल्या भागात जास्त प्रमाणात पाहायला मिळते. मुंबई शहरात अनेक झोपडपट्टी भागात या नशेचा सुळसुळाट सुटला आहे. या पैकीच एक म्हणजे मानखुर्द -गोवंडी, शिवाजीनगर झोपडपट्टी आहे. 8 लाखाच्या जवळजवळ लोकसंख्या असलेल्या या भागातील 77% लोकसंख्या झोपडपट्टीत राहते. या इलाक्यातील काही ठराविक ठिकाणी तर कोणत्याही वेळी नशा सर्रास होताना दिसून येते. नशेच्या आहारी जाणारी मुले ही 14 ते 30 या वयोगटातील सर्वात जास्त असल्याचे आढळून आले आहेत. लहान शाळकरी मुलांमध्ये देखील या नशांचे प्रमाण वाढले आहे. मानखुर्द- गोवंडीच्या इलाक्यात तोंडाला रुमाल बांधून किंवा रुमालाची घडी करून त्याचा वास घेणारे येता जाता पहायला मिळतील! रुमालात सुलोचन, फेव्हीकॉल, व्हाइटनर, कॉस्मेटिक टाकून त्याचा वास घेऊन नशा केली जाते. आयोडेक्स खाणे इतर नशेच्या तुलनेत अत्यंत घातक आहे. यातच आता वाढत आहे "औषधांची नशा".

खोकल्यासाठी वापरण्यात येणारे "कोरेक्स सिरप" औषध व "नायट्रो -10" या झोपेच्या गोळ्यां ज्यांना "बटन" असे म्हटले जाते, यांचा वाढता वापर गेल्या काही काळात दिसून येते आहे. "कोरेक्स सिरप" ला "चीप दारू" म्हणून ओळखले जाते. त्याचा वापर प्रमाणापेक्षा जास्त आणि नियमित केल्यास त्यातील कोडिनची नशा व्हायला सुरुवात होते. काही वेळेस हे कोल्ड्रिंक मध्ये टाकून पिले जाते तर अनेकदा आहे तसेच सुद्धा पिले जाते. बटन या नावाने प्रसिद्ध असलेल्या या गोळ्यांची नशा करणाऱ्या तरुणांमध्ये प्रचंड 'लोकप्रियता' आहे. त्यामुळे यांचा वापर नशा म्हणून करण्याचे प्रमाण वाढत आहे. खरतर ही औषधे डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शन शिवाय देणे अपेक्षित नसतांना देखील मेडिकल दुकानांमधून सुद्धा यांचा पुरवठा केला जातो. मानखुर्द-गोवंडीमधील आरोग्य व्यवस्था मोठ्या प्रमाणात "झोलाछाप" डॉक्टरांच्याच खांद्यावर आहे. अशात यातील काही डॉक्टरांकडून क्लिनिक वर मोठ्या प्रमाणात अशा औषधांचा साठा करून चोरट्या मार्गाने वाढीव किंमतीत बेकायदेशीरपणे विकून प्रचंड नफा कमावला जातो.

या पदार्थांची मार्केट मध्ये सहज उपलब्धता हे नशाखोरीचे एक मुख्य कारण आहेच. जी औषधे डॉक्टरच्या चिठ्ठीशिवाय उपलब्ध होणे शक्य नाही, ती ड्रग्ज विक्रेत्यांकडून बेकायदेशीर मार्गाने सर्रासपणे विकली जात आहेत. परिणामी, मानखुर्द-गोवंडी मधील रफिक नगर, बाबा नगर, गौतम नगर, झाकीर हुसैन नगर, साठेनगर, खाडी, मंडाळा, लल्लुभाई कंपाउंड या इलाक्यात नशेच्या आहारी गेलेल्या तरुणांमध्ये आत्महत्येचे आणि गुन्हेगारीचे प्रमाण खूप वाढताना दिसत आहे. मानखुर्द-गोवंडी या भागात प्रत्येक महिन्याला कमीत कमी दोन ते तीन खून होण्याच्या नोंदी आढळून येत आहेत. सामान्य नागरिकांना या भागात रात्री फिरतांना जीव मुठीत धरून फिरवा लागत आहे. किरकोळ वादातून तोंडावर ब्लेड मारणे, डोक्यात दगड टाकून मारणे, हाताच्या नस कापून मारणे, अंगावर वार करणे अशा घटना रोज पोलीस ठाण्यात नोंद केल्या जात आहेत.

### युवकांच्या जीवाशी खेळत आहे नफ्याची लालसा!

गरीब आणि श्रीमंतांच्या नशेमध्ये फरक हा असतोच की गरीब वस्त्यांमध्ये स्वस्तातील नशा केली जाते जी आरोग्यासाठी इतर नशेच्या तुलनेत खूपच जास्त धोकादायक असते. वर चर्चा करण्यात आलेले नशेचे पदार्थ तर इतर नशांच्या तुलनेत बरेच घातक आहेत.

अल्कोहोलयुक्त द्रव्यपदार्थ आणि रसायने रक्ताभिसरण प्रक्रियेला सरळ इजा पोहचवत असतात. अशा वेळेस किशोरवयीन मुलांमध्ये याचे गंभीर परिणाम पाहायला मिळतात. कोमात जाण्यासारखी परिस्थितीही उत्पन्न होऊ शकते. श्वासावाटे करण्यात येणाऱ्या नशेमुळे श्वसनक्रियेवर दुष्परिणाम होऊन छातीचे आणि श्वसनाचे आजार होण्याच्या शक्यता जास्त वाढतात. शरीरातील अवयव खराब होऊन कर्करोगासारखे आजार होऊ शकतात.

सुलोचन, फेव्हीकॉल, व्हाइटनर, कॉस्मेटिक या सारखे रसायनयुक्त पदार्थ जास्त प्रमाणात वापरल्यामुळे मेंदूवर परिणाम होतांना दिसून येतो. मेंदूला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्या सुस्त पडू लागल्या की विचार करण्याची शक्ती मंद होत जाते. त्याचा परिणाम नशा करणाऱ्या व्यक्तीवर आहे तो पर्यंत नशा करणारा व्यक्ती अनेकदा विचित्र पद्धतीने वागतांना दिसतो. कधी-कधी असे व्यक्ती स्वत:च्या हाताने स्वत:च्याच अंगावर ब्लेडने वार करून हातावर, छातीवर किंवा चेहऱ्यावर असलेल्या चमडीला सुद्धा कापतात! हा सगळा प्रकार फार वेदनादायक असतांना देखील त्या व्यक्तीला नशेमुळे याचा त्रास जाणवत नाही किंवा त्या त्रासाला जाणवून घेणाऱ्या त्याच्या संवेदना सुस्त पडलेल्या असतात. थोडा त्रास होत असतांना त्या त्रासाला "आत्मपीडन" म्हणून सहन केले जाते. नशा उतरल्या नंतर त्याचा भयंकर त्रास होतो त्यामुळे त्यावर सर्वात 'प्रभावी उपाय' म्हणून पुन्हा नशा करणे हाच एक मार्ग शिल्लक राहतो.

"कोरेक्स"चे नियमित आणि जास्त प्रमाणात सेवन केल्याने बुद्धीभ्रम, स्मरणशक्तीचा ऱ्हास, यकृत, छाती आणि पोटाच्या संबंधित समस्या जाणवायला लागतात.

घातक केमिकल्सयुक्त पदार्थांचे सेवन अतिरेकीपणाने केल्यास मेंदूच्या पेशी नष्ट होऊन मानसिक संतुलन कायमचे किंवा दीर्घकाळासाठी बिघडू शकते. त्यामुळेच आज कामगार वस्त्यांमध्ये अशी अनेक मुले भेटतात जी या अवस्थेत वर्षानुवर्ष जगत आहेत. गरिबीमुळे नशामुक्ती केंद्रात जाऊन काही महिने राहणे आणि त्यासाठी खर्च करणे परवडणारे नसते; आणि मानसशास्त्रज्ञांकडे जाऊन काही महिने नियमित उपचार घेण्याचा उपचार तर अजूनच महागडा आणि सरकारी स्तरावर यासाठी उपचाराची काही विशेष व्यवस्था दिसूनही येत नाही! तेव्हा नशेच्या घेऱ्यात अडकलेल्या गरिबांसाठी त्यातून बाहेर पडणे हे पैसेवाल्यांपेक्षा अत्यंत कठीण काम असते.

### नशेखोरीशी कसे लढावे?

"अमली पदार्थ विरोधी पथकाने कारवाई तीव्र केली! अमुक जागेवर छापा टाकून अमुक-अमुक प्रमाणात माल जप्त केला! किंवा अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या टोळीला पोलिसांनी गजाआड केले!" अशा बातम्या आपण वर्तमानपत्रातून कायमच वाचत असतो पण नशेखोरीला आळा बसलाय का? नाही! याचे पहिले कारण तर हे आहे की अशाप्रकारच्या कारवाया या अत्यंत तुरळक केल्या जातात. जेव्हा एखाद्या भागामध्ये सर्रास अवैध अमली पदार्थांची विक्री चालते, तेव्हा ती पोलिस खात्याच्या माहिती शिवाय चालते यावर तर शेंबडे पोरही विश्वास ठेवणार नाही. नशा करून इतरत्र पडलेली मुले, वाढते गुन्हे, लंपटगिरी हे डोळ्यांना दिसणारे वास्तव आहे. आजकाल तर कोणाच्या घरात काय अन्न शिजवले जात आहे याबद्दल सुद्धा पोलिस खाते गुन्हे दाखल करताना दिसते, आणि सर्रास विकले जाणारे नशेचे पदार्थ त्यांना दिसत नाहीत? वास्तवामध्ये ड्रग्स विकणारे, नशेच्या औषधांचा अवैध धंदा करणारे या सर्वांवर राजकीय वरदहस्त असतो हे सर्वसामान्य लोक जाणतातच; किंबहुना धंदेबाज भांडवली राजकीय पक्षांचे चमचे, गल्लीबोळातील दलाल कार्यकर्तेच या काळ्या

पान 12 वर

# पेटंट : कोरोना लसीकरणातील "बौद्धिक" अडथळा!

पान 14 वरून

सामान्यांना मोफत लस देऊ केली आहे. मोदीला चांगुलपणाचा झटका आला म्हणून नव्हे, तर मोदीच्या मागे उभे असणाऱ्या भांडवलदारांचा नफा पूर्ववत व्हावा म्हणून!

नफ्याने हपापलेल्या या जगातही जनपक्षधर वैज्ञानिक होऊन गेलेत ही बाब निराळी! अपवाद असलेल्या अनेक संशोधकांनी आपल्या शोधाचे पेटंट घ्यायला सपशेल नकार दिला आहे, व त्यांचे शोध त्यांनी जनतेला सुपूर्त केले आहेत. पोलिओच्या लसीचा शोध लावणाऱ्या जोनास साक ह्या वैज्ञानिकाला एका पत्रकाराने विचारले, 'ह्या लसीचे पेटंट कुणाच्या नावे आहे?' 'अर्थातच लोकांच्या', साक उत्तरला, 'लसीला कुठलेच पेटंट नाही. तुम्हाला सूर्याचे पेटंट काढता येईल काय?' अशाच प्रकारे इन्सुलिनचा शोध लावणारा फ्रेडरिक बंटिंग, इंटरनेटचा शोध लावणारा टीम बर्नर्स ली, अशा अनेक शोधकर्त्यांनी त्यांच्या शोधांचे पेटंट घेतलेले नाही.

परंतु एरवी स्मार्टफोनपासून असाध्य रोगांवरील नव्या औषधांपर्यंत, विज्ञान-तंत्रज्ञानातील प्रगती सामान्य कामगारांच्या आवाक्याबाहेरचं राहिली आहे. ह्याचे कारण म्हणजे मनुष्याच्या प्रगतीच्या, कल्पनेच्या, संशोधन व विज्ञानाच्या विशाल सागरातून प्रत्येक थेंबाला खाजगी मालमत्ता बनवणारी पेटंटव्यवस्था ! जी पेटंटची व्यवस्था संशोधन व कल्पनाशक्तीला चालना देण्यासाठी म्हणून सुरु केली गेली होती, तीच आज माणसांचा जीव वाचवण्यामध्ये, विज्ञानाला आणखी वेगाने विकसित करण्यामध्ये अडथळा बनत आहे. हि पेटंटव्यवस्था नष्ट होऊन, सर्व ज्ञान हे सर्व समाजाच्या मालकीचे होत नाही, तोपर्यंत ते समाजातील सर्वांपर्यंत पोचणारदेखील नाही.

पेटंटव्यवस्थेमुळे होत असलेल्या दिरंगाईमुळे अनेकांचे नाहक बळी जात आहेत, नव्हे खाजगी मालमत्तेच्या व्यवस्थेने केलेल्या ह्या नियोजनबद्ध, व्यवस्थाबद्ध हत्या आहेत. लसींवरचे पेटंट कायम राखून, जगभरातील अनेक कारखान्यांना लस उत्पादनाची परवानगी नाकारून ह्या बड्या बड्या खाजगी औषधकंपन्या एक विश्वव्यापी नरसंहार घडवून आणत आहेत. ज्ञानाला पेटंटव्यवस्थेने खाजगी, बाजारू माल बनवून टाकल्याची खूप मोठी किंमत आज आपण सारेच चुकवत आहोत. अशीच किंमत दररोजच आपण चुकवत आलो आहोत. हे थांबवायचे असेल, तर सर्व ज्ञान, सर्व बौद्धिक संपदेवर, नव्हे सर्व बौद्धिक आणि भौतिक संपदेवरसुद्धा खाजगी मालकी संपवून सर्व समाजाची मालकी स्थापित करण्यासाठी लढावे लागेल.

# पेटंट : कोरोना लसीकरणातील "बौद्धिक" अडथळा !

## ज्ञानाच्या खाजगीकरणामुळे कोरोना सारखे रोग घेताहेत कोट्यवधी जीव!

✎ निमिष

कोरोनाची साथ भारतात, व जगभरात येऊन दीड वर्ष झाले. कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी मास्क, सॅनिटायझर, सामाजिक अंतर ठेवण्यापासून ते लॉकडाऊनपर्यंत सर्व उपाययोजना केल्या गेल्या, व आजही केल्या जात आहेत. हे सर्व उपाय कोरोनाचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी, साथीच्या प्रसाराचा वेग मंदावण्यासाठी, कमी-अधिक प्रभावी असले, तरी कोरोनाचा, किंवा कुठल्याही विषाणूजन्य रोगाचा समूळ नायनाट करण्यासाठी विज्ञानाकडे एकच रामबाण उपाय आहे, तो म्हणजे त्या रोगावरची लस.


कोरोनाची पहिली लस डिसेंबरमध्ये आली, तर भारतात पहिली लस जानेवारीमध्ये टोचली गेली. त्यानंतर आजवर अनेक लसी आलेल्या आहेत. भारतात देखील तीन वेगवेगळ्या लसी टोचवल्या जात आहेत; असे असूनसुद्धा, आज, सहा महिने उलटून गेले असले तरीही, जगातील केवळ सहा टक्के लोकसंख्येचेच लसीकरण पूर्ण झालेले आहे. भारतात देखील केवळ 3.3 टक्के लोकांचेच लसीकरण पूर्ण झालेले आहे, आणि एकूण 12 टक्के लोकांना लसीचा किमान एक डोस दिला गेला आहे. मे महिन्यामध्ये केवळ 6 कोटी लसी टोचल्या गेल्या. ह्या दराने देशातील सर्वांचे लसीकरण पूर्ण व्हायला ऑगस्ट 2023 उजाडेल ! भारतात, आणि जगभरात **आज लसीकरण इतक्या कूर्मगतीने होत असल्याला अनेक कारणे आहेत. ह्यातील एक प्रमुख कारण म्हणजे ह्या सर्व लसींवर असलेले पेटंट !**

लसीचे संशोधन प्रयोगशाळांमध्ये व विद्यापीठांमध्ये होते. लसीच्या चाचण्या झाल्यानंतर औषध बनवणाऱ्या कंपन्या ती लस व्यापक प्रमाणावर बनवण्यासाठी तिचे पेटंट घेतात. ह्या पेटंटमुळेच मे मध्ये जगभरातील लस उत्पादन क्षमतेतील केवळ 43 टक्के क्षमताच वापरली जात आहे. म्हणजेच, आत्ता बनत असलेल्या लसीच्या दुप्पटपेक्षा जास्त लसी बनवल्या जाऊ शकतात. बांगलादेश, पाकिस्तान, कॅनडा, व दक्षिण कोरियामधील अनेक लस उत्पादकांनी लस बनवण्याची तयारी दर्शवली आहे. ह्या सर्व कारखान्यांमध्ये लसी बनल्या तर आणखी कोट्यवधी लसी बनवल्या जाऊ शकतात, व अत्यंत जलदगतीने जगभराचे लसीकरण केले जाऊ शकते. परंतु केवळ पेटंटच्या अडथळ्यामुळे जगभरातील 85 पेक्षा जास्त गरीब देशांमध्ये 2023 पर्यंत लसीकरण पूर्ण होणार नाही !

### पेटंट म्हणजे नेमके काय ?

पेटंट हे ज्ञानावरील खाजगी मालकीचे एक स्वरूप आहे. खाजगी मालकीची कल्पना तशी बरीच जुनी आहे. एंगल्सच्या कुटुंबसंस्था, खाजगी मालमत्ता, आणि राज्यसत्ता ह्यांचा उगम मध्ये एंगल्सने ग्रीक गणसंस्थेपासून खाजगी मालमत्तेचा उगम होऊ लागल्याचे म्हटले आहे. जमीनजुमला, कपडेलत्ते, सोनेनाणे ह्या खाजगी मालमत्तेच्या मूर्त रूपांबरोबरच, खाजगी मालमत्तेचे अमूर्त रूप-"बौद्धिक" मालमत्ता देखील उदयास आले. प्राचीन ग्रीस मधील सायबरीस राज्यात ख्रिस्तपूर्व 500 च्या आसपास कुठलाही नवीन शोध लागल्यास एक वर्षासाठी त्या शोधातून नफा कमावण्याचे अधिकार केवळ त्या शोधाच्या शोधकर्त्यास देणारा - म्हणजेच एक वर्षासाठी त्या शोधाचे पेटंट शोधकर्त्यास देणारा कायदा अस्तित्वात होता.

एखादा नवीन शोध लागल्यानंतर काही कालावधीपर्यंत त्या शोधाचे उत्पादन करण्याचे हक्क हे केवळ त्या शोधकर्त्याचे असतील हे सांगणारे प्रमाणपत्र म्हणजे पेटंट. सध्या हा कालावधी वीस वर्षांचा आहे. म्हणजेच, वीस वर्षांपुरता तो नवा शोध हा त्या शोधकर्त्याची खाजगी मालकी असल्यासारखेच आहे. आज नफ्यावर चालणाऱ्या भांडवली उत्पादन पद्धतीने ज्ञानावरच्या मालकीच्या कल्पनेला मोठमोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांच्या हिताचे हत्यार बनवले आहे आणि जगातील प्रत्येक नवीन शोधावर मक्तेदारी स्थापित करण्याचे काम जोमाने पुढे नेले आहे. शोधांना प्रोत्साहन वगैरे देत आहे असे वाटून वरवर आकर्षक वाटणाऱ्या ह्या व्यवस्थेत दोन मोठ्या समस्या आहेत.



पहिली म्हणजे पेटंट हा मुख्यतः सकारात्मक अधिकार नाही तर नकारात्मक अधिकार म्हणून वापरला जातो आहे. म्हणजेच, एखाद्या शोधाचे पेटंट मिळाल्यावर त्या पेटंटद्वारे शोधकर्त्यावर त्या शोधाचे उत्पादन करण्याचे कोणतेही बंधन नाही. खरंतर पेटंट असलेल्यांपैकी 95 टक्के शोधांचे उत्पादन होतच नाही. उलट पेटंटने दिलेला अधिकार हा इतर शोधकर्त्या किंवा उत्पादनकर्त्यांना त्या शोधाचे उत्पादन करण्यापासून रोखण्यासाठीच वापरला जातो. थोडक्यात त्या शोधकर्त्याची उत्पादन वाढवण्यासाठी नव्हे, तर इतरांना रोखण्यासाठीच पेटंटचा वापर प्रामुख्याने केला जातो. ह्यामुळे मानवाला उपयोगीच नव्हे तर आवश्यक असणाऱ्या गोष्टींचेसुद्धा उत्पादन रोखले जाते. कोरोनाच्या लसीची आज हीच स्थिती झालेली आहे. ह्यामुळे विज्ञानाची प्रगती देखील खुंटते. एखादा नवीन शोध जर अशा प्रकारे खाजगी मालकीचे कुंपण घालून ठेवला, तर जगातील इतर वैज्ञानिकांना, शोधकर्त्यांना त्यावर प्रयोग करता येत नाहीत. त्यामुळे नवे शोध लावण्याची गती, विज्ञानाच्या विकासाची गती मंदावते. कल्पना करा, ज्या आदिमानवाने आगीचा शोध लावला त्याने जर आगीचे पेटंट घेतले असते, आगीचे उत्पादन करण्याचे हक्क जर स्वतःकडे राखून ठेवले असते, तर आज आपल्या घराघरात शेगडी किंवा चूल असती काय ?

दुसरी महत्वाची समस्या म्हणजे कुठल्याही शोधाला, कल्पनेला, ज्ञानाला अशा प्रकारचे कुंपण घालताच येत नाही ! कुठलेही नवे ज्ञान वा शोध हा त्याअगोदर मानवाने, समाजाने मिळवलेल्या ज्ञानावरच आधारित असतो. अलेक्झांडर ग्रॅहम बेलला टेलिफोनचा शोध लागला त्याचे कारण टेलिग्राफचा शोध त्याअगोदरच लागला होता. टेलिग्राफवर प्रयोग करताकरताच बेलला टेलिफोनचा शोध लागला. त्याही आधी टेलिग्राफचा शोध लागला कारण विद्युतचुंबकीय लहरींचा शोध लागला होता. हा शोधांचा शोध जर असाच सुरु ठेवला तर लक्षात येईल कि सर्वच नवे ज्ञान हे मानवसमाजाने अगोदर प्राप्त केलेल्या ज्ञानावरच आधारित असते. बेलला टेलिफोनचा शोध लागला कारण डेव्हिड अल्टरला टेलिग्राफचा शोध लागला होता. डेव्हिड अल्टरला टेलिग्राफचा शोध लागला कारण त्याआधी जेम्स क्लार्क मॅक्सवेलला विद्युतचुंबकीय लहरींचा शोध लागला होता. इत्यादी इत्यादी. असे असताना टेलिफोनची कल्पना हि बेलची खाजगी मालमत्ता कशी काय म्हणता येईल?

नवे ज्ञान, वा शोध, किंवा कल्पना कुठल्याही व्यक्तीची खाजगी मालमत्ता असूच शकत नाही. ती सर्व समाजाची सामाजिक संपत्तीच असते. ह्याचे कारण म्हणजे ते नवे ज्ञान त्या शोधकाला प्राप्त होण्यामागे, आणि ते नवे ज्ञान प्राप्त होण्याआधी, समाजातील असंख्य लोकांचे ज्ञान आणि श्रम त्या शोधात लागलेले असते. बौद्धिक श्रम करणाऱ्या व्यक्तींना ते करता यावे यासाठी शारीरिक श्रम समाजाला करावेच लागतात. एकप्रकारे बौद्धिक श्रम करणे ही समाजाने दिलेली संधीच असते, व्यक्तीचा विशेषाधिकार नाही. एखादा नवा शोध लावणे म्हणजे मानवी ज्ञानाने आजवर गाठलेल्या शिखरावर चढून आणखी एक पाऊल पुढे जाणे. वाटेतील प्रत्येकच पायरी एखाद्या शोधकर्त्याने स्वतःच्या मालकीची म्हणून काढून नेली तर कुणालाही नवी शिखरे गाठताच येणार नाहीत !

आज मात्र पटावर खेळल्या जाणाऱ्या खेळांचे, सेफ्टी पिनचे, इतकेच काय बासमती तांदळाचेसुद्धा पेटंट घेतले गेले आहे! भांडवलशाहीत तर पेटंट हा नफा उकळण्याचा राजमार्ग बनला आहे. कुठल्याही छोट्या गोष्टीचे वा प्रक्रियेचे पेटंट काढले जाते. अनेकदा त्या पेटंटचे काहीही उत्पादन न होता ते तसेच बासनात गुंडाळून ठेवले जाते. एखाद्या पेटंट असलेल्या गोष्टीचे उत्पादन झाले, तरी मग ती अव्वाच्या सव्वा किमतीला विकली जाते. ह्यातून शोधकर्त्याला वा उत्पादनकर्त्याला अतिनफा तर होतोच, शिवाय ह्यामुळे जगातील बहुसंख्य कामगार कष्टकरी नव्या शोधांपासून आणि विज्ञान तंत्रज्ञानातील प्रगतीपासून वंचित राहतात. ह्याचे उत्तम उदाहरण म्हणजे कोरोनाची लस. हि अशी नफेखोर पेटंटबाजी औषधनिर्मिती क्षेत्रांत सर्रास चालते.

### औषधनिर्मिती क्षेत्रातील पेटंटचे राज्य

औषधनिर्मिती कंपन्यांचे संपूर्ण अर्थचक्रच ह्या पेटंटांभोवती फिरते. कोरोनाचेच उदाहरण घ्यायचे झाले, तर अशाप्रकारचे विषाणू लस संशोधकांसाठी काही एकदम नवीन नाहीत. कोरोनाच्याच जवळच्या सार्स विषाणूची साथ वीस वर्षांपूर्वीच येऊन गेली आहे. खाजगी औषध कंपन्यांनी सार्स रोगावर लस काढण्यासाठीच संशोधन सुरु केले होते. परंतु लस निघण्याच्या अगोदरच सार्सची साथ गेली. साथ गेल्यामुळे औषधकंपन्यांची गडगंज नफ्याची संधीदेखील गेली. त्यामुळे लसीवरचे संशोधन 2004 मध्ये थांबवण्यात आले. जर सार्सवरच्या लसीचे संशोधन तेव्हा पुढे गेले असते तर आज कोरोनाची लस शोधण्यात खूप मदत झाली असती, व अनेकांना वाचवता आले असते असे अमेरिकेच्या येल विद्यापीठातील जेसन श्वार्ट्झ ह्या सामाजिक आरोग्य विषयाच्या प्राध्यापकांनी एका मुलाखतीत सांगितले आहे.

त्याआधी 1990 मध्ये आफ्रिकेत एड्सची साथ आली होती. एड्सची लक्षणे दाबून टाकणाऱ्या औषधांवर औषधनिर्मिती कंपन्यांनी पेटंट घेतले व त्यांची किंमत वर्षाला 15,000डॉलर इतकी ठेवली. हि किंमत आफ्रिकेतील सामान्यांच्या आवाक्याबाहेरची होती. ह्या औषधांवरील पेटंट काढून जर ह्या औषधनिर्मिती कंपन्यांची एकाधिकारशाही संपवली असती तर हीच औषधे 350 डॉलरपेक्षाही कमी किंमतीत अगदी नफा कमावून बनवता आली असती. 2013 मधील गार्डियन वृत्तपत्राच्या अहवालानुसार ह्या पेटंट व्यवस्थेमुळे आफ्रिकेतील 1 कोटीपेक्षा जास्त लोकांना ह्या साथीत जीव गमवावा लागला.

अशी अनेक उदाहरणे देता येतील. एखाद्या औषधाच्या पेटंटची वीस वर्षे संपत आल्यावर पेटंट वाढवण्यासाठी ह्या औषधकंपन्या अनेक क्लृप्त्यासुद्धा लढवतात. त्याच औषधात छोटासा बदल करून पुन्हा नवे पेटंट घेतात, किंवा एकाच औषधातील अनेक घटकांवर वेगळेवेगळे पेटंट घेतात, इत्यादी. पेटंटचा अर्थ केवळ उत्पादनाचा व विक्रीचा एकाधिकार इतकेच नव्हे, तर किंमत देखील ठरवण्याचा एकाधिकार. त्यामुळेच ह्या धंदेबाज कंपन्या औषधांच्या किंमती इतक्या गगनचुंबी ठेवतात. माणसांचा जीव वाचवणे हे दुय्यम उद्दिष्ट असते, किंवा खरेतर ते उद्दिष्टच काय खिजगणतीतही नसते. सगळी गणिते

पान 14 वर

• संपादक मंडळ – निखील एकडे, बबन ठोके • संपादकीय कार्यालय- रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग, 7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043
मो. नं. 8669735643 , 9619039793 • जागृति प्रिंटर्स, 12-ए, ग्राउंड फ्लॉर, भायखला सर्विसेज इंडस्ट्रीज, भायखळा, मुंबई - 9820017588 येथे मुद्रित